# वार्षिकअहवाल
## २०१३- २०१४

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**
राहुरी – ४१३ ७२२, जिल्हा – अहमदनगर (महाराष्ट्र)
www.mpkv.ac.in

| | | |
|---|---|---|
| **संपादक** | : | **डॉ. बी. आर. उल्मेक**<br>संचालक, विस्तार शिक्षण<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ,<br>राहुरी - ४१३ ७२२, जिल्हा - अहमदनगर (महाराष्ट्र) |
| **संपादकीय मंडळ** | : | **डॉ. प्रकाश तुरबतमठ**<br>**डॉ. गोरक्ष ससाणे**<br>**डॉ. संदिप पाटील**<br>**डॉ. सचिन सदाफळ**<br>**डॉ. किरण थोरात**<br>**श्री. संग्राम काळे** |
| **प्रकाशक** | : | **श्री. सुनिल वानखेडे**<br>कुलसचिव,<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ,<br>राहुरी - ४१३ ७२२, जिल्हा - अहमदनगर (महाराष्ट्र) |

**मफुकृवि /विप्र/ क्र. १०२०/२०१४**



**डॉ. तुकाराम मोरे**
कुलगुरु
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी - ४१३ ७२२, जिल्हा - अहमदनगर (महाराष्ट्र)

## प्रस्तावना

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा वार्षिक अहवाल सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. सदरचा वार्षिक अहवाल म्हणजे एकुण कार्याचे केवळ एकत्रीकरण नसून एकुणच विद्यापीठाने केलेला विकास व त्यामध्ये विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान आहे. महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांनी वेळोवेळी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. विद्यापीठाचे सन्माननीय प्रतिकुलपती तथा कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे वारंवार मिळणारे प्रोत्साहन व सहाय्य याबबतही मी त्यांचा शतशः आभारी आहे. तसेच महासंचालक भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सन्माननीय सदस्य, विद्यापरिषदेचे सदस्य आणि विद्यापीठाच्या इतर वैधानिक संस्थांचे सदस्य यांनी वेळोवेळी केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो.

सन २०१३-१४ या वर्षात एकुण २३७८ विद्यार्थ्यांनी पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी संपादन केली आहे. शिवाय २६ विद्यार्थ्यांनी कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती मिळवली आहे. याच बरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय सेवेमध्ये विविध विभागात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत एकुण ३५ विद्यार्थ्यांची विविध पदावर निवड झाली. तसेच खाजगी क्षेत्रातही अनेक विद्यार्थी विविध पदावर नियुक्त झाले आहेत. काही विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराची निमिर्ती केली आहे.

विद्यापीठाच्या संशोधन कार्यामध्ये यावर्षी विविध विभाग, संशोधन प्रकल्प, योजना, यांचेमार्फत एकुण सात नविन वाण, तीन नविन अवजारे तसेच ६७ तांत्रिक शिफारशी शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या गेल्या. त्याचबरोबर एकुण ६७८५.६१ क्विंटल बियाण्याचे उत्पादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या विस्तार कार्यामध्ये यावर्षी एकुण १९९ प्रशिक्षण कार्यक्रम, १२६ कार्यशाळा व चर्चासत्रे शेतकरी, तरूण, महिला शेतकरी व कर्मचारी यांचेसाठी आयोजित करण्यात आली. त्याचबरोबर शेतकरी कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रकाशने त्यामध्ये कृषिदर्शनी (१८,००० प्रती), श्रीसुगी (१०,११० प्रती) तसेच विविध प्रकारच्या घडीपत्रिका प्रकाशित करण्यात आल्या.

कृषी विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रांवर अनेक शेतकऱ्यांनी भेटी दिल्या. भेटी दरम्यान शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी अणि विद्यार्थी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय विद्यापीठाचे विविध उपक्रम आणि प्रकाशनाद्वारे कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद निश्चितच समाधानकारक होता.

( तुकाराम मोरे )

# अनुक्रमणिका


| अ. क्र | | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | | विद्यापीठ उपलब्धी | १ |
| | १.१ | शिक्षण | १ |
| | १.२ | संशोधन | ४ |
| | १.३ | विस्तार शिक्षण | ४ |
| २. | | शिक्षण | ५ |
| ३. | | संशोधन | १७ |
| ४. | | विस्तार शिक्षण | ३७ |
| ५. | | प्रमुख घडामोडी | ४४ |
| ६. | | पारितोषिके / पुरस्कार / नियुक्ती | ६३ |
| ७. | | मनुष्यबळ | ६५ |
| | ७.१ | कार्यकारी अधिकारी | ६५ |
| | ७.२ | कार्यकारी परिषद सदस्य | ६५ |
| | ७.३ | विद्या परिषद सदस्य | ६७ |
| | ७.४ | विद्याविषयक अधिकारी | ६९ |
| | ७.५ | विभाग प्रमुख व पीक विशेषज्ञ | ६९ |
| | ७.६ | इतर अधिकारी | ७० |
| | ७.७ | विद्यापीठ मनुष्यबळ | ७१ |
| ८. | | पायाभुत सुविधा निर्मिती | ७९ |
| ९. | | विद्यापीठाचे आर्थिक समालोचन | ८० |

## १. विद्यापीठ उपलब्धी

महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना २० ऑक्टोबर १९६८ मध्ये झालेली असुन राज्य तसेच देशाकरीता कृषि क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने निर्माण करण्याचे हे एक प्रमुख केंद्र आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कार्यक्षेत्रामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापुर, नाशिक, धुळे, सांगली, सातारा, सोलापुर, पुणे, अहमदनगर, जळगाव व नंदुरबार या दहा जिल्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील नऊ कृषि हवामान विभागापैकी चार कृषि हवामान विभाग विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. महाराष्ट्र राज्याच्या एकुण जमीन क्षेत्रापैकी ३७.५ टक्के जमीन क्षेत्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातीलतील दहा जिल्ह्यांमध्ये (११६.१२ लाख हेक्टर) आहे. यापैकी ७२.४५ लाख हेक्टर जमीन लागवडी योग्य असुन बागायती क्षेत्र १३.१७ लाख हेक्टर आहे.

कृषि शिक्षण, कृषि संशोधन आणि विस्तार शिक्षण या तीनही क्षेत्रातील अहवाल वर्षातील ठळक वैशिष्ट्ये.

### १.१ शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठद्वारे घटक व विना अनुदानित तंत्र विद्यालय व महाविद्यालयातून पदविकेपासून पदव्युत्तर पर्यंत कृषि शिक्षण देत असून दरवर्षी साधारणपणे ६००० प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण केले जाते .हे मनुष्यबळ सरकारी, निमसरकारी व खाजगी संस्था तसेच कृषि निगडीत व्यवसाय व शेतीमध्ये समाविष्ट होत असते. शिक्षण क्षेत्रातील प्रमुख उपलब्धी पुढील प्रमाणे-

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ सात घटक महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देते. यामध्ये कृषि महाविद्यालय पुणे, धुळे, कोल्हापूर, नंदुरबार व कराड येथे असून डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी येथे तर उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे येथे आहेत. या सर्व घटक महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ७२४ विद्यार्थ्यांची आहे.

२. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रात ४९ विनाअनुदानीत महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये बी.एस्सी (कृषि) २५, बी.एस्सी. (उद्यानविद्या) ०४, बी. एस्सी. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) ०४, कृषि व्यवसाय व्यवस्थापन ०६, कृषि जैवतंत्रज्ञान ०६, बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) ०४ व पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र ०१ या महाविद्यालयांचा समावेश आहे.

३. विनाअनुदानीत महाविद्यालयात बी.एस्सी. (कृषि) पदवी अभ्यासक्रमासाठी २१६०,बी.एस्सी. (उद्यानविद्या) २००, बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) २८०, कृषि जैवतंत्रज्ञान ३२०, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान २४०, कृषि व्यवसाय व्यवस्थापन ३२० व पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र ३० असे एकुण ३५५० विद्यार्थ्यांना प्रथम वर्षात प्रवेश दिलेला आहे.

४. पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी ८१ व एम.एस्सी. अभ्यासक्रमासाठी २४२ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर कृषि महाविद्यालय, पुणे येथे एम.एस्सी. करिता ६८, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे ४६ व कृषि महाविद्यालय, धुळे येथे २४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे.

५. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात एम.टेक. (कृषि अभियांत्रिकी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

६. सन २०१३- १४ या शैक्षणिक वर्षात २३४७ विद्यार्थ्यांनी घटक व विनाअनुदानीत महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेला आहे.

७. सन २०१३- १४ या शैक्षणिक वर्षात ३५७ विद्यार्थ्यांनी पद्व्युत्तर पदवी (एम.एस्सी.) व ४२ विद्यार्थ्यांनी आचार्य (पी. एच.डी.) अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेला आहे.

८. पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथे सन २०१३-१४ मध्ये २६ विद्यार्थ्यांना कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती व २ विद्यार्थ्यांना वरिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

९. मा. श्री. गिरीश, संचालक, ब्रम्हा कुमारीज ईश्वर सेवा विद्यालय, नवी मुंबई यांचे सकारात्मक विचारांचा वापर करुन मनाची शक्ती वाढविणे या विषयावर व्याख्यान नानासाहेब पवार सभागृहात आयोजित करण्यात आले.

१०. सौ. नीलमनी गांधी, समाज सेविका यांचे महिला सुरक्षितता व कायदेशीर सल्ला या विषयावर डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले.

११. व्यक्तिमत्व विकास या विषयावर मिडास ॲकॅडमी, पुणे यांचे मार्फत पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यामध्ये १७७ विद्यार्थी सहभागी झाले.

१२. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी यांनी फळे व भाजीपाला या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केले.

१३. पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथे विद्यार्थी नोकरी विषयक सल्ला कक्ष असून त्या मार्फत विद्यार्थ्यांना आयुष्यातील भावी संधी या विषयी मार्गदर्शन करण्यात येते. या कक्षामार्फत अहवाल वर्षात ७ विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरी प्राप्त झाली.

१४. विद्यापीठात आयोजित २९ व्या पदवीदान समारंभामध्ये एकूण १८५ विद्यार्थ्यांना विविध पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. २९ व्या पदवीदान समारंभामध्ये विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे सुवर्णपदक वितरीत करण्यात आले.

| अ. क्र | पारितोषिकाचे नाव व विभाग | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| १ | प्राचार्य व्ही.जी.गोखले सुवर्णपदक कृषि विद्या विभागात प्रथम | कु. दुधाडे पुनम दिपक |
| २ | हेक्झामर फॉऊंडेशन सुवर्णपदक वनस्पती रोगशास्त्र विभागात प्रथम | कु. रुबिना पोखरल |

| | | |
|---|---|---|
| ३ | कै. राजाराम ग.पाटील, नाशिक सुवर्णपदक बीयाणेशास्त्र व तंत्रज्ञान विभागात प्रथम | कु. गायकवाड अश्विनी पंडीत |
| ४ | जिंदाल जुबली सुवर्णपदक मृदशास्त्र व कृषि रसायन विभागात प्रथम | कु. लोटंगबम जॉयमती चानू |
| ५ | कृषिभूषण हिरालाल ओंकार पाटील सुवर्णपदक कृषि वनस्पती रोगशास्त्र विभागात प्रथम | कु. अडसुळ दिपाली लक्ष्मण |
| ६ | बी.एस.एस सुरेश अगरवाल सुवर्णपदक भाजीपालाशास्त्र विभागात प्रथम | कु. देशमुख भावना दिवाकर |
| ७ | सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात सुवर्णपदक दुग्धशास्त्र विभागात प्रथम | कु. पाटील मेघा सुरेश |
| ८ | लोकनेते कै. मारूतराव घुले पाटील सुवर्णपदक कृषि अर्थशास्त्र विभागात प्रथम | श्री. शेख मोहम्मद मोझाम |
| ९ | कै. सुनितभाई बोंडे सुवर्णपदक कृषि विस्तार विभागात प्रथम | कु. वंदना अर्जून गंदोरली |
| १० | कै. वरूण कांबळे व कै. दिपक वाघ सुवर्णपदक कृषि जैवतंत्रज्ञान विभागात प्रथम | कु. चौधरी प्रिया गंगाधर |
| ११ | डॉ. वसंतराव खुस्पे सुवर्णपदक कृषि विद्या विभागात प्रथम | श्री. गिरी मिलिंद दत्तात्रय |

१५. सन २०१३-१४ वर्षाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे मजले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे घेण्यात आले. शिबिरात एकूण १२१ (६७ मुले व ५४ मुली) स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला होता. श्री. दिपक शिंदे तहसीलदार यांच्या हस्ते शिबीराचे उद्‌घाटन झाले. प्रथम सत्रात प्रार्थना सत्र, दुसरे सत्र श्रमदान व सामाजिक जनजागृती कार्यक्रम तिसरे सत्र बौध्दिक कार्यक्रम गटाच्या चाचणी परिक्षा तर चौथ्या सत्रात पथनाट्ये यांचा समावेश होता. आरोग्य शिबीराचे आयोजन, प्रात्यक्षिके यांचे आयोजन करण्यात आले. दिपक लहामगे यांना सन २०१३-१४ चा राज्य पातळीवरील सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले.

१६. कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील २६ विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धापरिक्षेत (JRF) निवड झाली.

१७. डॉ. एस. आर. शिंदे, प्राध्यापक वनस्पतीशास्त्र यांनी विकसित केलेल्या सोयाबीनच्या केएस-१०३ या वाणास जोरहट आसाम येथे संपन्न झालेल्या कार्यशाळेत संचालक, सोयाबीन यांनी दक्षिण विभागासाठी मान्यता देण्यात आली.

१८. डॉ. बुधाजीराव मुळीक, वरिष्ठ कृषि सल्लागार, महाराष्ट्र शासन यांनी कृषि महाविद्यालय, कोल्हापूरला भेट देवून शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१९. धुळे येथिल कृषि महाविद्यालयाच्या, द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दक्षिण भारत, तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी उत्तर भारत आणि प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रात शैक्षणिक सहल आयोजीत केली होती.

२०. धुळे येथिल कृषि महाविद्यालयाने, नवलनगर, दहयाने, काळखेडे, आजंग व निमडाळे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दुष्काळ निवारण अभियानाचे आयोजन करण्यात आले.

२१. कृषि महाविद्यालय, धुळे येथे नशा बंदी दिनाचे आयोजन ४८, महाराष्ट्र बटालियन, एन. सी. सी., धुळे यांनी कर्नल टी. एस. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. पी. के. धारणे हे होते.

२२. एमआयटी, पुणे येथे झालेल्या भारतीय विद्यार्थी संसद परिषद - २०१२ मध्ये कृषि महाविद्यालय, धुळे येथील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

२३. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी राहुरी येथे कृषि प्रक्रिया व अन्नतंत्रज्ञान या विषयातील संशोधन व विकासातील संधी यावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

२४. पदव्युत्तर महाविद्यालय तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर/कराड/नंदूरबार येथे स्वच्छ भारत अभियान राबविले. याप्रसंगी विद्यार्थी फेरी काढण्यात आली. विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात येवून वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, इ. चे आयोजन करण्यात आले.

२५. कृषि क्षेत्रात शिक्षणासाठी प्रवेश घेण्याविषयीचे महत्व पटवून देण्यासाठी बारावी पास विद्यार्थी व पालकांसाठी कृषि शिक्षण दिन पदव्युत्तर महाविद्यालय तसेच डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर/कराड/नंदूरबार यांनी आयोजित केला.

२६. कृषि महाविद्यालय, नंदूरबार यांनी प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल आयोजित केली.

२७. डॉ. ए. टी. मोरे, मा. कुलगुरु, डॉ. बी. आर. उल्मेक, (अधिष्ठाता कृषि), डॉ. के. डी. कोकाटे, संचालक विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी यांनी कृषि महाविद्यालय, नंदूरबार येथे भेट देऊन तेथील शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला.

२८. आंतर विद्यापीठ वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे दिनांक. १८ नोव्हेंबर, २०१३ रोजी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे

| अ. नं. | स्पर्धकाचे नांव | महाविद्यालयाचे नांव | विजेता/ उपविजेता |
|---|---|---|---|
| अ) शिक्षा मंडळ वर्धा | | | |
| १. | बनसोडे विनया दिलीप | कृषि महाविद्यालय, बारामती | विजेता |
| २. | साळुंके विजय बाळासाहेब | कृषि महाविद्यालय, सोनई | उपविजेता |
| **ब) पी.सी.अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा इंग्रजी** | | | |
| १. | मोरे विक्रांत सहदेव | पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी | विजेता |
| २. | चव्हाण निखिल | डॉ. अ. शिंदे कृषि अभि. महाविद्यालय, राहुरी | उपविजेता |
| **क) पी.सी.अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा मराठी** | | | |
| १. | बनसोडे विनया दिलीप | कृषि महाविद्यालय, बारामती | विजेता |
| २. | गवांदे प्राची | कृषि महाविद्यालय, नाशिक | उपविजेता |
| **ड) हुंडा बंदी चळवळ मुंबई** | | | |
| १. | रणसिंग किरण | डॉ. अ. शिंदे कृषि अभि. महाविद्यालय, राहुरी | विजेता |
| २. | सोनवणे शुभांगी | कृषि महाविद्यालय, सोनई | उपविजेता |

२९. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले संघ खालील प्रमाणे

| अ. नं. | खेळ प्रकार | दिनांक | आयोजक विद्यापीठ |
|---|---|---|---|
| १. | फुटबॉल | १४ ते १८ नोव्हे. २०१३ | एम. एल. सुखाडिया विश्वविद्यालय उदयपुर, राजस्थान |
| २. | मल्लखांब | ८ ते १२ नोव्हें. २०१३ | कुरुक्षेत्र विश्वविद्यालय, हरियाणा |
| ३. | टेबल टेनिस | २० ते २२ डिसेंबर २०१३ | मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद |
| ४. | बॅडमिंटन | २५ ते २६ नोव्हें २०१३ | राजस्थान टेक्निकल विश्वविद्यालय कोटा, राजस्थान |

३०. १० वा आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य - २०१३ सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा (युवक महोत्सव)

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा संघ इंद्रधनुष्य सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ विद्याविहार लोणेरे येथे दिनांक ७ ते ११ डिसेंबर २०१३ रोजी सहभागी होण्यासाठी पाठविण्यात आला. सदर स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी विद्यार्थीनींनी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात चांगल्या प्रकारे सहभाग नोंदवुन विद्यापीठाचे नाव लौकीकात भर टाकण्याचा प्रयत्न केला.

३१. १७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव (अश्वमेध) २०१३-१४

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे दिनांक २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१३ या कालावधीत १७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या खालील संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला.

१) खोखो (मुले) २) खोखो (मुली) ३) व्हॉली बॉल (मुले) ४) व्हॉलीबॉल (मुली) ५) कब्बड्डी (मुले) ६) कब्बड्डी (मुली) ७) बास्केट बॉल (मुले) ८) बास्केट बॉल (मुली) ९) मैदानी स्पर्धा (मुले) १०) मैदानी स्पर्धा (मुली) या सर्व खेळाडूंनी या स्पर्धेत अतिशय चांगली कामगिरी केली.

३२. राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष २०१३

उत्कर्ष २०१३ या स्पर्धेचे आयोजन भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल धनकवडी पुणे येथे दिनांक १४ ते १६ डिसेंबर २०१३ दरम्यान करण्यात आले या स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे ९ विद्यार्थी, ९ विद्यार्थीनी व दोन संघ व्यवस्थापक सहभागी झालेत.

३३. यश करंडक टी -२० आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवानिमित्त ४ ते १४ डिसेंबर २०१३ दरम्यान विद्यापीठातील कायम आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचा-यांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा संघ सहभागी झाला व या संघाने उपांत्य फेरी पर्यत मजल मारली व उत्कृष्ठ खेळाचे प्रर्दशन केले.

३४. कृषि तंत्र विद्यालय

**खो - खो मुले**

| विजेता / उपविजेता | विजेता संघाचे नांव |
|---|---|
| विजयी | सोलापूर जिल्हा |
| उपविजयी | कोल्हापूर जिल्हा |

**खो - खो मुली**

| विजेता / उपविजेता | विजेता संघाचे नांव |
|---|---|
| विजयी | अहमदनगर जिल्हा |
| उपविजयी | सातारा जिल्हा |

**व्हॉलिबॉल मुले**

| विजेता / उपविजेता | विजेता संघाचे नांव |
|---|---|
| विजयी | सोलापूर जिल्हा |
| उपविजयी | पुणे जिल्हा |

**व्हॉलिबॉल मुली**

| विजेता / उपविजेता | विजेता संघाचे नांव |
|---|---|
| विजयी | पुणे जिल्हा |
| उपविजयी | सोलापूर जिल्हा |

## १.२ संशोधन

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात विविध पिकांचे पाच सुधारित वाण प्रसारित केले. प्रसारित वाण गहू - फुले समाधान, नाचणी - फुले वैतरणा, आंबा - फुले अभिरुची, सिताफळ - फुले पुरंदर अणि लसुण - फुले निलिमा.

२. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात दोन कृषि यंत्रे, औजारे प्रसारण व नोंदणी केलेली आहे. यात मानवचलित फुले ज्वारी काडणी यंत्र आणि फुले औषधी बिया फोडणी यंत्र. पीक उत्पादनामध्ये पीक पद्धती, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. याबाबत विद्यापीठाने ५४ शिफारशी अहवाल वर्षात शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या आहेत.

३. शेतकऱ्यांना सुधारित बियाणाचा सुरळीत पुरवठा होण्याकरिता विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला. अहवाल वर्षात ३७९५.७७ क्विंटल केंद्रिय, २७२१.९५ क्विंटल पायाभूत व ३४७८.६१ क्विंटल सत्यप्रत बियाण्याचे उत्पादन करण्यात आले.

४. शुद्ध बियाणे हे प्रति हेक्टरी उत्पादन वाढीकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन अहवाल वर्षात विविध पिकांचे एकूण ९९९६.३३ क्विंटल बियाण्याचे वितरण करण्यात आले.

५. फळबागांची महाराष्ट्रात जास्त प्रमाणात लागवड होत आहे. याकरिता विद्यापीठातर्फे एकूण ११६८८६५ फळझाडे, ३२४४५ शोभिवंत झाडे यांची रोपे व कलमे, १११.२१ क्विंटल भाजीपाला बियाणे व १३६.५ टन भाजीपाला कंद पुरविण्यात आले.

६. विद्यापीठातील विविध प्रकल्पांमध्ये ६४१.६५ क्विंटल व ८७१.७५ लिटर जैविक खते, जैविक कीडनाशके व मित्र किडी उत्पादन घेण्यात आले.

## १.३ विस्तार शिक्षण

कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षण कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. विस्तार कार्यक्रम सरकारी संस्था, बिगर शासकीय संस्था, सहकारी स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था इत्यादीच्या मदतीने राबविण्यात येतात.

१. विद्यापीठांतर्गत असलेली कृषि महाविद्यालये आणि संशोधन केंद्रे येथे १८९ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

२. अहवाल वर्षात ५८ जिल्हा मासिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले व त्याचा १३६६ लाभार्थींना फायदा झाला.

३. अहवाल वर्षात ३७० कृती प्रात्यक्षिक, ४०३ परिणाम प्रात्यक्षिक व शेतकऱ्यांच्या शेतावर १४७१ चाचण्या घेण्यात आलेल्या होत्या. याचा लाभ ६४२१ शेतकऱ्यांना झाला.

४. विस्तार शिक्षणाचे ५४२१ कार्यक्रमामध्ये उदा. गटचर्चा, शिवारफेरी, शेतीदिन, शेत आणि घरांना भेटी, शेतकरी मेळावे, शेतीविषयक प्रदर्शन, शेतकऱ्यांची अभ्यास सहल, निदान चमुच्या भेटी, विद्यापीठ शास्त्रज्ञांचे विस्तार शिक्षण कार्यक्रमातून मार्गदर्शनाचा लाभ शेतकऱ्यांना, शेती खात्यातील कर्मचाऱ्यांना, बिगर सरकारी संस्थांना व कर्मचाऱ्यांना झालेला आहे.

५. विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या निदान चमूने १६७ ठिकाणी शेतातत शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन मार्गदर्शन केले.

६. विद्यापीठामार्फत कृषि दर्शनीच्या १८००० प्रति, श्रीसुगीच्या ९९७० प्रति, घडी पत्रिका १०००० प्रती व शेती विषयावरील वेगवेगळी पुस्तके, मफुकृवि वार्तापत्र, शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

७. अहवाल वर्षात २१८१८ प्रतिष्ठित विद्यार्थी, शेतकरी, अधिकारी यांनी विद्यापीठास भेट दिली तर १५५४४ शेतकऱ्यांनी कृषि संशोधन केंद्र व कृषि महाविद्यालयास भेटी देऊन अहवाल वर्षात शेतीविषयक माहिती मिळवली.

८. एकूण १५२७६ शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण हेल्पलाईन दूरध्वनीमार्फत करण्यात आले.

९. फिरते पीक चिकित्सालयाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतावर ११६४ मातीचे नमुने, ५७५ रोगांचे तर ४७६ किडींचे नमुने तपासून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## २. शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि संलग्न शिक्षण देण्याकरीता कृषि शाखा व कृषि अभियांत्रिकी अशा दोन प्रमुख शाखा आहेत.

### २.१ कृषि शाखा

कृषि शाखेत विविध विषयांबदद्ल ज्ञानदान करण्यात येते. यात प्रामुख्याने कृषिविद्या, उद्यानविद्या, कृषि जैवतंत्रज्ञान, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, कृषि व्यवस्थापन या शाखांचा पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. कृषि शाखेत बारा विभाग असून त्यांच्यामार्फत पदवी, पदव्युत्तर व आचार्य अभ्यासक्रम राबविले जातात. कृषि शाखेच्या अंतर्गत खालील पदवी अभ्यासक्रम आहेत.

### २. १.१ बी. एस्सी.(कृषि)

शाश्वत कृषि विकासासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे तसेच शेतकऱ्यांच्या तांत्रिक व अर्थिक सबळीकरणासाठी कृषि शिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. बी.एस्सी.(कृषि) चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात शिकविला जातो. सदर पदवी अभ्यासक्रमामध्ये १६० क्रेडिट आहे. एकूण १६० क्रेडिट पैकी १२३ क्रेडिट पहिल्या ६ सत्रात पुर्ण होतात. सातव्या सत्रात विद्यार्थ्यांना २० क्रेडिट, ग्रामीण कृषि कार्यानुभवाकरीता राखीव आहेत. या सत्रात विद्यार्थी ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या शेतावर राहतात व शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान प्रसार करण्याकरीता शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. तसेच शेती करताना येणाऱ्या अडचणी समजावून घेतात. प्रत्येक विद्यार्थी हा कृषिदूत म्हणून कार्य करतो. आठव्या सत्रात विद्यार्थी कार्यानुभवधिष्ठीत शिक्षणासाठी, प्रशिक्षणार्थी म्हणून पुढील पैकी एका संस्थेत जातो. उदा. बीयाणे/खते/किटकनाशके/जैवतंत्रज्ञान उदयोग/व्यावसायिक रोपवाटिका/रेशिमउदयोग/अन्नप्रक्रिया संस्था/ शेतीविषयक वित्त संस्था/बँक/पतसंस्था इ. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ शिक्षण मंडळ, पुणे मार्फत प्रत्येक सत्राची लेखी परीक्षा घेतली जाते. बी. एस्सी.(कृषि) पदवीकरीता विद्यापीठाची पुणे, धुळे, कोल्हापूर, कराड व नंदूरबार येथे ५ घटक कृषि महाविद्यालये व २४ विनाअनुदानीत तत्वावरील कृषि महाविद्यालये कार्यरत आहेत.

### २.१.२ बी. एस्सी. (उद्यानविद्या)

सन १९७० पर्यंत उद्यानविद्या हा कृषि अभ्यासक्रमाचा एक भाग होता. उद्यानविद्याचे सुरक्षित जीवनमान, आर्थिक सबलीकरण आणि अन्न सुरक्षा यातील महत्व लक्षात घेता, उद्यानविद्या ही एक स्वतंत्रशाखा म्हणून उदयास आली. विद्यापीठ अंतर्गत पहिले उद्यानविद्या महाविद्यालय १९८४ साली कृषि महाविद्यालय, पुणे येथे स्थापन करण्यात आले. बी. एस्सी. (उद्यान) चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता १६५ क्रेडिटची आवश्यकता असते. सातव्या व आठव्या सत्रात विद्यार्थ्यांना १४ आठवडे व ६ आठवडे कृषि उद्योग समुहात प्रशिक्षणार्थी म्हणून रोपवाटीका व्यवस्थापन व संरक्षित लागवड या विषयांमध्ये प्रशिक्षण घेतात. उद्यानविद्या पदवी घेऊन विद्यार्थी, फळे, भाजीपाला लागवड, बगीचा सुशोभिकरण, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये तज्ञ म्हणून कार्य करतात. बी. एस्सी. (उद्यान) अभ्यासक्रम कृषि महाविद्यालय, पुणे येथे B.Tech. आणि चार विना अनुदानित महाविद्यालयात सुरु आहे.

### २.१.३ बी. टेक. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान)

बी. टेक. (अन्नशास्त्र व तंत्रज्ञान) हा चार वर्षाचा अभ्यासक्रम आठ सत्रात शिकविला जातो. एकूण १८० क्रेडिट पैकी, १२५ क्रेडिट हे ६ व्या सत्रात पूर्ण होतात. ७ व्या सत्रात २५ (१५+१०) क्रेडिट हे ट्रेनिंगमधून त्यातील १५ क्रेडिट हे विद्यापीठाच्या प्रक्षेत्राबाहेरील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान महाविद्यालयातून पूर्ण करावे लागतात. स्थानिक गरजा व औद्योगिक मागणीवर आधारित कमीत कमी दोन कार्यानुभव प्रशिक्षण महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना देऊ केले जातात. आठव्या सत्रामध्ये ३० क्रेडिट करिता, विद्यापीठ प्रक्षेत्राबाहेर ६ महिन्यांसाठी अन्नप्रक्रिया उदयोग किंवा संस्थामध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. व त्याची पडताळणी त्याच अन्नप्रक्रिया उदयोगाकडून केली जाते.

याचा मुख्य उद्देश व्यावसायिक अन्नप्रक्रिया उद्योग संशोधन आणि विकास विभाग, संशोधन व शिक्षण संस्था आणि दर्जा नियंत्रण विभाग यांना प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे आणि नवीन अन्नप्रक्रिया उद्योग स्थापन करुन युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. हा कार्यक्रम विद्यापीठांतर्गत चार विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये चालविला जातो.

### २.१.४ बी. बी.एम. (कृषि)

बी. एस्सी. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) चार वर्षाच्या अभ्यासक्रम आठ सत्रात उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम, विविध संस्थातील कृषि निगडीत गरजा लक्षात घेऊन, विशेषकरुन कृषि व्यवस्थापन या क्षेत्राचा जास्तीत जास्त अंतर्भाव अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यास कृषि अर्थशास्त्र, विपणन व व्यवसाय व्यवस्थापन या मध्ये प्राविण्य मिळेल. एकूण १६० क्रेडिट पैकी, १२० क्रेडिट हे ६ व्या सत्रात पूर्ण होतात. ७ व्या सत्रात २० क्रेडिट कार्यानुभव शिक्षणाकरीता आहेत. यात एकूण पाच मोडूल तयार करण्यात आले असून, प्रत्येक मोडूलमध्ये पाच ते वीस विद्यार्थी दिले जातात. मोडूल प्रामुख्याने कृषि निगडीत उद्योगसमूह, कृषि निगडीत उद्योगसमूह व्यवस्थापन काढणी पश्चात व्यवस्थापन किंमती पिकांचे प्रकल्प तयार करणे, त्याची अंमलबजावणी व मूल्यमापन व कृषि विपणन व्यवस्थापन या विषयांवर आधारित आहेत. आठव्या सत्रात विद्यार्थी खेडेगावात प्रगतशील शेतकऱ्यांबरोबर राहुन शेतीशी निगडीत माहिती घेतात, नंतर प्रकिया उद्योग/बाजार/विपणन संस्था

यात प्रत्यक्ष माहिती घेतात. यात एक आठवडा शैक्षणिक सहल आयोजीत केली जाते. सदर अभ्यासक्रम विद्यापीठांतर्गत सहा विना अनुदानित महाविद्यालयामध्ये राबविला जातो.

### २.१.५ बी. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)

बी. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)चार वर्षाच्या अभ्यासक्रम आठ सत्रात प्रदान करण्यात आलेला आहे. सदर पदवी अभ्यासक्रम १६० क्रेडिट आहे. जैवतंत्रज्ञान हा विषय इतर कृषि विभागांशी निगडीत असून, पदवी अभ्यासक्रम पाच विभाग उदा. जीवरसायनशास्त्र, पीक जैवतंत्रज्ञान, काढणी पश्चात व अन्न जैवतंत्रज्ञान, पशु जैवतंत्रज्ञान व पीकशास्त्रा मध्ये उपलब्ध आहे. एकूण आठ सत्रापैकी, पहिले सहा सत्रामध्ये विद्यार्थी शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करतात. सातव्या सत्रात प्रात्यक्षिक आधारित अभ्यासक्रम देण्यात येतो. तर आठव्या सत्रात प्रत्येक विद्यार्थ्यास जैवतंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प तयार करुन त्याचे सादरीकरण करावे लागते. सध्या काळाची गरज विचारात घेऊन कृषि जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रम सहा विना अनुदानित महाविद्यालयात कार्यरत आहे.

## २.२ शैक्षणिक संस्था (घटक महाविद्यालय)

### २.२.१ कृषि महाविद्यालय, पुणे



भारतातील पहिल्या पाच कृषि महाविद्यालयापैकी, कृषि महाविद्यालय, पुणे हे एक आहे. त्याची स्थापना १९०७ ला झाली. आद्य समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी ब्रिटीश सरकारकडे देशात कृषि संशोधन आणि शिक्षण देणारी संस्था सुरु करण्याची भूमिका मांडली. त्याला अनुसरुन विज्ञान महाविद्यालयात १८७९ साली कृषि विभाग सुरु करण्यात आला. याच विभागाचे पुढे रूपांतर स्वतंत्र कृषि महाविद्यालयात १९०७ मध्ये झाले. १९६८ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे कृषि महाविद्यालय विद्यापीठाकडे हस्तांतरीत झाले. या महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश क्षमता १९० व शेतजमीन ९० हेक्टर आहे. महाविद्यालयात शिक्षण व संशोधनाकरीता अनेक प्रकल्प कार्यरत असून त्यात प्रामुख्याने उच्च तंत्रज्ञान फुले व भाजीपाला उत्पादन प्रकल्प आहे तसेच, आळिंबी संशोधन प्रकल्प, एकात्मिक कीड नियंत्रण, लोकरी मावा नियंत्रण, अखिल भारतीय समन्वयित कापूस मररोग प्रकल्प, अणुजैविक प्रकल्प, बाजरी रोग नियंत्रण प्रकल्प, संकरीत फुलांचे वाण निर्मिती प्रकल्प, मस्त्य प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र व अत्याधुनिक रोप वाटिका आहे. महाविद्यालयामध्ये एम.बी.एम. (कृषि) अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आलेला आहे.

### २.२.२ कृषि महाविद्यालय, कोल्हापूर



प्रगतशील शेती, शेतीपुरक उद्योग आणि सरकारी संस्था यामध्ये अग्रेसर असणाऱ्या भारतातील अनेक जिल्हयांपैकी कोल्हापूर हा एक दक्षिण महाराष्ट्रातील जिल्हा आहे. या महाविद्यालयाची स्थापना शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १९६३ मध्ये झालेली आहे. १९६८ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीची स्थापना झाल्यानंतर कृषि महाविद्यालय, कोल्हापूर विद्यापीठाकडे हस्तांतरीत झाले. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १९० आहे. महाविद्यालयाचे एकूण जमीन क्षेत्र २४१.०८ हेक्टर आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण व संशोधनाकरीता गांडूळ खत प्रकल्प, जैविक खत प्रकल्प, जैविक किडनाशके उत्पादन प्रकल्प,फुले ड्रिंक्स, माती व पाणी पृथक्करण, बिजोत्पादन, रोपवाटिका, जमीन व पाणी अभियांत्रिकी शेतावर, प्रयोगशाळा, क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प इत्यादी प्रकल्प कार्यरत आहे. सदर महाविद्यालय २०१३ मध्ये सुवर्ण महोत्सव वर्ष साजरे करत आहे.

### २.२.३ कृषि महाविद्यालय, धुळे




मुंबई - आग्रा आणि सुरत- नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर कृषि महाविद्यालय, धुळे आहे. १९६० मध्ये या कृषि महाविद्यालयाची स्थापना झाली. प्रशस्त इमारत, नयनरम्य परिसर ही या महाविद्यालयाची वैशिष्ठये

आहेत. उत्तर महाराष्ट्रातील कृषि शिक्षण, संशोधन व कृषि विस्तार करीता महाविद्यालय कार्यरत आहे. कोरडवाहू शेती, कापूस आणि भुईमूग यावर येथे जास्त प्रमाणात संशोधन केले जाते. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १२८ आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता प्रशस्त प्रयोगशाळा, वाचनालय बरोबरच माती व पाणी पृथःकरण प्रयोगशाळा, गांडूळ खत प्रकल्प, सेंद्रीय शेती प्रात्यक्षिके, जैविक खत प्रकल्प, जैविक किडनाशके उत्पादन प्रकल्प, बिजोत्पादन कार्यक्रम, रोपवाटीका, पाणलोट क्षेत्र विकास, प्रात्यक्षिक युनिट, शेळी -मेंढी व पशुधन प्रकल्प, पाणी व्यवस्थापन प्रात्यक्षिक प्लॉट कार्यरत आहेत.

### २.२.४ उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे




उद्यानविद्या अंतर्गत फळे, भाजीपाला, मसाल्याची पिके, शोभिवंत झाडे, सुगंधी वनस्पती, काढणी पश्चात तंत्रज्ञान इ. बाबींचा समावेश होतो. परंपरागत शेतीला चांगला पर्याय याव्दारे उपलब्ध झाला आहे. महाराष्ट्र राज्य मुख्यतः पश्चिम महाराष्ट्र विभाग हा उद्यान विद्यामध्ये भारतात सर्वोच्च स्थानी आहे. कृषि महाविद्यालयाच्या परिसरात १९८४ साली उद्यानविद्या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. १९९५ मध्ये ते स्वंतत्र इमारतीमध्ये सुरू झाले. सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असणारी प्रशस्त इमारत हे या महाविद्यालयाचे वैशिष्टये म्हणता येईल. सर्व विभागांकरीता प्रयोगशाळा, संगणक, इंटरनेट आदी सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहे. महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ३२ आहे.

### २.२.५ कृषि महाविद्यालय,कराड

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, यांचे जन्मशताब्दी वर्ष २०१२ साजरे करण्याच्या निमित्ताने शासनाने निर्णय क्रमांक मकृवि, २०११/प्र. क्र. १०/७ अे दिनांक १६.०७.२०१३ कराड येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय मंजूर केले. या महाविद्यालयाचे अभ्यास क्रमांचे कामकाज हे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून कृषि संशोधन केंद्र कराड येथे नियमितपणे सुरु झाले.

### २.२.६ कृषि महाविद्यालय, नंदुरबार

नंदूरबार जिल्ह्याची निर्मिती दिनांक ०१.०७.१९९८ रोजी धुळे जिल्ह्यातून झाली आहे. नंदूरबार जिल्ह्यामध्ये एकूण सहा तालुके आहेत. महाराष्ट्राच्या उत्तरेला आदिवासी भागामध्ये नंदूरबार जिल्हा वसलेला आहे. नंदूरबार जिल्ह्यातील २८.३० टक्के जमीन ओलीताखाली आहे. कृषि महाविद्यालय, नंदूरबारची स्थापना सन २०१३-१४ साली होऊन विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ६० इतकी आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी ८० टक्के प्रवेश राखीव आहेत.

### २.२.७ विना अनुदानित कृषि महाविद्यालये

कृषि क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेऊन सन २००१ पासून महाराष्ट्र शासनाने विना अनुदानित तत्वावर कृषि व संलग्न पदवी महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे. अहवाल वर्षात विद्यापीठांतर्गत कृषि- २४, उद्यानविद्या -०४, अन्नशास्त्र व तत्रज्ञान -०४, कृषि व्यवसाय व्यवस्थापन -०६, कृषि जैवतंत्रज्ञान -०६, कृषि अभियांत्रिकी -०४, पशुसंवर्धन महाविद्यालय ०१ असे एकूण ४९ विना अनुदानित कृषि व कृषि संलग्न पदवी महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

## २.३ पदव्युत्तर शिक्षण कार्यक्रम

महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर कार्यक्रम राहुरी, पुणे, धुळे व कोल्हापूर येथे आहे. विद्यापीठात एम.एस्सी. (कृषि) व आचार्य (पी.एच.डी.) अभ्यासक्रम उपलब्ध आहे. एम.एस्सी. (कृषि) प्रवेशाकरीता महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परीक्षा मंडळ, पुणे मार्फत सामुदायिक प्रवेश परीक्षा घेतली जाते.

### २.३.१ एम. एस्सी.(कृषि)

एम. एस्सी.(कृषि) दोन वर्षाचा अभ्यासक्रम असून चार सत्रात विभागलेला आहे. एम. एस्सी.(कृषि) करीता एकूण ५५ क्रेडिट आहेत. यातील ३५ क्रेडिट विषय अभ्यासक्रमाकरीता व २० क्रेडिट संशोधना करीता आहेत. या अभ्यासक्रमात प्रत्येक विद्यार्थी त्यास मिळालेल्या विषयात प्राविण्य मिळवतो. प्रत्येक विद्यार्थ्याकरीता ४-५ प्राध्यापकांची एक विद्यार्थी सल्लागार समिती असून ती विद्यार्थ्यांना संशोधनाचा विषय निवडण्यास व संशोधनाकरीता मार्गदर्शन करते. सर्व क्रेडिट पूर्ण केल्यानंतर व संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर विद्यार्थी एम. एस्सी.(कृषि) पदवीकरीता पात्र ठरतो. एम. एस्सी. पदवी पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे १८ विषयात, कृषि महाविद्यालय, पुणे येथे १० विषयात, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे ४ विषयात व कृषि महाविद्यालय, धुळे येथे ५ विषयात, एम.एस्सी. पदवी कार्यक्रम घेण्यात येतो.

### २.३.२ आचार्य (पी.एच.डी.)

आचार्य पदवी अभ्यासक्रम ३ वर्षाचा असून सहा सत्रात विभागलेला आहे. पी.एच.डी. करीता एकूण ७५ क्रेडिट आहेत. यातील ३० क्रेडिट विषय अभ्यासक्रमाकरीता व ४५ क्रेडिट संशोधना करीता आहेत. आचार्य पदवी मध्ये संशोधन हा मुख्य गाभा असून विद्यार्थी प्रयोगशाळेत, शेतावर विविध पिकांवर संशोधन कार्य हाती

घेतात तसेच काही विषयात शेतकऱ्यांच्या शेतावर सर्वेक्षण करुन माहिती जमा करतात. विद्यार्थ्यास मार्गदर्शन करण्याकरीता पाच प्राध्यापकांची एक विद्यार्थी सल्लागार समिती असते. विद्यार्थ्याचा संशोधन प्रबंध भारतातील कृषि विद्यापीठातील संबंधित विषयातील दोन कृषि तज्ज्ञांकडे मुल्यांकनासाठी पाठविण्यात येतो. पी.एच.डी. अभ्यासक्रम पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी येथे १८ विषयात, कृषि महाविद्यालय, पुणे येथे ०१ विषयात उपलब्ध आहे.

## २.४ पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी




पदव्युत्तर महाविद्यालयाची स्थापना १९७२ मध्ये झाली. या संस्थेत कृषि संलग्न १८ विषयांमध्ये एम.एस्सी. (कृषि) अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्याचबरोबर पी.एच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, वनस्पती शरीर क्रिया शास्त्र , बियाणे शास्त्र व तंत्रज्ञान, कृषि जैवतंत्रज्ञान, मृदशास्त्र व कृषि रसायन, कृषि अर्थशास्त्र, विस्तार शिक्षण, कृषि कीटकशास्त्र, उद्यानविद्या, (फळशास्त्र, भाजीपालाशास्त्र) वनस्पती रोगशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, पशुविज्ञान, दुग्धशास्त्र, अन्नशास्त्र, जीवरसायन शास्त्र, आंतरविद्याशाखा जलसिंचन या विषयात उपलब्ध आहे. प्रत्येक विषयाकरीता सोयी सुविधा युक्त प्रशस्त प्रयोगशाळा आहे. विद्यार्थी संशोधनाकरीता जैवतंत्रज्ञान संशोधन केंद्र, सुक्ष्म अन्नद्रव्य प्रयोगशाळा, अखिल भारतीय उर्वरित कीडनाशक अंश पृथःकरण प्रयोगशाळा, काढणी पश्चात प्रयोगशाळा, बेकरी प्रकल्प, जैविक कीडनाशक उत्पादन प्रकल्प, उत्तीसंवर्धन, जैविक खत उत्पादन प्रयोगशाळा, गोठीत वीर्य प्रयोगशाळा इत्यादींचा वापर करतात. या व्यतिरिक्त शेतावर संशोधन करण्याकरीता संस्थेकडे ५६.२१ हेक्टर क्षेत्र आहे. तसेच उद्यानविद्या, औषधी व सुगंधी वनस्पती, जलसिंचन व्यवस्थापन प्रक्षेत्राचा उपयोग संशोधनाकरीता विद्यार्थी करतात

## २.५ कृषि महाविद्यालय, पुणे

कृषि महाविद्यालय, पुणे येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम दहा विषयामध्ये उपलब्ध आहे. तर पी.एच.डी अभ्यासक्रम एक विषयात उपलब्ध आहे. कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, मृदशास्त्र व कृषि रसायन, विस्तार शिक्षण, कृषि कीटकशास्त्र, उद्यानविद्या, वनस्पती रोगशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, पशुविज्ञान व कृषि हवामानशास्त्र या विषयात उपलब्ध आहे. पी.एच.डी अभ्यासक्रम कृषि हवामानशास्त्र विषयात उपलब्ध आहे.

## २.६ कृषि महाविद्यालय, धुळे

कृषि महाविद्यालय, धुळे येथे २००९-१० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. अनुवंश व रोप पैदास शास्त्र, फळशास्त्र, पशुविज्ञान, मृदशास्त्र व रसायनशास्त्र , कृषि कीटकशास्त्र, वनस्पती रोगशास्त्र या चार विषयात धुळे महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे

## २.७ कृषि महाविद्यालय, कोल्हापूर

कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे २००९-१० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. सध्या कृषि विद्या, अनुवंश व रोप पैदास शास्त्र, विस्तार शिक्षण, कृषि अर्थशास्त्र, कृषि अनुजीवशास्त्र, मृदशास्त्र व रसायनशास्त्र व कृषि कीटकशास्त्र या सात विषयात कोल्हापूर महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

## २.८ कृषि अभियांत्रिकी शाखा

कृषि अभियांत्रिकी शाखामार्फत विविध क्षेत्रातील शैक्षणिक गरज भागविली जाते. यात प्रामुख्याने सुक्ष्म जलसिंचन, कृषि यंत्रे व शक्ति, मृद व जलसंधारण, कृषि प्रक्रिया, फळे व भाजीपाला साठवणूक व प्रक्रिया, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, हरितगृह, पॉलिहाऊस उभारणी व देखभाल, संगणकाचा कार्यक्षम वापर, रिमोट सेन्सींग, इत्यादी बाबींवर ज्ञानदान करण्यात येते. या शाखेअंतर्गत एक घटक व तीन विनाअनुदानित महाविद्यालय कार्यरत आहेत. या सर्व महाविद्यालयात चार वर्षाचा बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) अभ्यासक्रम उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रम १८३ क्रेडिटचा आहे. या व्यतिरिक्त घटक महाविद्यालयामध्ये चार शाखांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी) उपलब्ध आहे.

### २.८.१ डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी

कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी १९६९ मध्ये स्थापन झाले. कृषि अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम चार वर्षाचा असून तो आठ




या व्यतिरिक्त सन १९८२ पासून कृषि यंत्रे व शक्ती विभाग, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी

विभाग, व कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी हा चार विभागांमध्ये एम.टेक. (कृषि अभियांत्रिकी) पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता खालील प्रकल्पांचा उपयोग होतो. अखिल भारतीय जमिनीखालील पाण्याचा विहिरी व पंपसेट व्दारे वापर, कृषि यंत्रे व औजारे प्रकल्प, रिमोट सेन्सींग प्रयोगशाळा, ट्रॅक्टर प्रशिक्षण प्रयोगशाळा, शाश्वत शेती सुधार प्रकल्प इत्यादी.

### २.८.२ विना अनुदानित कृषि अभियांत्रिकी महाविद्यालये

बी.टेक.(कृषि अभियांत्रिकी) पदवी अभ्यासक्रम विद्यापीठ कार्यक्षेत्रात जळगाव, नाशिक तळसंदे (कोल्हापूर) व कराड या चार कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात उपलब्ध आहे.

### २.८.३ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम

कृषि क्षेत्रात झपाटयाने होत असलेल्या स्थित्यंतरामुळे कृषि पदविका अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. त्यामुळे विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये मुलभुत बदल करण्यात आले. पीक संरक्षण, कृषि अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान व कृषि व्यवसाय व्यवस्थापन या नवीन विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. या शिक्षणामधून उत्कृष्ट शेती करण्यासाठी खते, बीयाणे, औषधे यांच्या कारखानदारीसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार होत आहे. तसेच स्वयंरोजगार निर्मिती साठीच्या आत्मविश्वास या कृषि पदविकाधारकांमध्ये निर्माण झाला आहे. या विद्यापीठ अंतर्गत १० जिल्हयांमध्ये ९ घटक व ८५ विनाअनुदानीत संलग्न अशी एकूण ९४ कृषि तंत्र विद्यालये आहेत. त्यामध्ये एकूण प्रवेश क्षमता ५६४० आहे. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ५१७४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. तसेच ३६९० विद्यार्थ्यांनी कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम, मे २०१० मध्ये पुर्ण केलेला आहे.

### २.८.४ प्रमाणपत्र अभ्यासक्रम

एक वर्षाचा माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठांतर्गत चार ठिकाणी शिकविला जात असुन त्याची एकूण प्रवेश क्षमता १६० आहे. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ९४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असुन ७४ विद्यार्थ्यांनी माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम पुर्ण केलेला आहे.

### कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या कार्यक्षेत्रात मध्यवर्ती परिसर, घटक कृषि महाविद्यालय व संशोधन केंद्र येथे व्ही - सॅट व लिज लाईन १ जी.बी. क्षमतेची संचार सेवा उपलब्ध आहे. यामध्ये ई- पुस्तकालय सेवा आठरा तास विद्यार्थ्यांना चारशे नोट्स मधून अव्याहत पणे टेबल सेवा उपलब्ध आहे. तसेच मध्यवर्ती परिसर येथे व्हीडीओ कॉनफरंनसिंग ३ व इतर ८ ठिकाणी (कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे, कोल्हापूर विभागीय कृषि संशोधन केंद्र इगतपूरी व सोलापूर व कृषि संशोधन केंद्र कसबे डिग्रज, पाडेगाव व जळगाव) उपलब्ध आहे. संपूर्ण प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथून कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्रातील एकात्मीक संगणकाने नियंत्रित केला जातो. कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र पूर्णत: विद्यापीठ आख्यारित असल्याने कोणत्याही वेळी ५०० शास्त्रज्ञ / शेतकरी प्रशिक्षीत करता येतात. याच केंद्रामधून विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण व संशोधनात्मक उपयोगिता वाढविता येते. वरील सर्व सेवा अद्यावत, गतिमान व प्रसारमाध्यमात सांगड घालणाऱ्या आहेत. या सर्व सेवा भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथून विशेष अनुदान प्राप्त आहे.

### विद्यापीठ ग्रंथालय




विद्यार्थ्यांच्या व वाचकांच्या शिक्षण, संशोधन व प्रसारण कार्यामध्ये ज्ञानदान व माहिती पुरविण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालय करते. वाचकांच्या गरजा पुरविण्यासाठी सन १९७१ पासून मध्यवर्ती परिसरात ग्रंथालय कार्यरत झाले. गेल्या चार दशकापासून मा.अध्यक्ष, ग्रंथालय सल्लागार समिती यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालयाची समृध्द होत असून, शास्त्रज्ञ, वाचक, शिक्षक यांना अविरत सेवा देत आहे. सध्याच्या माहिती व तंत्रज्ञान युगात ग्रंथालयाच्या सेवेमध्ये आमुलाग्र बदल झालेले आहेत. पारंपारिक सेवेसोबत सध्या ग्रंथालयात इंटरनेट, ई-मेल सेवा, सीडी रोम शोध सेवा, ई-नियतमालीके, सेरा, माहिती व तंत्रज्ञानावर आधारित सेवा देण्यात येतात.

### ग्रंथालय अनुदान

मध्यवर्ती परिसर राहुरी येथील ग्रंथालयासाठी सन २०१३-१४ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून वेतनासाठी रु. ३८.४२ लक्ष व आकस्मिक खर्चासाठी रु. ७.०७ लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले. तसेच कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्याकडून २०.०० लक्ष. तसेच ई-ग्रंथ योजनाकरिता ५.८३ लक्ष प्राप्त झाले आहे. असे एकूण रु. ७१.३२ लक्षचे अनुदान ग्रंथालयास अहवाल वर्षात उपलब्ध झाले.

### पुस्तके आणि नियतकालीके संपादन

### नियतकालीके व पुस्तक खरेदी

अहवाल वर्षात १५९७ पुस्तके, २२३ नियत, ३२५ प्रबंधे यांची ग्रंथसंग्रहात भर पडली आणि ३१.०३.२०१४ रोजी एकूण ग्रंथसंख्या १,१४,४२९ इतकी झाली. ग्रंथालयाने १५० भारतीय नियकालिकांची वर्गणी भरली. जर्नल ऑफ महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल युनिव्हरसिटीच्या

अदलाबदल कार्यक्रमांतर्गत १८ नियतकालीके प्राप्त झाली आहेत. तसेच ४० नियतकालीके भेट म्हणून प्राप्त झाली आहेत.

### ग्रंथालय सेवा

### मुक्तद्वार पध्दत

ग्रंथालयाने मुक्तद्वार पध्दत अवलंबिली असून त्यामध्ये वाचकांना ग्रंथसंग्रह हाताळण्यास संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

### वाचकांसाठी पुस्तके

अहवाल वर्षात १७,७०३ पुस्तके वाचकांना घरी वाचनासाठी देण्यात आली. तसेच ग्रंथालयात ३७,११९ पुस्तके हाताळण्यात आली.

### आंतर ग्रंथालयीन आदान-प्रदान

आंतर ग्रंथालयीन पुस्तकांची देवाण-घेवाण, सुविधा उपलब्ध करण्यात आली. त्या अंतर्गत उपलब्ध नसलेली पुस्तके दुसऱ्या ग्रंथालयाकडून तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेता येतात.

### पुनआलेख सेवा (झेरॉक्स)

विद्यापीठ ग्रंथालयात गरजूंना सवलतीच्या दरात झेरॉक्स सेवा उपलब्ध करुन देण्यात येते. अहवाल वर्षात २३.६३५ छायांकित प्रती काढून देण्यात आल्या व त्यापोटी रु. ५,७७८ महसूली रक्कम जमा करण्यात आली.

### वाचन कक्ष

* विद्यार्थ्यांनी वाचनकक्ष सेवेस चांगला प्रतिसाद दिला. अहवाल वर्षात १,१६,४०३ वाचकांनी वाचनकक्षास भेट देऊन या सेवेचा लाभ घेतला.
* माहिती तंत्रज्ञान सेवेअंतर्गत खालील सुविधा उपलब्ध आहेत.
* इंटरनेट सेवा
* सीडी रोम डेटाबेसेस
* सेरा (कन्सॉरशियम ऑफ ई-रिसोर्ससेस इन ॲग्रीकल्चर)
* ई-जर्नल्स्, ऑनलाईन ई-जर्नल्स्
* सांख्यिकी डेटाबेस
* ई-थेसीस ॲब्स्ट्रॅक्टस डेटाबेस
* दुरदर्शन संच/व्हि.सी.आर.
* कृषि प्रभा
* ई-ग्रंथ प्रकल्प

### पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन स्मृतीदिन

अहवाल वर्षात विद्यापीठ ग्रंथालयात २७ सप्टेंबर हा दिवस पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन, स्मृतिदिन म्हणून पाळण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बोरकर, सहयोगी अधिष्ठाता, (प. म.) व डॉ. उल्हास जाधव, विद्यापीठ ग्रंथपाल, कर्नाटका व्हेटरनरी युनिव्हर्सिटी, बिदर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

### एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन




विद्यापीठ ग्रंथालय ई-ग्रंथ योजनेअंतर्गत ग्रंथालयाच्या सेवा व सुविधा यांचे बळकटीकरण एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मफुकृवि, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालयांचे एकूण ४५ ग्रंथपाल या कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते.

### ओपॅक (ऑनलाईन सार्वजनिक प्रवेश यादी)



विद्यापीठ ग्रंथालयाने विद्यार्थी व कर्मचारी यांचेकरिता दोन किऑस्क उपलब्ध करुन ओपॅक (ऑनलाईन सार्वजनिक प्रवेश यादी) ची मांडणी ग्रंथालयात केली आहे.

### व्हिजीटर्स

अहवाल वर्षात ४९४७४ वाचकांनी तसेच २१५९ एकूण (५१६३३) कर्मचाऱ्यांनी ग्रंथालयास भेट दिली. इतर विद्यापीठे व

संस्था मधून आलेल्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन संदर्भ संकलनासाठी ग्रंथालय सेवेचा लाभ घेतला.

**विद्यापीठाच्या शैक्षणिक संस्था**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| **अ) घटक महाविद्यालये** | | | |
| १. | पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी | पी.एच.डी. | ७२ |
| | | एम.एस्सी. (कृषि) | १६८ |
| | | एम.एस्सी. (उद्यानविद्या) | १२ |
| | | एम.एस्सी. (जैव तंत्रज्ञान) | ८ |
| २. | कृषि महाविद्यालय, पुणे | एम.एस्सी. (कृषि) | ५४ |
| | | एम.एस्सी. (उदयानविद्या) | ६ |
| | | एम.एस्सी. (कृषि व्यवसाय व व्यवस्थापन) | ३० |
| | | बी.एस्सी. (कृषि) | १९० |
| ३. | कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | एम.एस्सी. (कृषि) | ४२ |
| | | एम.एस्सी. (उद्यानविद्या) | ४ |
| | | बी.एस्सी. (कृषि) | १९० |
| ४. | कृषि महाविद्यालय, धुळे | एम.एस्सी. (कृषि) | २४ |
| | | एम.एस्सी. (उद्यानविद्या) | ४ |
| | | बी.एस्सी. (कृषि) | १२८ |
| ५. | कृषि महाविद्यालय, कराड | बी.एस्सी. (कृषि) | ६० |
| ६. | कृषि महाविद्यालय, नंदुरबार | बी.एस्सी. (कृषि) | ६० |
| ७. | उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | ३२ |
| ८. | डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी | पी.एच.डी. | ९ |
| | | एम.टेक (कृषि अभियांत्रिकी) | १६ |
| | | बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) | ६४ |
| **ब)विना अनुदानीत महाविद्यालये** | | | |
| १ | कृषि महाविद्यालय, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| २ | कृषि महाविद्यालय, कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती, मु.पो. शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ३ | कृषि महाविद्यालय, भारती विद्यापीठ, कडेगांव, जि.सांगली. | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ४ | कृषि महाविद्यालय, कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील मराठा विद्या प्रसारक, नाशिक,शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ५ | कृषि महाविद्यालय, कृष्णा सहकारी साखर कारखाना लि.रेठरे बु.।।, मु.पो. शिवनगर, ता. कराड, जि.सातारा | बी.एस्सी.(कृषि) | १२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | कृषि महाविद्यालय, मूळा एज्यूकेशन सोसायटी, सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ७ | कर्मवीर काकासाहेब वाघ कृषि महाविद्यालय, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ८ | कृषि महाविद्यालय, राजमाची, ता.कराड, जि.सातारा. | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ९ | डॉ. उल्हास पाटील कृषि महाविद्यालय, जळगांव, जि. जळगांव | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| १० | डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, आंबी, ता. मावळ, जि.पुणे | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| ११ | कृषि महाविद्यालय, पुज्य साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, शहादा, ता.शहादा, जि.नंदूरबार | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| १२ | कृषि महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १३ | डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, तळसंदे ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | बी.एस्सी.(कृषि) | १२० |
| १४ | कृषि महाविद्यालय, फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि. सातारा | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १५ | कृषि महाविद्यालय, नवलभाऊप्रतिष्ठाण, नवलनगर, मु.पो. अमळनेर,जि. जळगांव | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १६ | कृषि महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १७ | कृषि महाविद्यालय, श्री. संत गजानन महाराज ग्रामिण विकास प्रतिष्ठाण, मु.पो. मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १८ | कृषि महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| १९ | कृषि महाविद्यालय, बाभुळगाव, ता.येवला, जि. नाशिक | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २० | कृषि महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २१ | साईकृपा कृषि महाविद्यालय, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २२ | कृषि महाविद्यालय, जैनापूर, जि. कोल्हापूर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २३ | कृषि महाविद्यालय, पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २४ | कृषि महाविद्यालय, विळदघाट, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(कृषि) | ६० |
| २५ | उद्यानविद्या महाविद्यालय, फलटण एज्यूकेशन सोसायटी ता.फलटण, जि.सातारा | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | ८० |
| २६ | उद्यानविद्या महाविद्यालय, कडेगाव, जि. सांगली | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | ४० |
| २७ | क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | ४० |
| २८ | मुरलीधर स्वामी उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगांव, जि. नाशिक | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | ४० |
| २९ | कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, गोदावरी फौंडेशन जळगांव, गोदावरी हॉस्पिटल बिल्डींग, ता.जि. जळगांव | बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) | ८० |
| ३० | कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील एज्यूकेशन सोसायटी, तळसंदे ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. | बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) | ८० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, कर्मवीर काकासाहेब वाघ एज्यूकेशन सोसायटी, नाशिक, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) | ८० |
| ३२ | सह्याद्री कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, यशवंतनगर, कराड, जि. सातारा | बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी) | ४० |
| ३३ | मीराज एम आय टी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी काळभोर, जि.पुणे | बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान) | ८० |
| ३४ | मोकाशी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, राजमाची, ता. कराड, जि.सातारा | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ८० |
| ३५ | अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, के.के. वाघ एज्युकेशन सोसायटी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ४० |
| ३६ | अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.टेक. (अन्न व तंत्रज्ञान) | ४० |
| ३७ | जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ८० |
| ३८ | जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, जि. नाशिक | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ८० |
| ३९ | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो. वडाळा, जि. सोलापूर | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ४० | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, मु.पो. पौड, ता. मुळशी, जि. पुणे | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ४१ | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, राजलक्ष्मी फाउंडेशन, मदडगाव, पो. भातोडी, जि. अहमदनगर | बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ४२ | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, विद्या प्रतिष्ठाण, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ४३ | कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डॉ.डी.वाय. पाटील प्रतिष्ठान, आकुर्डी, जि. पुणे | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ८० |
| ४४ | कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ८० |
| ४५ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विलींगडन कॉलेज कॅम्पस, विश्राम बाग, सांगली | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ४० |
| ४६ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ४० |
| ४७ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ४० |
| ४८ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.एस्सी. (कृषि पणन व्यवसाय व्यवस्थापन) | ४० |
| ४९ | पशुसंवर्धन महाविद्यालय, बारामती जि.पुणे | बी.एस्सी. (पशुसंवर्धन) | ३० |

| क) कृषि पदविका | | | |
|---|---|---|---|
| १. | घटक कृषि तंत्र विद्यालय, मांजरीफार्म (पुणे), कोल्हापूर, धुळे, बोरगांव (सातारा), सोलापूर, डिग्रस (सांगली), पुणतांबा (अहमदनगर), मालेगांव (नाशिक), जळगांव | कृषि पदविका | ६० (प्रत्येकी) |
| २. | कृषि तंत्र विद्यालय, मांजरी (पुणे) (मुलींचे) | कृषि पदविका | ६० |
| ३. | मान्यता प्राप्त खाजगी कृषि तंत्र निकेतने, (एकूण-८५) | कृषि तंत्रज्ञान पदविका | ६० (प्रत्येकी) |
| ४. | माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, पुणे | प्रमाणपत्र | ४० |
| ५. | मान्यता प्राप्त माळी प्रशिक्षण केंद्र, (एकूण-४) | प्रमाणपत्र | ४० (प्रत्येकी) |

## सन २०१३-१४ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रमाचे नांव | सन २०१३-१४ मध्ये अभ्यासक्रम पुर्ण केलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| | | शासकीय व संलग्न |
| अ. पदवी अभ्यासक्रम | | |
| १ | बी. एस्सी (कृषि) | १५२६ |
| २ | बी. एस्सी (उद्यानविद्या) | ८३ |
| ३ | बी. टेक (कृषि अभियांत्रिकी) | १९९ |
| ४ | बी. टेक (अन्नशास्त्र) | १७३ |
| ५ | बी. एस्सी (जैव तंत्रज्ञान) | १७५ |
| ६ | बी. एस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) | १९१ |
| | एकूण | २३४७ |
| ब. पदव्युत्तर अभ्यासक्रम | | |
| १ | एम. एस्सी (कृषि) | २९५ |
| २ | एम. एस्सी (उद्यानविद्या) | १९ |
| ३ | एम. टेक (कृषि अभियांत्रिकी) | १९ |
| ४ | पी. एच. डी. | ४२ |
| ५ | एम. बी. एम. (कृषि) | २१ |
| ६ | एम. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान | ०३ |
| | एकूण | ३९९ |

## पदव्युत्तर महाविद्यालय वर्गनिहाय विद्यार्थी संख्या

| अ. क्र. | विभागाचे नांव | एम. एस्सी. (कृषि) | | | | पी. एच. डी. | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम | | द्वितीय | | प्रथम | | द्वितीय | | |
| | | नियमीत | सेवांतर्गत विद्यार्थी | नियमीत | सेवांतर्गत विद्यार्थी | नियमीत | सेवांतर्गत विद्यार्थी | नियमीत | सेवांतर्गत विद्यार्थी | |
| १ | कृषि विद्या | ३१ | १ | ३१ | १ | ६ | ३ | ६ | ३ | ८२ |
| २ | अनुवंश व रोप पैदास शास्त्र | ३१ | - | ३१ | - | ६ | - | ६ | - | ७४ |
| ३ | रोप शरीर शास्त्र | ६ | - | ६ | - | ४ | - | ४ | - | २० |
| ४ | बीज तंत्रज्ञान | ९ | - | ९ | - | ४ | - | ४ | - | २६ |
| ५ | कृषि अर्थशास्त्र | २१ | - | २१ | - | ४ | २ | ४ | २ | ५४ |
| ६ | विस्तार शिक्षण | ३१ | १ | ३१ | १ | ४ | १ | ४ | १ | ७४ |
| ७ | पशुसंवर्धन | १५ | - | १५ | - | ४ | - | ४ | - | ३८ |
| ८ | दुग्धशास्त्र | ६ | - | ६ | - | ४ | - | ४ | - | २० |
| ९ | कृषि किटकशास्त्र | ३१ | - | ३१ | - | ६ | १ | ६ | १ | ७६ |
| १० | वनस्पती रोगशास्त्र | २१ | - | २१ | - | ६ | ४ | ६ | ४ | ६२ |
| ११ | कृषि सुक्ष्म जीवशास्त्र | १८ | - | १८ | - | ४ | - | ४ | - | ४४ |
| १२ | मृदशास्त्र व कृषि रसायन शास्त्र | ३१ | - | ३१ | - | ४ | २ | ४ | २ | ७४ |
| १३ | जैव रसायन शास्त्र | ९ | - | ९ | - | - | - | - | - | १८ |
| १४ | अन्न आणि तंत्रज्ञान | ९ | - | ९ | - | २ | - | २ | - | २२ |
| १५ | सिंचन जलव्यवस्थापन | ९ | - | ९ | - | २ | १ | २ | १ | २४ |
| १६ | कृषि हवामानशास्त्र | ६ | - | ६ | - | २ | - | २ | - | १६ |
| १७ | फळशास्त्र | ६ | - | ६ | - | ४ | - | ४ | - | २० |
| १८ | भाजीपाला शास्त्र | ६ | - | ६ | - | ४ | १ | ४ | १ | २२ |
| १९ | फुल शेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | ६ | - | ६ | - | - | - | - | - | १२ |
| २० | कृषि प्रक्रिया व अभियांत्रिकी | ४ | - | ४ | - | ३ | - | ३ | - | १४ |
| २१ | कृषि यंत्रे आणि शक्ती | ४ | - | ४ | - | ३ | - | ३ | - | १४ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | सिंचन व निचरा अभियांत्रिकी | ४ | – | ४ | – | ३ | – | ३ | – | १४ |
| २२ | मृद व जलसंधारण अभियांत्रिकी | ४ | – | ४ | – | ३ | – | ३ | – | १४ |
| | एकूण | ३१४ | २ | ३१४ | २ | ८२ | १५ | ८२ | १५ | ८२६ |

## पदव्युत्तर महाविद्यालय वर्गनिहाय विद्यार्थी संख्या

| अ. क्र. | विभागाचे नांव | एम. एस्सी. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम | | द्वितीय | |
| | | मुले | मुली | मुले | मुली |
| १. | कृषि विद्या | १७ | ०१ | १५ | ०१ |
| २. | कोषाणुवंशकीय व रोप पैदास शास्त्र | १४ | ०२ | १२ | ०२ |
| ३. | वनस्पती शरीर क्रिया शास्त्र | ०६ | -- | ०४ | ०० |
| ४. | बियाणे शास्त्र व तंत्रज्ञान | ०७ | ०३ | ०६ | ०३ |
| ५. | मृदशास्त्र व कृषि रसायन शास्त्र | ०९ | ०७ | ०७ | ०७ |
| ६. | कृषि कीटकशास्त्र विभाग | १४ | ०२ | १२ | ०२ |
| ७. | विस्तार शिक्षण विभाग | १४ | ०४ | १४ | ०४ |
| ८. | कृषि अर्थशास्त्र विभाग | १० | ०७ | १० | ०७ |
| ९. | वनस्पती रोगशास्त्र | ०७ | १० | ०९ | ०६ |
| १०. | कृषि अणुजीवशास्त्र विभाग | ०२ | ०५ | ०२ | ०३ |
| ११. | पशुविज्ञान | ०९ | ०२ | ०९ | ०१ |
| १२. | दुग्धशास्त्र विभाग | ०४ | ०३ | ०४ | ०३ |
| १३. | अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग | ०७ | ०४ | ०७ | ०४ |
| १४. | जीव रसायन शास्त्र विभाग | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| १५. | आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग | ०८ | ०४ | ०७ | ०४ |
| १६. | फळशास्त्र | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| १७. | भाजीपाला शास्त्र | ०३ | ०२ | ०३ | ०२ |
| १८. | जैवतंत्रज्ञान विभाग | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| | एकूण | १४४ | ६८ | १३७ | ५७ |

## कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थी संख्या

| | शासकीय | संलग्न |
|---|---|---|
| कृषि पदविका अभ्यासक्रम | ४५९ | २८२० |
| माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशखिंड, पुणे | ३५ | – |
| मान्यता प्राप्त माळी प्रशिक्षण केंद्र (एकूण – ४) | – | ६८ |

## ३. संशोधन



पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असून ते कोकणालगतचा पश्चिम घाट, पूर्वेकडील डोंगरउताराचा उपपर्वतीय विभाग, मैदानी विभाग आणि सोलापूरपासून धुळ्यापर्यंत विखुरलेला अवर्षणप्रवण विभाग असे चार कृषि हवामान विभाग आहेत. शिवाय मध्यवर्ती पठारी विभागातील हमखास पावसाचा जळगांव जिल्हा या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतो. या दहा जिल्ह्यातील जमीन, हवामान, पीक पद्धती, पशुधन आणि शेतीशी निगडीत इतर जोडधंद्यांसंबंधीच्या समस्यांवरील कृषि हवामान विभागातील २७ संशोधन केंद्रांवर संशोधन केले जाते, या विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसराशिवाय चार विभागीय कृषि संशोधन केंद्रे, इगतपूरी, पुणे, कोल्हापूर व सोलापूर, ४ राज्यस्तरीय विषय विशेषज्ञ जळगाव-तेलबिया, पाडेगांव-ऊस, निफाड-गहू आणि सोलापूर-मृद आणि इतर १८ संशोधन केंद्रे आणि कृषि महाविद्यालये येथे राज्य शासन अनुदानित ७६ योजनेतर योजना राबविल्या जात आहेत. तसेच अखिल भारतीय समन्वीत योजनेअंतर्गत एकूण ५१ संशोधन प्रकल्प विद्यापीठात कार्यरत आहेत. शिवाय भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून १०० टक्के अनुदान मिळणारे २ नेटवर्क संशोधन प्रकल्प व पंढरपूरी म्हैस नेटवर्क प्रकल्प, केंद्र पुरस्कृत १०० टक्के अनुदानीत ५ संशोधन प्रकल्प राबविले जात आहेत. याशिवाय स्थानिक समस्यांवर आधारीत व मुख्य संशोधन प्रकल्पांस पूरक असे एकुण ३७ तदर्थ योजना विविध संस्थांच्या अनुदानावर राबविण्यात येत आहेत तसेच राष्ट्रीय फलोदयान अभियांनांतर्गत १२ प्रकल्प या विद्यापीठात चालू आहेत.

गेल्या ४५ वर्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने भरीव संशोधन करुन विविध अन्नधान्ये, कडधान्ये, गळीतधान्ये या पिकांचे तसेच कापूस, ऊस, भाजीपाला, फळे, फुले आणि चारा पिकांचे अनेक वाण (२२६ पेक्षा जास्त) विकसीत केले आहेत. यापैकी अनेक वाण राज्यातच नव्हे तर राज्याबाहेरही प्रसारित करण्यात आले. मृद व जलसंधारण, विविध पिके आणि पीक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, आंतरमशागत, तण,रोग आणि किडींचे एकात्मिक व्यवस्थापन, सुधारीत औजारे, हरीतगृहातील शेती, प्रक्रिया आणि विपणन याविषयी सखोल संशोधन करुन अनेक शिफारशी देण्यात आल्या. राज्यातील मर्यादित सिंचन सुविधा लक्षात घेऊन कोरडवाहू शेती तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात आला. मृद आणि जलसंधारणाच्या पध्दती, जमीन, पाऊसमान आणि हंगामानुसार पीक व्यवस्थापन, मध्य हंगाम दुरुस्ती, पडणाऱ्या पाऊस पाण्याचा अधिक कार्यक्षमतेने वापर करणाऱ्या पिकांचे सुधारित वाण आणि पीक पध्दती विकसित करणे आणि पाणलोट क्षेत्रातील पाणी आडवून त्याचा उत्पादन वाढीसाठी जास्तीत जास्त क्षमतेने वापर करणे याविषयी बहुमोल संशोधन करण्यात आले.

विद्यापीठाने जैवतंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कार्य केले असून वनस्पती ऊती संवर्धन, अणुजीवशास्त्र, जैविक कीड नियंत्रण व जीवाणू खते यामध्ये जैवतंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

अहवाल वर्षात विद्यापीठाने विकसीत केलेले निरनिराळया ५ पिकांचे वाण व २ कृषि औजारे प्रसारीत केले असून शेतकऱ्यांकरीता वेगवेगळया पिकांवर पीक पध्दतीवर, संरक्षण आणि प्रक्रियावर आधारित ५४ सुधारीत तंत्रज्ञानाच्या शिफारशी दिल्या.

**विद्यापीठात कार्यरत विभागीय, राज्य पातळीवरील प्रमुख कृषि संशोधन केंद्रे व तपासणीसाठीची संशोधन केंद्रे**

| अ. क्र. | कृषि संशोधन केंद्र | मुख्य कार्य | तपासणी कार्य |
|---|---|---|---|
| **अ) पश्चिम घाट विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपूरी, जि. नासिक | भात, कारळा, वनीय कुरण, मृद व जलसंधारण | रबी कडधान्ये, फलोद्यान, रागी, कॉफी, हळद |
| २. | कृषि संशोधन केंद्र, लोणावळा, जि. पुणे | भात (रोग व निदान) | - |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, महाबळेश्वर, जि. सातारा | गहू (तांबेरा रोग) | भाजीपाला |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, राधानगरी, जि.कोल्हापूर | कोरडवाहू भात | गहू, वाल |

| | | | |
|---|---|---|---|
| **ब. उप-पर्वतीय विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर | ऊस, मका, पंढरपुरी म्हैस | गवत, कोरडवाहू फळे, भाजीपाला, सोयाबीन, भुईमूग, सेंद्रीय भाजीपाला शेती |
| २. | विभागीय ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर | ऊस, गूळ | ऊस आधारीत पीक पध्दती |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | सेंद्रीय शेती, बासमती तांदुळ | ज्वारी खरीप, कडधान्ये, मिरची व गळीत धान्य |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, कराड, जि. सातारा | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पीक पध्दती | कडधान्ये, मका, खरीप ज्वारी, सोयाबीन, सुर्यफुल, भुईमूग |
| ५. | कृषि संशोधन केंद्र, वडगांव मावळ, जि. पुणे | भात | भात आधारीत पीक पध्दती |
| **क. मैदानी प्रदेश विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे | फळे,भाजीपाला, फुले, राजमाबीन, मसाल्याचे पदार्थ | कडधान्ये, गळीतधान्य, गहू |
| २. | कृषि संशोधन केंद्र, डिग्रज, जि. सांगली | हळद, सोयाबीन, भुईमूग, पानवेल,खारवट जमीन सुधारणा | खरीप ज्वारी, कडधान्य, ऊस, शर्करा कंद |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, निफाड, जि. नासिक | गहू, गहू आधारीत पीक पध्दती | बाजरी, कडधान्य व तेलबिया |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, पिंपळगांव बसवंत, जि. नासिक | द्राक्षे, कांदा व लसूण | डाळिंब, भाजीपाला |
| **ड. अवर्षण प्रवण विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर | कोरडवाहू शेती, सुर्यफुल, करडई व कृषि हवामान शास्त्र | रबी ज्वारी, कडधान्य, बाजरी |
| २. | कृषि संशोधन केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर | रबी ज्वारी | कडधान्य व तेलबिया |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, जेऊर, जि. सोलापूर | सेंद्रीय शेती पध्दती | रबी ज्वारी, कडधान्य |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, पंढरपूर, जि. सोलापूर | कडधान्य व तेलबिया | कोरडवाहू फळपिके |
| ५. | कृषि संशोधन केंद्र, चास, जि. अहमदनगर | - | बाजरी, कडधान्य (खरीप), रबी ज्वारी व कोरडवाहू शेती |
| ६. | मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव, जि. सातारा | ऊस व ऊस आधारीत शेती आणि पीक पध्दती | शर्करा कंद |
| ७. | मध्यवर्ती परिसर, राहुरी | ज्वारी, कडधान्य, बागायती कापूस, चारा पिके, गवत, उन्हाळी भुईमूग, फळे, भाजीपाला, पिक पध्दती, पाणी व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, काढणी पश्चात तंत्रज्ञान, शेती औजारे, शेळी, मेंढी, गाय | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | कृषि संशोधन केंद्र, सावळविहीर फार्म, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर | सुर्यफुल | बाजरी, कडधान्ये, सोयाबीन, कापूस व गहू |
| ९. | कृषि संशोधन केंद्र, श्रीरामपूर, जि.अ.नगर | लिंबूवर्गीय फळे | - |
| १०. | कृषि संशोधन केंद्र, धुळे | कोरडवाहू शेती, बाजरी, गवत | खरीप ज्वारी, कडधान्ये, तेलबिया, जिरायती कापूस, कोरडवाहू फळ पिके |
| ११. | अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, जि. पुणे | अंजीर व सिताफळ | अंजीर व सिताफळ |
| १२. | डाळिंब संशोधन प्रकल्प, लखमापूर ता. सटाणा, जि. नासिक | डाळिंब | डाळिंब |
| **इ. मध्य महाराष्ट्र पठारी विभाग** | | | |
| १. | तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव | तेलबिया, केळी, पानवेल व जिरायती कापूस | कडधान्य, ज्वारी खरीप, सोयाबीन, सुर्यफुल |

भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र राज्य, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागात विभागले आहे. हे चारही विभाग जमीन, पाऊस, हवामान आणि पर्यायाने पीक पध्दतीनुसार वेगवेगळे आहेत. वास्तविक पाहता, जमीन व कृषि हवामानानुसार राज्याचे नऊ विभाग पडतात. उत्तर कोकण, दक्षिण कोकण, पर्वतीय विभाग, उपपर्वतीय विभाग, मैदानी प्रदेश, अवर्षणप्रवण विभाग, मध्य पठारीप्रदेश, पश्चिम विदर्भ आणि पूर्व विदर्भ असे हे विभाग आहेत. या विभागांतर्गत विविध कृषि हवामान गटांचा अंतर्भाव होतो. या कृषि हवामान विभागानुसार आणि पाट पाण्याच्या उपलब्धतेनुसार त्या त्या भागातील शेती विकसित करणे विशेषत: अल्प आणि अत्यल्प भूधारकास शेती करणे किफायतशीर ठरावे या दृष्टीने त्या त्या विभागातील नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग आणि विकास करुन कृषि संबंधी नियोजन करणे गरजेचे आहे.

शाश्वत शेती उत्पादनासाठी शेती पध्दतीमध्ये शेळी-मेंढी, कुक्कुट, मधुमक्षिका, ससे आणि मत्स्य पालन, रेशिम उद्योग इत्यादींचा अंतर्भाव करुन त्यास चालना देणे आवश्यक आहे.

अधिक उत्पादकता असलेल्या पिकांची लागवड जास्त क्षमता असलेल्या विभागात घेणे फायदेशीर आहे. उदा. ऊस लागवड - कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, द्राक्षे -नाशिक, सांगली, पुणे, सोलापूर, फळपिके- पुणे, अहमदनगर, सांगली, सोलापूर याच भागात घेतल्यास आर्थिक मोबदला जास्त मिळू शकेल.

शेती उत्पादन वाढीमध्ये शुध्द व चांगली गुणवत्ता असणाऱ्या बियाण्याच्या वापरास अनन्य साधारण महत्व असून तो हमखास असा उपाय आहे. पिकांच्या संकरीत व सुधारीत वाणांचे बीजोत्पादन मोठया प्रमाणात घेऊन शेतकऱ्यांना रास्त दरात वितरीत करणे आवश्यक आहे.

## शेतपिके वाण प्रसारण

### अ) प्रसारीत वाण

**१. गहू : फुले समाधान (एन.आय.ए.डब्ल्यू. १९९४)**



महाराष्ट्रातील बागायती क्षेत्रात (१ ते १५ नोव्हेंबर) तसेच उशिरा (१६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर) पेरणीसाठी सरबती गव्हाचा समाधान (एन.आय.ए.डब्ल्यू. १९९४) हा वाण प्रसारित केला आहे.

**२. कारळा : फुले वैतरणा (आयजीपीएन-८००४)**



तेलाची उत्तम गुणवत्ता तसेच प्रथिनांचे प्रमाण अधिक असणारा कारळ्याचा फुले वैतरणा (आयजीपीएन- ८००४) हा वाण महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवडीसाठी प्रसारित केला आहे.

### उद्यानविद्या पिके

### प्रसारीत वाण

#### १. आंबा : फुले अभिरुची (सिलेक्शन जीके-पीएम-५)




उत्तम प्रतीच्या लोणच्यासाठी आंब्याचा फुले अभिरुची (सिलेक्शन जीके-पीएम-५) हा वाम लागवडीसाठी प्रसारित केला आहे.

#### २. सिताफळ : फुले पुरंदर (जेडब्ल्यूसी-१)



सिताफळाच्या फुले पुरंदर (जेडब्ल्यूसी-१) या वाणाची उत्पादन क्षमता, फळांचा मोठा आकार, कमी बिया, गराचे जास्त प्रमाण, पांढऱ्या रंगाच्या अधिक पाकळ्यांची संख्या अशा गुणधर्मामुळे महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित केला आहे.

#### ३. लसूण : फुले निलिमा (सिलेक्शन १०-३)




अधिक उत्पादन, मोठ्या आकाराचे आकर्षक जांभळ्या रंगाचे गडडे तसेच उत्तम साठवणूक क्षमता आणि कीड व रोगास प्रतिकारक्षम असणारा लसणाचा फुले निलिमा (सिले. १०-३) हा वाण पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित केला आहे..

### कृषि यंत्रे औजारे प्रसारण व नोंदणी समिती

### अ) प्रसारीत औजारे

#### १. मानवचलीत फुले ज्वारी काढणी यंत्र




मुळासहित ज्वारी काढण्यासाठी महत्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित मानवचलित फुले ज्वारी काढणी यंत्र विकसीत केले आहे.

#### २. मानवचलित फुले औषधी बिया फोडणी यंत्र



हिरडा आणि रिठा पोडण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित मानवचलित फुले औषधी बिया फोडणी यंत्र विकसीत केले आहे.

# पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी

## नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन

१. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत बीटी कपाशीचे हेक्टरी ४० क्विंटल उत्पादनासाठी १० टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समिकरणानुसार नत्र, स्फूरद आणि पालाश अन्नद्रव्य मात्रांची शिफारस केली आहे.

### शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समिकरण (प्रति हेक्टरी १० टन शेणखत)

खतामधून द्यावयाचे नत्र कि/हे. =
(९.५८ x अपेक्षित उत्पादन, कि/हे) - (१.१५ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि/हे.) - १.४२ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद ऑक्साईड कि/हे. =
(३.६२ x अपेक्षित उत्पादन, किं/हे.) - २.९९ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि/हे.) - १.५९ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड कि/हे. =
(८.३२ x अपेक्षित उत्पादन, किं/हे.) - (०.४५ x जमिनीतील उपलब्ध पालाश, किं/हे.) - ३.७७ x शेणखत टन/हे.)

### शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समिकरण

खतामधून द्यावयाचे नत्र किं/हे. =
(१०.३६ x अपेक्षित उत्पादन, किं/हे.) - १.२१ x जमिनीतील उपलब्ध नत्र, किं/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद ऑक्साईड किं/हे. =
(४.६२ x अपेक्षित उत्पादन, किं/हे.) - (३.६२ x जमिनीतील उपलब्ध स्फूरद, कि/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड किं/हे. =
(८.५७ x अपेक्षित उत्पादन, किं/हे.) - (०.४६ x जमिनीतील उपलब्ध पालाश, किं/हे.)

२. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत बी. टी. कपाशी-गहू या पीक पद्धतीत अपेक्षित उत्पादन तसेच जमिनीच्या सुपिकतेत सुधारणा होण्यासाठी व अधिक फायद्यासाठी १० टन शेणखत प्रति हेक्टरी + गव्हाच्या काडाबरोबर अपेक्षित उत्पादन समिकरणानुसार बी. टी. कपाशी (५५ किं/हे.) व गहू पिकास (५० किं/हे.) शेणखताच्या व गहू काडाच्या अवशेषाबरोबर नत्र, स्फूरद व पालाश या रासायनिक अन्नद्रव्य मात्रांची शिफारस केली आहे.

### अपेक्षित उत्पादन समीकरण बी. टी. कपाशी

खतामधून द्यावयाचे नत्र (किं/हे.) =
९.५८ x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - १.१५ x जमिनीतील उपलब्ध नत्र (किं/हे.) - १.४२ x शेणखत (टन/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद (किं/हे.) =
३.६२ x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - २.९९ x जमिनीतील उपलब्ध स्फूरद (किं/हे.) - १.५९ x शेणखत (टन/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश (किं/हे.) =
८.३२ x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - ०.४५ x जमिनीतील उपलब्ध पालाश (किं/हे.) - ३.७७ x शेणखत (टन/हे.)

### अपेक्षित उत्पादन समीकरण - गहू

खतामधून द्यावयाचे नत्र (किं/हे.) =
७.४५ x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - ०.७४ x जमिनीतील उपलब्ध नत्र (किं/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद (किं/हे.) =
१.९० x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - २.८८ x जमिनीतील उपलब्ध स्फूरद (किं/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश (किं/हे.) =
२.४९ x अपेक्षित उत्पादन (किं/हे.) - ०.२२ जमिनीतील उपलब्ध पालाश (किं/हे.)

३. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत पूर्वहंगामी ऊसाचे (फुले २६५) प्रति हेक्टरी २०० टन अपेक्षित उत्पादनाकरिता २० टन शेणखत प्रति हेक्टरी मात्रेबरोबर उत्पादन उद्दिष्ट समीकरणानुसार नत्र, स्फूरद व पालाश अन्नद्रव्य मात्रांची शिफारस केली आहे.

### शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समीकरण (प्रति हेक्टरी २० टण शेणखत)

खतामधून द्यावयाचे नत्र (किं/हे.) =
(४.०३ x अपेक्षित उत्पादन किं/हे.) - (१.४३ x जमिनीतील उपलब्ध नत्र किं/हे.) - ३.८१ x शेणखत (टन/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद ऑक्साईड किं/हे. =
(१.२३ x अपेक्षित उत्पादन टन/हे.) - २.४४ x जमिनीतील उपलब्ध स्फूरद किं/हे.) - (१.८३ x शेणखत टन/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड किं/हे. =
२.२६ x अपेक्षित उत्पादन टन/हे.) - (०.५५ x जमिनीतील उपलब्ध पालाश किं/हे.) - (१.४० x शेणखत टन/हे.)

### शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समीकरण

खतामधून द्यावयाचे नत्र किं/हे. =
(४.२१ x अपेक्षित उत्पादन टन/हे.) - (१.४९ x जमिनीतील उपलब्ध नत्र किं/हे.)
खतामधून द्यावयाचे स्फूरद ऑक्साईड किं/हे. =
(१.३९ x अपेक्षित उत्पादन किं/हे.) - (२.७५ x जमिनीतील उपलब्ध स्फूरद किं/हे.)
खतामधून द्यावयाचे पालाश ऑक्साईड किं/हे. =
(२.२६ x अपेक्षित उत्पादन टन/हे.) - (०.५८ जमिनीतील उपलब्ध पालाश किं/हे.)

### कोरडवाहू आणि जिरायत शेतपिके

४. महाराष्ट्राच्या उपपर्वतीय विभागातील पेरभाताच्या अधिक फायदेशीर उत्पादनासाठी, ३० सेंमी अंतरावर पेरणी करून ७५ टक्के शिफारशीत खत मात्रा (७५:३७.५.३७.५ नत्र स्फूरद पालाश किलो प्रति हेक्टरी १३०.५ किलो युरिया, ८२.५ किलो डीओपी व ६२.२५ किलो एमओपी प्रति हेक्टरी) २.७ ग्रॅम वजनाच्या युरिया- डीएपी-एमओपी गोळीद्वारे (१,०१,९४४ ब्रिकेटस प्रति हेक्टरी) एक आड एक ओळीत १६ सें. मी. अंतरावर व ५-७ सेंमी खोलीवर देण्याची शिफारस केली आहे.

५. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण भागात फुले मारवेल ०६-४० या बहुवर्षीय गवतापासून हिरव्या चाऱ्याचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी ठोंबाची लागवड ४५ x ३० सेंमी अंतरावर करावी. लागवडीच्यावेळी प्रति हेक्टरी ३०:३०:२० किलो नत्र, स्फुरद व पालाश देऊन एक महिन्याने प्रति हेक्टरी ३० किलो नत्र देण्याची शिफारस केली आहे.

६. मका पिकापासून अधिक फायदा मिळविणेसाठी शिफारशीत ५० टक्के नत्राची मात्रा (६७.५० किलो प्रती हेक्टरी) रासायनिक खतातून (युरिया १४५ किलो प्रति हेक्टरी) अधिक ५० टक्के नत्राची मात्रा शेणखतामधून (५ टन प्रती हेक्टरी) आणि शिफारशीत स्फुरद व पालाश खते (४० किलो प्रति हेक्टरी प्रत्येकी) मध्यम खोल जमिनीस देण्याची शिफारस महाराष्ट्राच्या अवर्षणप्रवण भागात केली आहे.

७. खरीप भुईमुगाच्या सेंद्रिय पध्दतीने लागवडीसाठी पुढिल पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाची शिफारस केली आहे.

  १. जिवाणूयुक्त शेणखत ७.५ टन प्रती हेक्टर (जैविक खते- रायझोबियम, स्फुरद विरघळवणारे जीवाणू, वनस्पती वाढीस पुरक जिवाणू - स्यूडोमोनस फ्लुरोसन्स, जैविक बुरशीनाशके - टायकोडर्मा १ किलो प्रती टन प्रत्येकी) पेरणीपूर्वी २१ दिवस अगोदर तयार करुन ७ दिवस अगोदर जमीनीत मिसळावे.

  २. पेरणीपूर्वी जैविक खते (रायझोबियम, स्फुरद विरघळवणारे जीवाणू) यांची प्रत्येकी २५० ग्रॅम/१० किलो व जैविक बुरशीनाशके (स्युडोमोनास, टायकोडर्मा) ५ ग्रॅम/किलो बियाणे यांची बीज प्रक्रिया करावी.

  ३. रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी पीक ४०-४५ दिवसांचे असतांना करावी.

८. पश्चिम महाराष्ट्रातील कोरडवाहू रब्बी ज्वारीच्या मूलस्थानी जलसंधारणाद्वारे अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी, ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ३.६० x ३.६० मी. आकाराचे बंदिस्त वाफे तयार करुन सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात वापशावर पेरणी करावी व पेरणीनंतर पुन्हा सारायंत्राने सपाट वाफे तयार करण्याची शिफारस केली आहे.

९. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागात उशिरा पाऊस सुरु होण्याची शक्यता लक्षात घेऊन मध्यम खोल जमिनीत तुरीच्या विपुला या निमपसऱ्या वाणाच्या अधिक उत्पादनाकरिता जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्लॅस्टीकच्या पिशवीत रोपे तयार करून २१-२८ दिवसांनी ९० x ३० सेंमी अंतरावर रोपांची पुनर्लागवड करण्याची शिफारस केली आहे.

### बागायती शेतीपिके

१०. हलक्या ते मध्यम जमिनीत डाळींबाचे अधिक उत्पादन तसेच पाण्याचा व खताचा कार्यक्षम वापर होऊन फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रा (६२५:२५०:२५० ग्रॅम नत्र, स्फुरद व पालाश प्रति झाड) विद्राव्य स्वरुपातील खतामधून तक्त्याप्रमाणे २२ हप्त्यांमध्ये आठवड्याच्या अंतराने ठिबक सिंचनातून देण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता : ठिबक सिंचनातून डाळिंबास अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण**

| बहार धरल्यानंतरचा दिवस | नत्र | स्फुरद | पालाश (टक्के) |
|---|---|---|---|
| १-३५ (५ समान हप्ते) | २५ | ३५ | २० |
| ३६-१०५ (१० समान हप्ते) | ३५ | ५० | २५ |
| १०६-१४० (५ समान हप्त) | २५ | १५ | ३० |
| १४१-१५४ (२ समान हप्ते) | १५ | - | २५ |
| एकूण | १०० | १०० | १०० |

११. मध्यम खोल काळ्या जमिनीत बीटी कापसाचे अधिक उत्पादन तसेच पाण्याचा व खताचा कार्यक्षम वापर होऊन फायदेशी उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रा (१२०:६०:६० नत्र : स्फुरद : पालाश किं/हे) विद्राव्य स्वरुपातील खतामधून तक्त्याप्रमाणे १४ आठवड्याच्या हप्त्यांमधून ठिबक सिंचनातून देण्याची तसेच २ टक्के युरिया फॉस्फेटच्या ३ फवारण्या लागवडीनंतर ३०,४५ आणि ६० दिवसांनी करण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता : ठिबक सिंचनातून कापुस पिकास १४ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण**

| लागवडी नंतरचा कालावधी | नत्र | | स्फुरद | | पालाश | |
|---|---|---|---|---|---|---|
| | टक्के | कि. प्रति हे. | टक्के | कि. प्रति हे. | टक्के | कि. प्रति हे. |
| १-२१ (३ समान हप्ते) | ३० | ३६.० | २२ | १३.२० | १० | ६.० |
| २२-६३ (६ समान हप्ते) | २५ | ३०.० | ४० | २४.० | ३० | १८.० |
| ६४-७७ (२ समान हप्ते) | २८ | ३३.६ | ३० | १८.० | २२ | १३.२ |
| ७८-९८ (३ समान हप्ते) | १८ | २०.४ | ८ | ४.८ | ३८ | २२.८ |
| एकूण | १०० | १२० | १०० | ६० | १०० | ६० |

१२. हलक्या मध्यम जमिनीत डाळींबाचे अधिक उत्पादन व पाण्याचा कार्यक्षम वापर तसेच फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी पीक बाष्पपर्णोत्सर्नाच्या ८० टक्के पाणी दर ५ दिवसांनी ठिबक सिंचनातून देण्याची शिफारस केली आहे.

१३. गव्हाचे अधिक उत्पादन तसेच पाण्याचा व खाताच कार्यक्षम वापर होऊन आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रा (१२०:६०:४० नत्र : स्फुरद : पालाश क्रिं/हे) विद्राव्य स्वरुपातील खतामधून तक्त्याप्रमाणे १२ आठवड्याच्या हप्तातून ठिबक सिंचनातून देण्याची तसेच २ टक्के युरिया फॉस्फेटच्या ३ फवारण्या लागवडीनंतर ३०,४५ आणि ६० दिवसांनी करण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता : ठिबक सिंचनातून गहू पिकास १२ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण**

| लागवडी नंतरचा कालावधी | नत्र | | स्फुरद | | पालाश | |
|---|---|---|---|---|---|---|
| | टक्के | कि. प्रति हे | टक्के | कि. प्रति हे | टक्के | कि. प्रति हे |
| १-२१ (३ समान हप्ते) | २५ | ३०.० | १५ | ९.० | २४ | ९.६० |
| २२-४२ (३ समान हप्ते) | ४७ | ५६.४ | २० | १२.० | ४८ | १९.२० |
| ४३-६३ (३ समान हप्ते) | २० | २४.० | ३५ | २१.० | १६ | ६.४० |
| ६४-८४ | (३ समान हप्ते) | ०८ | ९.६० | ३० | १२ | ४.८ |
| एकूण | १०० | १२० | १०० | ६०. | ४० | |

१४. बटाटा पिकासाठी पाण्याचा व खताचा कार्यक्षम वापर तसेच फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रा (१२०:८०:१२० नत्र : स्फुरद : पालाश क्रिं/हे) विद्राव्य स्वरुपातील खतामधून तक्त्याप्रमाणे ११ आठवड्याच्या हप्त्यामधून ठिबक सिंचनातून देण्याची तसेच २ टक्के युरिया फॉस्फेटच्या ३ फवारण्या लागवडीनंतर ३०,४५ आणि ६० दिवसांनी करण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता : ठिबक सिंचनातून बटाटा पिकास ११ हप्त्यातून अन्नद्रव्ये देण्याचे प्रमाण**

| लागवडी नंतरचा कालावधी | नत्र | | स्फुरद | | पालाश | |
|---|---|---|---|---|---|---|
| | टक्के | कि. प्रति हे. | टक्के | कि. प्रति हे. | टक्के | कि. प्रति हे. |
| १-२१ (३ समान हप्ते) | १५ | १८ | २० | १६ | १५ | १८ |
| २२-४२ (३ समान हप्ते) | ३५ | ४२ | ४० | ३२ | ३५ | ४२ |
| ४३-६३ (३ समान हप्ते) | ४० | ४८ | २० | १६ | ३० | ३६ |
| ६४-७७ (२ समान हप्ते) | १० | १२ | २० | १६ | २० | २४ |
| एकूण | १० | १२० | १०० | ८० | १०० | १२० |

१५. पश्चिम महाराष्ट्रात उन्हाळी बाजरीपासून चारा व धान्याचे अधिक उत्पन्न, आर्थिक फायदा व पाणी वापर क्षमता मिळण्यासाठी उन्हाळी बाजरीची पेरणी ५ ते २५ फेब्रुवारीच्या दरम्यान करुन १५-२० दिवसांच्या अंतराने (१५० मि. मी. बाष्पीभवन झाल्यावर) ७ सें.मी. खोलीचे पाणी देण्याची शिफारस केली आहे.

### तण व्यवस्थापन

१६. महाराष्ट्रातील उपर्वतीय विभागाच्या भात रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी २३.५ टक्के इ. सी. ऑक्झीफ्लुरोफेन १५ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून पेरणीनंतर दोन - तीन दिवसांत ७.५

लिटर प्रति गुंठा फवारण्याची शिफारस केली आहे.

१७. कांदा पिकामध्ये प्रभावी तणनियंत्रणासाठी लागवडीनंतर २५ दिवसांनी ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के इ. सी. ७.५ मि. ली. + क्युझॅलोफॉप इथाईल ५ टक्के इ. सी. १० मि. ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात तणनाशकांची एकत्रित फवारणी करुन ४५ दिवसांनी एक खुरपणी करण्याची शिफारस केली आहे.

### उद्यानविद्या

१८. डाळिंबाच्या दिर्घायुषी फळबाग व्यवस्थापन आणि अधिकतम दर्जेदार फळ उत्पादनाकरिता ४.५ x ३०. मी. अंतरावर डाळिंबाची लागवड करण्याची शिफारस केली आहे.

१९. खरीप कांद्याची अल्प कालावधीत (७५ दिवस) उत्पादकता व किफायतशीरपणा वाढविण्यासाठी ''चिंगळीद्वारा कांदा उत्पादन तंत्रज्ञानाची'' (Via Set Plantation) केली आहे.

**अ) चिंगळी तयार करण्यासाठीचे तंत्रज्ञान**

१) चिंगळी तयार करण्यासाठी ३ x २ मी. आकाराचे सपाट वाफे तयार करावेत.

२) प्रत्येक वाफ्यात पेरणीपूर्वी १० किलो शेणखत, जैविक खते १०.० ग्रॅम व्हॅम, ५.० ग्रॅम प्रत्येकी ॲझोस्पीरीलीयम व पी. एस. बी., २५० ग्रॅम (१५:१५:१५ नत्र, स्फउरद आणि पालाश) आणि २५ ग्रॅम कॉपरऑक्झीक्लोराईड या प्रमाणात मिसळावे.

३) जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात दोन ओळीत १० सें. मी. अंतर ठेऊन बसवंत - ७८० किंवा फुले समर्थ या वाणांचे २० ग्रॅम बियांची प्रती वाफा पातळ पेरणी करावी.

४) चिंगळी काढणीपूर्वी १० ते १५ दिवस अगोदर पिकाचे पाणी तोडावे.

५) चिंगळी काढणीपूर्वी १० दिवस अगोदर चिंगळीतील साठवणूकीतील नुकसान कमी करण्यासाठी कारबेन्डेझीम १० ग्रॅम अधिक चिकटद्रव १० मिली. प्रती १० लिटर पाणी तसेच चिंगळी काढणीनंतर मॅन्कोझेब किंवा कॉपरऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणा फवारणी करावी.

६) चिंगळी कांद्याची पातीसह काढणी करुन जुड्या बांधून हवेशीर जागेत साठवण करावी.

**ब) चिंगळीद्वारा कांदा लागवडीचे तंत्रज्ञान**

१) अशा चिंगळीची पुर्नलागवड जूनच्या पंधरवड्यापासून केल्यास खरीप कांद्याचे ७० ते ७५ दिवसांत उत्पादन मिळते.

२) उत्कृष्ट साठवण क्षमता (तीन महिने) राहण्यासाठी कांदा काढणीपूर्वी १० दिवस अगोदर कार्बेन्डेझीम १० ग्रॅम अधिक चिकटद्रव १० मिली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात करावी.

३) कांदा काढणीनंतर पातीसह कांदे वाळणगृहात १० दिवस सुकवावे.

२०. पश्चिम महाराष्ट्रामध्ये आंब्याच्या गावठी व अनुत्पादक झाडांचे सुधारीत वाणांमध्ये रुपांतर करण्यासाठी, आंब्याची झाडे नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत जमिनीपासून २ मी. उंचीवर छाटून, फांद्यावरील नविन फुटव्यांवर अनुक्रमे फेब्रुवारी ते मार्च महिन्यामध्ये केशर वाणाचे पाचर कलम करण्याची शिफारस केली आहे.

### वैशिष्टपूर्ण तंत्रज्ञान

१) बागेस जून महिन्यात शिफारशीत खत मात्रा देऊन (५० कि. ग्रॅ. शेणखत व १५००:५००:५०० ग्रॅम नत्र : स्फुरद : पालाश/झाड) झाडांना पाणी द्यावे.

२) रायवळ, गावठी आणि जुनी झाडे जमिनीपासून २ मी. उंचीवर, २-३ मुख्य फांद्या थंडीच्या नोव्हेंबर महिन्यात छाटावीत.

३) झाडे छाटतांना फांदीला आतल्या बाजुला उतरता काप धारदार करवतीने द्यावा जेणेकरुन, फांदीवरील डोळे फुटण्यास मदत होईल व मध्यवर्ती फुले पानांचे व खोडांचे व्यवस्थापन करणे सोईस्कर होईल.

४) खोड पोखरणाऱ्या हानीकारक किडीपासून छाटलेल्या झाडाचे संरक्षण होण्यासाठी खालील संरक्षक उपाययोजना अंमलत आणावी.

* छाटलेल्या झाडाच्या फांद्या व खोडावरील सुटलेली साल खरवडून खाढून झाडावर ५०% कार्बारील @४ ग्रॅम/लि. ची फवारणी करावी.
* छाटलेल्या झाडाच्या फांद्या व खोडांना व क्लोरोपायरीफॉस (५० मिली/१० लि.) + कडुनिंब तेल (५० मिली/१० लि.) + कॉपर ऑक्सीक्लोराईड (४० ग्रॅम/१० लि.) + मिथोमिल (१५ ग्रॅम/१० लि.) + स्टिकर (१५ मिली./१० लि.) + गेरुचे (४ किलो/१० लि.) मिश्रण तयार करुन मुलामा द्यावा.
* जमिनीतून दाणेदार फोरेट १० जी. १०० ग्रॅम प्रति झाड द्यावे व पाणी द्यावे.
* झाडांना मुलामा केल्यापासून बरोबर एका महिन्यानंतर थायोडीकार्फ (१५ ग्रॅम/१० लि.) या औषधांची फवारणी द्यावी. (वरील औषधांची फवारणी मे किंवा जून महिन्यात पहिला पाऊस झाल्यानंतर द्यावी.)

ई) झाडांना औषधांचा मुलामा केल्यानंतर लगेच फांद्यांच्या कापलेल्या उघड्या भागावर कॉपर

ऑक्झीक्लोराईड १०% लावावे व नंतर तो भाग शेणाने लिंपून घ्यावा.

५) छाटलेल्या झाडांना ताबडतोब एक किलो सुफला (१५:१५:१५) या खताची मात्रा आळे पध्दतीने देऊन पाणी द्यावे. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे म्हणजे फुटवे निघण्यास मदत होते.

६) झाडांची छाटणी केल्यापासून ४५-५५ दिवसांमध्ये फांद्यावर फुटवे येण्यास सुरुवात होते. फक्त ५-१० निरोगी जोमदार फुटवे कलमे करण्यासाठी फांद्यावर ठेवावेत.

७) छाटलेल्या झाडावरील खोडावर व फांद्यावर नियमित फुटवे येत राहतात असे अनावश्यक फुटवे १५ दिवसांच्या अंतराने काढणे गरजेचे असते.

८) छाटणी केल्यापासून ७५-९० दिवसांत फांदीवरील कोवळे विटकरी रंगाचे फुटवे हिरवे होऊन त्यांची जाडी ५-१० मि. मी. होताच त्यावर आंब्याच्या केशर जातीचे पाचर कलम करावे. कलम करण्यासाठी रत्ना, सिंधू किंवा इतर निवडलेल्या जातीचा उपयोग शेतकरी करु शकतात. कलम काड्यांवरील पाने आठ दिवस अगोदर काढावीत व अशा डोळे फुगलेल्या काड्या कलमे करण्यासाठी वापराव्यात. प्रत्येक फांदीवर कमीत कमी ६ कलमे बांधावीत व त्यातील निरोगी जोमदार वाढीची आणि फांदीवर योग्य अंतराने वाढलेली किमान ३ कलमे झाडाच्या पुढील विकासासाठी ठेवावीत.

९) सदर तंत्रज्ञान छाटणीचा अंतर्भाव असल्यामुळे व छाटणी केलेल्या आंबा पिकात खोडकिडीचा प्रादुर्भाव अत्यंत मोठ्या प्रमाणावर होत असल्याने या किड नियंत्रणासाठी सक्षमरीत्या उपाय योजना अवलंबण्यात यावी.

१०) झाडे छाटून कलमे केलेल्या झाडांना पहिल्यावर्षी आलेला मोहोर झाडाची वाढ विकास होण्यासाठी काढून टाकावा.

११) छाटलेल्या झाडांवर कलमे करण्याचे कष्टदायक काम सुलभ होण्यासाठी, खोडकिडीचा धोका कमी करण्यासाठी आणि जोराच्या वाऱ्यामुळे होणारे कलमांचे नुकसान टाळण्यासाठी झाडे कमी उंचीवरही छाटता येतात आणि अशा सुधारीत झाडांची वाढ व विस्तार चांगल्या प्रकारे होतो. परंतु, अशी सुधारणा करावयाची झाडे मोकाट जनावरांपासून पूर्णपणे सुरक्षित असावयास हवीत व छाटावयाच्या झाडांना किमान १ मी. उंचीवर किमान दोन मुख्य फांद्या असणे अत्यावश्यक आहे.

२१. केळीच्या खोडवा पिकांचे चांगल्या दर्जाचे अधिकतम उत्पादन आणि उत्पन्न मिळविण्यासाठी मुख्य पिकाच्या फुलोऱ्यानंतर तीन महिन्यांनी प्रती झाड एक सशक्त फुटवा (पिल) ठेवण्याची शिफारस केली आहे.

२२. महाराष्ट्रातील मध्यम काळ्या जमिनीवर केळी पिकांच्या दर्जेदार, अधिक उत्पादन तसेच अधिकतम आर्थिक फायद्यासाठी ग्रॅडनैन या वाणाची लागवडीसाठी शिफारस केली आहे.

## मूलभूत शास्त्रे, अन्नशास्त्रे आणि तंत्रज्ञान

२३. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ''फुले चिंच जेली'' तंत्रज्ञानाचा स्वामीत्व हक्क नोंदणीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

१. चिंच व पाणी विशिष्ट प्रमाणात एकत्र करुन १०५ अंश से. तापमानास उकळून अर्क काढून घ्यावा. पुनश्च एकदा ही प्रक्रिया करुन चिंचेच्या लगद्यामधून अर्क काढून घ्यावा.

२. मिळालेल्या अर्कामध्ये प्रमाणीकरणानुसार साखर व पेक्टीन टाकून उत्तम प्रतीची जेली तयार करण्याची शिफारस केली आहे.

२४. बन्सी प्रकारच्या गव्हाच्या वाणापासून (गोदावरी) उत्तम प्रतीच्या लाह्या तयार करण्यासाठी पुढिलप्रमाणे प्रक्रिया शिफारस केली आहे.

१. गहू तीन दिवस पाण्यात भिजवल्यानंतर उकळत्या द्रावणात (खाण्याचा सोडा व मीठ प्रत्येकी १.५ टक्के) १ तास ठेवावे व नंतर १२ ते १४ टक्के ओलावा येईपर्यंत वाळवावे.

२. पूर्वप्रक्रिया केलेल्या गव्हापासून २२० ते २४० अंश सेल्सीअस तापमानास लाह्या तयार कराव्यात.

३. लाह्यापासून चिवडा तयार करुन प्लॅस्टीकच्या पिशवीत सामान्य तापमानास १ महिना साठविता येतो.

२५. हरभरा पिकामध्ये पाण्याचा ताण सहनक्षमता पडताळण्यासाठी एसवकॉरबेट पेरॉक्सीडेज या विकाराची क्रियाशिलता तसेच लिपीड पेरॉक्सीडेशनचर गती या जैवरासायनिक गुणधर्माचा वापर करण्याची शिफारस केली आहे.

२६. गोड ज्वारीपासून अधिक रस, साखर व अल्कोहोल उत्पादनासाठी ज्वारीच्या हिरव्या ताटांची ५०% फुलोऱ्यानंतर ४५ दिवसांनी काढणीची शिफारस केली आहे.

२७. गव्हाच्या अधिक तापमान प्रतिकार क्षमतेस कारणीभूत असलेल्या प्रयोगशाळेतील चाचण्या तसेच व जैवरासायनिक बदलांचा तुलनात्मक अभ्यास करता गव्हाचे एनआयएडब्ल्यू - ९१७ हे वाण अजैविक ताण व्यवस्थापनासाठी शिफारस केली आहे.

२८. गोड ज्वारीपासून रस, साखर आणि अल्कोहोलचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी जून महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्याची पेरणीसाठी शिफारस केलीआहे.

२९. काबुली हरभरा बियाण्याची प्रयोगशाळेत उगवणक्षमता तपासण्यासाठी पेपरमधील पध्दतीकरीता (इन बीटवीन पेपर) चार टॉवेल पेपर आणि २५ अंश सेल्सीयस तापमान वापरण्याची शिफारस केली आहे.

३०. सिताफळ गर ९० दिवसांपर्यंत साठविण्यासाठी गरात ६००

पी. पी. एम. पोटॅशिअम मेटाबायसल्फाईट परीरक्षक मिसळून, ब्लास्ट फ्रिजींग करुन हा गर उणे २० अंश सेल्सीयस तापमानात ठेवण्याची शिफारस केली आहे.

३१. निशिगंध फुलदांड्यांचे काढणीत्तोर आयुष्यमान १५ दिवस वाढविण्यासाठी फुलदांडा १ टक्का छिद्रांकीत १०० गेज जाडीच्या पॉलीप्रोपेलीन फिल्ममध्ये गुंडाळून १० अंश सेल्सीयस तापमानात ६ दिवस साठवावत. नंतर फुलदांडे फुलदाणीत २०० पी. पी. एम. ८ एच. क्यु. सी. (८ हाड्रॉक्सी कूनेलाईन साईट्रेट) द्रावणात ठेवण्याची शिफारस केली आहे.

## पीक संरक्षण

### किड व सुत्रकृमी व्यवस्थापन

३२. तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या (हेलिकोव्हर्पा) व्यवस्थापनासाठी एका झाडावर एक अळी या प्रमाणात प्रादुर्भाव दिसताच, १८.५ टक्के प्रवाही क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ३ मिली. अथवा दाणेदार ५ टक्के प्रवाही ईमामेक्टीन बेंझोऐट ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पिकास फुलकळी येतांना पहिली, गरज पडल्यास पीक ५० टक्के फुलोऱ्यात असतांना दुसरी व शेंगा भरण्याच्या अवस्थेत तिसरी फवारणी याप्रमाणे फवारण्या करण्याची शिफारस केली आहे.

३३. बागायती बीटी कपाशीवरील रस शोषणाऱ्या किडींच्या (मावा, तुडतुडे, फुलकिडे आणि पांढरी माशी) व्यवस्थापनासाठी १२० सें. मी. x ६० सें.मी. अंतरावर लागवड करण्याची शिफारस पश्चिम महाराष्ट्रासाठी केलीआहे.

३४. बीटी कपाशीवर तुडतुडे व पांढरी माशी आर्थिक नुकसान संकेत पातळीला पोचताच डायफेनथिरॉन ५० डब्ल्यू पी १२ ग्रॅम किंवा किंवा ॲसिटामिप्रीड २० एसपी २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गरज भासल्यास दुसरी फवारणी १५-२० दिवसांच्या अंतराने करण्याची शिफारस केली आहे.

३५. करडईवरील माव्याच्या प्रादुर्भावाची हवामान घटकावर आधारीत पूर्वसूचना देण्यासाठी (१ आठवडा अगोदर) पुढिल प्रतिगमन समीकरणाची शिफारस केली आहे.

### समीकरण

१. वेळेवर पेरणी झालेल्या ए-१ करडईसाठी
मावा - १००२.१७-२९.७० कमाल तापमान - १३.४९ किमान तापमान + ४.६४ सापेक्ष आर्द्रता - २ (संध्याकाळ) हे सूत्र आहे.

२. उशिरा पेरणी झालेल्या ए-१ करडईसाठी
मावा - ९९५.४७-३२.२८ कमाल तापमान - १८.६७ किमान तापमान + ९.१३ सापेक्ष आर्द्रता - २ (संध्याकाळ) हे सूत्र आहे.

३. वेळेवर पेरणी झालेल्या को-१ करडईसाठी
मावा - १३३३.५४-४४.३३ कमाल तापमान - २२.०८ किमान तापमान + ११.९० सापेक्ष आर्द्रता - २ (संध्याकाळ) हे सूत्र आहे.

४. उशिरा पेरणी झालेल्या को-१ करडईसाठी
मावा - १४५०.४१-४९.२९ कमाल तापमान - २९.०२ किमान तापमान + १५.९२ सापेक्ष आर्द्रता - २ (संध्याकाळ) हे सूत्र आहे.
(या ठिकाणी मावा - माव्याची संख्या, कमाल व किमान (अंश से.) सायंकाळची सापेक्ष आर्द्रता टक्के)

३६. सिताफळावरील पिठ्या ढेकणाच्या व्यवस्थापनासाठी परभक्षी किटक स्किम्नस कॉसिक्सव्हारेच्या १० अळ्या किंवा ऑस्टेलियन लेडी भुंगेऱ्याच्या ५ अळ्या प्रती झाड जुलै आणि ऑगस्ट महिन्यात दोन वेळा सोडण्याची शिफारस केली आहे.

### रोग व अणूजीवशास्त्र व्यवस्थापन

३७. करडईच्या पानावरील 'अल्टरनेरिया' ठिपके रोगाची हवामान घटकावर आधारीत एक आठवडा आधी पूर्वसूचना देण्यासाठी पुढिल सूत्रांची महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागासाठी शिफारस केली आहे.

१. लवकर पेरणी झालेल्या करडईसाठी (ऑगस्टचा दुसरा पंधरवडा)
रोगाची तीव्रता (टक्के) = १०४.२८-६.७२ x किमान तापमान (अंश से.) + २.१९ x सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) - १.८१ x सायंकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) - ०.३७ x पडलेला पाऊस मि. मी.

२. वेळेवर पेरणी झालेल्या करडईसाठी (सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा)
रोगाची तीव्रता (टक्के) = ४४०.१९-७.९७ x कमाल तापमान (अंश से.) - १.१७ x किमान तापमान (अंश से.) - १.६७ x सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के)

३. उशीरा पेरणी झालेल्या करडईसाठी (ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा)

४. रोगाची तीव्रता (टक्के) - २९५.०३-६.२३ x कमाल तापमान (अंश से.) - १.२२३ x किमान तापमान (अंश से.) - ०.७२९ x सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के)

३८. भात पिकावरील करपा, पर्ण कोष कुजव्या, पर्ण करपा, तपकिरी ठिपके आणि दाणे रंगहिनता या रोगांच्या व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे रोग नियंत्रण प्रणालीची शिफारस केली आहे.

* भात बियाण्यास कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रक्रिया करावी.
* पेरणीपूर्वी गादीवाफ्यावर भाताच्या पळींजाची राख १.० किलो प्रती चौ. मी. या प्रमाणात मिसळावी.
* लागवडीपूर्वी शेतात प्रती हेक्टरी २०. टन भाताचा पेंढा

मिसळावा.

* रोगाचा प्रादुर्भाव दिसल्यापासून कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाच्या (१० ग्रॅम प्रति १० लि. पाणी) १५ दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात.

३९. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पूर्व हंगामी बागायती बीटी कपाशीचा आकस्मिक मर रोग टाळण्यासाठी बागायती बीटी कपाशीची लागवड मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करुन ८ ते १५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.

## कृषि अभियांत्रिकी

### जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी

४०. सांगली जिल्ह्यातील तालुकानिहाय भूपृष्ठीय निचरा प्रणालीचे आरेखन करण्याकरीता खालील तक्त्यात नमूद केलेल्या निचरा गुणांकाचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. याला पर्याय म्हणून भौगोलिक माहिती प्रणाली (जी. आय. एस.) मध्ये विकसीत केलेले नकाशे वापरण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता क्र. १ आटपाडी तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | २४ | ४८ | ६४ | ८ | २३ | ३३ | १ | १२ | १९ | - | ६ | १२ | - | २ | ८ |
| २.० | - | २४ | ४० | - | - | ९ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | - | १६ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | | | | | | | | | | | | |

**तक्ता क्र. २ इस्लामपूर तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४२ | ६९ | ८७ | २१ | ३९ | ५१ | १० | २५ | ३५ | ४ | १६ | २५ | १ | १२ | १९ |
| २.० | १८ | ४५ | ६३ | - | १५ | २७ | - | १ | ११ | - | - | १ | - | - | - |
| ३.० | - | २१ | ३९ | - | - | ३ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | - | १५ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ३ जत तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५३ | ७९ | ९३ | २३ | ३९ | ४८ | १२ | २४ | ३० | ६ | १७ | २३ | २ | १३ | १८ |
| २.० | २९ | ५५ | ६९ | - | १५ | २४ | - | - | ६ | - | - | - | - | - | - |
| ३.० | ५ | ३१ | ४५ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ७ | २१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ४ कवटे महांकाळ तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ३२ | ५६ | ७० | १४ | २८ | ३६ | ५ | १६ | २३ | – | ९ | १४ | – | ४ | ९ |
| २.० | ८ | ३२ | ४६ | – | ४ | १२ | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ३.० | – | ८ | २२ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ५ मिरज तालुक्यातील निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४० | ६२ | ७७ | १७ | ३३ | ४३ | ८ | २१ | २९ | ३ | १४ | २१ | – | ८ | १४ |
| २.० | १६ | ३८ | ५३ | – | ९ | १९ | – | – | ५ | – | – | – | – | – | – |
| ३.० | – | १४ | २९ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | – | ५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ६ पलूस तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४ | २० | ३० | – | १० | १७ | – | २ | १० | – | – | १ | – | – | – |
| २.० | – | – | ६ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ३.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ७ सांगली तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ३२ | ७३ | १०९ | १३ | ३८ | ६२ | ४ | २३ | ३९ | – | १५ | २८ | – | १० | २१ |
| २.० | ८ | ४९ | ८५ | – | १४ | ३८ | – | – | १५ | – | – | ४ | – | – | – |
| ३.० | – | २५ | ६१ | – | – | १४ | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | १ | ३७ | – | | | | | | | | | | | |
| ५.० | – | – | १३ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ८ शिराळा तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | |
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५३ | ७६ | ९३ | ३४ | ५० | ५९ | २३ | ३७ | ४६ | १६ | २७ | ३३ | ११ | २० | २६ |
| २.० | २९ | ५२ | ६९ | १० | २६ | ३५ | - | १३ | २२ | - | ३ | ९ | - | - | २ |
| ३.० | ५ | २८ | ४५ | - | २ | ११ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ४ | २१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ९ तासगांव तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ३७ | ५७ | ६८ | १६ | २८ | ३४ | ७ | १६ | २१ | १ | ९ | १३ | - | ४ | ७ |
| २.० | १३ | ३३ | ४४ | - | ४ | १० | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | ९ | २० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

४१. सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय भूपृष्ठीय निचरा प्रणालीचे आरेखन करण्याकरिता खालील तक्त्यात नमूद केलेल्या ''निचरा गुणांकाचा'' वापर करण्याची शिफारस केली आहे. याला पर्याय म्हणून भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) मध्ये विकसीत केलेले नकाशे वापरण्याची शिफारस केली आहे.

**तक्ता क्र. १ अक्कलकोट तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ३९ | ६० | ७३ | ३५ | ६५ | ८४ | २८ | ६१ | ७९ | १३ | ५२ | ७६ | - | २ | ७१ |
| २.० | ८ | १८ | २५ | - | ८ | १८ | - | - | ४ | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | ४ | ८ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. २ अकलूज तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५२ | ९४ | १२२ | ४२ | १०२ | १५१ | ३१ | १०७ | १७३ | १७ | १०५ | १८६ | २ | ८ | १८४ |
| २.० | १४ | ३५ | ४९ | – | २७ | ५१ | – | १७ | ५० | – | ४ | ४५ | – | – | ३२ |
| ३.० | १ | १५ | २५ | – | २ | १८ | – | – | १० | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | ६ | १३ | – | – | २ | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | ५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ३ बार्शी तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४४ | ७४ | ९२ | ३६ | ६९ | ८९ | २८ | ६६ | ८८ | १६ | ६६ | ९० | ० | ५४ | ८५ |
| २.० | १० | २५ | ३४ | – | ११ | २० | – | – | ८ | – | – | – | – | – | – |
| ३.० | – | ९ | १५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | ० | ५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ४ जेऊर तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५६ | ९४ | ११७ | २४ | ४५ | ५७ | ०१ | २७ | ३७ | ०५ | १७ | ०५ | ० | ११ | १७ |
| २.० | ३२ | ७० | ९३ | – | २१ | ३३ | – | ०३ | १३ | – | – | – | – | – | – |
| ३.० | ०८ | ४६ | ६९ | – | – | ०९ | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | २१.९ | ४४.५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | २१ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. ५ करमाळा तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५९ | ९६ | ११९ | ५४ | ९३ | ११८ | ४१ | ८५ | ११२ | २१ | ६२ | ८८ | ०७ | ५७ | ८८ |
| २.० | १८ | ३६ | ४७ | ०३ | २३ | ३५ | - | ०६ | २० | - | - | - | - | - | - |
| ३.० | ०४ | १६ | २४ | - | - | ०७ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ०६ | १२ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | ०५ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ६ माढा तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४८ | ७८ | ९८ | ४३ | ७५ | ९५ | ३४ | ७१ | ९५ | १६ | ५७ | ८३ | ०५ | ५६ | ८८ |
| २.० | १२ | २७ | ३७ | - | १३ | २३ | - | - | १२ | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | १० | १७ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ०२ | १३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | ० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. माळशिरस तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५३ | ९६ | १२२ | ४७ | १०९ | १५० | ३३ | १११ | १६६ | २२ | १०७ | १६४ | ०६ | ९८ | १५९ |
| २.० | १४ | ३६ | ४९ | - | ३१ | ५१ | - | १९ | ४५ | - | ०३ | - | - | - | २० |
| ३.० | ०२ | १६ | २५ | - | ४.४३ | १८.० | - | - | ६.१९ | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ५.९ | १२.५ | - | - | १.५२ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | ५.२६ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ८ मंगळवेढा तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५१ | ८५ | १०४ | ४७ | ८४ | १०५ | ३४ | ७८ | १०४ | २२ | ७० | ९७ | ६ | ५७ | ८६ |
| २.० | १४ | ३० | ४० | - | १८ | २८ | - | ३ | १६ | - | - | - | - | - | - |
| ३.० | १ | १२ | १२ | - | - | ३ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ३ | ३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | २ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ९ मोहोळ तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४२ | ६९ | ८७ | ३९ | ७३ | ९४ | २८ | ६४ | ८८ | १६ | ५७ | ८२ | ०६ | ५२ | ७५ |
| २.० | ०९ | २२ | ३१ | - | १३ | २३ | - | - | ०८ | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | ०७ | १३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | - | ०४ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. १० उत्तर सोलापूर तालुक्यातील निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४६ | ७५ | ८८ | ४३ | ७३ | ८८ | ३१ | ६८ | ८८ | १९ | ६२ | ८४ | ०५ | ५५ | ८२ |
| २.० | ११ | २५ | ३२ | - | १२ | २० | - | - | ०८ | - | - | - | - | - | - |
| ३.० | - | ०९ | १३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४.० | - | ०१ | ४ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५.० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**तक्ता क्र. ११ पंढरपूर तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५० | ८२ | १०५ | ४२ | ९० | १२७ | ३५ | १२ | १३४ | २६ | ८९ | १३३ | १२ | ७६ | १२१ |
| २.० | १३ | २९ | ४१ | – | २१ | ३९ | – | १० | ३१ | – | – | ० | – | – | ०१ |
| ३.० | ०१ | ११ | १९ | – | – | १० | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | ०३ | ०८ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | ०२ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. १२ सांगोला तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ५६ | ९२ | ११५ | ५१ | ९२ | ११९ | ४४ | ८६ | १११ | ३३ | ८ | ११० | १६ | ६५ | ९६ |
| २.० | १६ | ३३ | ४६ | ०१ | २२ | ३५ | – | ०७ | १९ | – | – | – | – | – | – |
| ३.० | ०३ | १५ | २२ | – | – | ०८ | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | ०५ | ११ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | ०४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. १३ सोलापूर तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४८ | ७५ | ८८ | ४५ | ७५ | ८९ | ३४ | ७१ | ८९ | २१ | ६५ | ८५ | ०६ | ५३ | ७६ |
| २.० | १२ | २६ | ३२ | – | १३ | २० | – | – | ०८ | – | – | – | – | – | – |
| ३.० | ० | ०९ | १३ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ४.० | – | ०१ | ०४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

**तक्ता क्र. १४ दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी निचरा गुणांक (मि. मी.)**

| मुळ अंत:सरण दर (मि.मी./तास) | एक दिवसाच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | दोन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | तीन दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | चार दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | | पाच दिवस सततच्या पावसासाठी निचरा गुणांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० | २ | ५ | १० |
| १.० | ४७ | ७४ | ८८ | ४८ | ७८ | ९० | ३४ | ७२ | ९१ | २४ | ७० | ९२ | ०८ | ५६ | ८१ |
| २.० | ११ | २५ | ३२ | ०० | १५ | २१ | – | – | १० | – | – | – | – | – | – |
| ३.० | – | ०९ | १३ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४.० | – | ०० | ०४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ५.० | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

४२. खरीप सोयाबीन पीकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या ''पीक गुणांकाचा वापर करण्याची शिफारस केली आहे.

| पेरणीनंतरचा आठवडा | संदर्भीय बाष्प पर्णोत्सर्जन काढण्याची पध्दत | |
|---|---|---|
| | प्नमन मॉन्टीथ | हार्गीव्हज् – समानी |
| १ | ०.५१ | ०.३४ |
| २ | ०.५२७ | .०३५ |
| ३ | ०.६६ | ०.४१ |
| ४ | ०.७६ | ०.५१ |
| ५ | ०.८६ | ०.६१ |
| ६ | ०.९५ | ०.७१ |
| ७ | १.०२ | ०.७९ |
| ८ | १.०८ | ०.८४ |
| ९ | १.१० | ०.८७ |
| १० | १.०९ | ०.८६ |
| ११ | १.०५ | ०.८२ |
| १२ | ०.९८ | ०.७७ |
| १३ | ०.८० | ०.८९ |
| १४ | ०.८० | ०.६५ |
| १५ | ०.७१ | ०.६२ |
| १६ | ०.६५ | ०.६३ |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सुत्रांची शिफारस करण्यात येते.

**ट–दिवस, ठ–पीक कालावधी**

**१. प्नमन मॉन्टीथ पध्दत :**

$$\text{पीक गुणांक} = -\text{२.६४७}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{५}} + \text{०.१४०}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{४}} - \text{८.७६१}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{३}} + \text{५.८६२}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{२}} + \text{०.२६०}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right) + \text{०.४९४}$$

**२. हार्ग्रीव्हज् समानी पध्दत :**

$$\text{पीक गुणांक} = -\text{०.७५२}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{५}} + \text{११.८७}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{४}} - \text{२२.३५}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{३}} + \text{१२.७७}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)^{\text{२}} - \text{१.२५८}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right) + \text{०.३६६}$$

४३. ठिंबक सिंचन प्रणालीचे इष्टतम आरेखन करुन त्याचे लागत मुल्य काढण्यासाठी महात्मा फुला कृषि विद्यापीठ विकसीत ''फुले ड्रिप इरिगेशन सिस्टीम डिझायनर'' या संगणक आज्ञाप्रणालीची शिफारस केली आहे.

४४. विहिरीच्या पुनर्भरणासाठी अधिक गाळण कार्यक्षमता मिळविण्यासाठी खालीलप्रमाणे चार थरांच्या सुधारीत गाळण यंत्रणेची शिफारस केली आहे.

**चार थरांची सुधारीत गाळण यंत्रणा**

| थर क्रमांक | थराची जाडी | साहित्य व आकारमान |
|---|---|---|
| १ | १५ सें. मी. | विटांचा चुरा (३० ते ४० मि. मी.) |
| २ | ४५ से. मी. | बारीक वाळू (०.६ ते २.०० मि. मी.) |
| ३ | ४५ से. मी. | वाळूची चाळ (२.०० ते ६.०० (मि. मी.) |
| ४ | ४५ सें. मी. | खडी (९.५ ते १५.५ मि. मी.) |

४५. चांगल्या प्रतीच्या ढोबळी मिरचीच्या (ऑक्टोबर लागवड) अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी ७५% सावलीच्या शेडनेटगृहात लागवड करुन ठिबक सिंचनाद्वारे दररोज पीक बाष्पपर्णोत्सर्जनाच्या ७५% पाणी देण्याची शिफारस केली आहे.

४६. नैसर्गिक वायुसंचारित हरितगृहातील ढोबळी मिरचीच्या (ऑक्टोबर लागवड) चांगल्या प्रतीच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी ठिबक सिंचनातून पीक बाष्पपर्णोत्सर्जनाच्या ७०% पाणी प्रती दिन आणि शिफारशीत खत मात्रेच्या १००% विद्राव्य खते (फुले येण्यापुर्वी : ८.०:२.८:४.०:२.८:०.२ कि. ग्रॅ. प्रती हेक्टर आणि फुले आल्यानंतर ६.०:३.०:१५.०:३.०:०.३ कि. ग्रॅ. प्रती हेक्टर नत्र : स्फुरद : पालाश : कॅल्शिअम : मॅग्नेशिअम) दिवसाआड ठिबक सिंचनाद्वारे देण्याची शिफारस केली आहे.

४७. काकडीच्या (उन्हाळी लागवड) अधिक उत्पादनासाठी ७५% सावली गुणकांच्या शेडनेटगृहात लागवड आणि ठिबक सिंचनाद्वारे शिफारशीत मात्रेच्या (१००:५०:५० कि. ग्रॅ./हे.) १२५% विद्राव्य खते २६ समान हप्त्यात ४ दिवसाच्या अंतराने लागवडीनंतर १५ दिवसाने देण्याची शिफारस केली आहे.

### मृद व जलसंधारण

४८. महाराष्ट्रात उप-पर्वतीय विभागामध्ये कृषि - पाणलोटातील बंधाऱ्याची जल साठवण क्षमता निश्चित ठरविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथून पुढिलप्रमाणे विकसीत केलेली संगणकीय प्रणालींची शिफारस केली आहे.

१. कृषि पाणलोट क्षेत्रातील जल साठवण बंधाऱ्यामध्ये येणारा अंतप्रवाह अंदाजीत करण्यासाठी एच.ई.सी.एच.एम.एस. संगणक प्रणाली

२. पिकास पूरक पाण्याची गरज केव्हा आणि किती अंदाजीत करण्यासाठी तंत्र प्रणाली.

३. लिनीयर प्रोग्रॅमिंग आधारीत अनुकुलीयकरण (ऑप्टीमायझेशन) प्रारुप.

#### वैशिष्ट्ये

१. एच.ई.सी.एच.एम.एस. संगणक प्रणाली / प्रारुप www.hec.usacearmy.mil या वेबसाईटवर मोफत डाऊनलोडकरीता उपलब्ध आहे.

२. एच.ई.सी.एच.एम.एस. संगणक प्रणाली / प्रारुप ही भौतिक नियमांवर आधारीत असून पाणलोट क्षेत्रामध्ये एकूण पडणाऱ्या पावसाची विविध मार्गे होणारी विल्हेवाट विचारात घऊन निर्माण होणारा एकूण अपधाव अंदाजीत करते.

३. पीक वाढीनुसार दैनिक पर्ण-बाष्पोत्सर्जन, पाऊस आणि सिंचन हे विचारात घेऊन संपूर्ण हंगामामध्ये खरीप पिकास पुरक पाण्याची गरज केव्हा आणि किती दर्शविते.

४. लिनीअर प्रोग्रॅमिंग आधारीत अनुकुलीयकरण (ऑप्टीमायझेशन) प्रणाली/प्रारुपाद्वारे साठवण बंधाऱ्यामध्ये येणारा दैनिक अंतर्प्रवाह, खरीप पिकांस पुरक पाण्याची एकूण गरज, साठवलेल्या पाण्यामधून होणारे बाष्पोत्सर्जन तसेच जमिनीतील पाण्याची झिरप विचारात घऊन साठवण बंधाऱ्याची जल साठवण क्षमता निश्चित केली जाते.

४९. महाराष्ट्रातील उपपर्वतीय विभागामध्ये डोंगरमाथ्यावरील लहान आणि मध्यम घळींचे परिणामकारक नियंत्रण करण्यासाठी प्रचलीत उपचारांबरोबर जैविक उपचार म्हणून माती घट्ट धरुन ठेवण्याची चांगली क्षमता असणाऱ्या सॅकॅरम स्पाँटेनियम (एसईएस-३७ए) आणि सॅकॅरम ऑफिसिनॅरम (आयजे ७६-५०१) या ऊसाच्या प्रजातींची लागवड करण्याची शिफारस केली आहे.

### सामाजिक शास्त्रे

### विस्तार शिक्षण

५०. वांगी उत्पादकांचे शिफारशीत पीक संरक्षणाबाबतचे ज्ञान वाढविण्यासाठी समूह संपर्क पध्दतींचा वापर आणि रासायनिक व जैविक पीक संणक्षकांच्या एकात्मिक वापराबाबतचे अवलंबन वाढविण्यासाठी विद्यापीठाच्या समन्वयाने शासनाच्या कृषि खात्यामार्फत वांगी उत्पादकांसाठी प्रशिक्षणे आयोजित करण्याची शिफारस केली आहे.

### शिफारशीत पीक संरक्षण तंत्रज्ञान

* शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी ४ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करणे किंवा २५ टक्के प्रवाही सायपरमेथ्रीन ५ मिली किंवा ४० टक्के प्रवाही ट्रायझोफॉस २० मिली १० लिटर पाण्यातून रोप लागणीनंतर दोन महिन्यांनी फवारणे. किडग्रस्त फांद्या आणि फळे गोळा करुन नष्ट करावेत.
* वांग्यावरील रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागवडीच्या वेळी पिकाच्या कडेने मका लावावी व वांगी पिकात पिवळे चिकट कार्ड वापरावे.
* शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीचा पतंगांना मोठ्या प्रमाणावर पकडण्यासाठी कामगंध सापळे (ल्युसील्युर) प्रति हेक्टरी १०० या प्रमाणात वापरावे. असे ल्यूर दोन महिन्याच्या अंतराने तीन वेळा बदलावे.
* पर्णगुच्छ या रोगाच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ मिली १० लिटर पाण्यातून फवारावे. सदरहू फवारणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार ३ ते ४ वेळा करावी. पर्णगुच्छ रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावेत.
* मर रोगाच्या नियंत्रणासाठी ब्लायटॉक्स ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून आणि ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून १० ते १५ दिवसांच्या अंतराने आळीपाळीने आळवणी करावी.

५१. केळी उत्पादकांचे जैविक खतांचा वापर, केळी घड व्यवस्थापन आणि रोग व किड व्यवस्थापन या शिफारशीत केळी उत्पादन तंत्रज्ञानाबाबतचे अवलंबन वाढविण्यासाठी कृषि विभागाने

विद्यापीठाच्या समन्वयाने समूह प्रात्यक्षिके आणि गट चर्चांचे आयोजन करण्याची शिफारस केली आहे.

### शिफारशीत केळी उत्पादन तंत्रज्ञान

* लागवडीच्या वेळी ॲझोस्पिरिलियम आणि पीएसबी जैविक खत २५ ग्रॅम प्रति झाडास द्यावे.
* घड व्यवस्थापनासाठी केळी घडावर ५० ग्रॅम पोटॅशिअम डाय हायड्रोजन फॉस्फेट + १०० ग्रॅम युरिया १० लिटर पाण्यातून १५ दिवसाच्या अंतराने फवारावे.
* सिगाटोकाच्या नियंत्रणासाठी पाण्याचा योग्य निचरा करणे, पाणी साचू न देणे, योग्य अंतरावर लागवड करणे तसेच १० मिली प्रॉपीकोनॅझोल + १० मिली स्टिकर प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.
* खतांसाठी रोगग्रस्त पाने बुंध्याजवळ टाकू नये. रोगग्रस्त पाने जाळून नष्ट करावेत.
* सूत्रकृमीच्या नियंत्रणासाठी झेंडूचे आणि तागाचे आंतरपीक घ्यावे.
* मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

### कृषि अर्थशास्त्र

५२. कमी ते मध्यम ते उच्च हरभरा उत्पादन तंत्रज्ञान अवलंब गटाचा अर्थशास्त्रीय तुलनात्मक अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, या दोन गटांमध्ये अनुक्रमे २२ व ३५ टक्क्यांची उत्पादनामध्ये झालेली वाढ तसेच ७ व १३ टक्क्यांनी उत्पादन खर्चात झालेली कपात ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाच्या शिफारशीत तंत्रज्ञानामुळे झाली आहे. म्हणून शेतकऱ्यांनी हरभरा पिकासाठी तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा अशी शिफारस केली आहे.
हरभरा पिकाचे सुधारीत उत्पादन तंत्रज्ञान
१. सुधारीत वाणांचा वापर व बिजप्रक्रिया, २. योग्य वेळी पेरणी, ३. आंतरमशागत, ४. एकात्मीक खत व्यवस्थापन व ५. एकात्मीक किड व्यवस्थापन

५३. अवर्षणप्रवण भागातील द्राक्ष व बेदाणा विक्रीच्या तुलनात्मक अभ्यासाच्या निष्कर्षाद्वारे बेदाणा निर्मितीचे नफा : खर्च गुणोत्तर (१.७२) हे निव्वळ द्राक्ष उत्पादनापेक्षा (१.२४) अधिक आहे. म्हणून आवर्षणप्रवण भागातील द्राक्ष उत्पादकांनी बेदाणा निर्मितीस अधिक प्राधान्य देण्याची शिफारस केली आहे.

५४. अहमदनगर जिल्ह्यातील शेततळ्यांच्या आर्थिक अभ्यासाद्वारे निव्वळ उत्पन्न (६३.९५%), सिंचन क्षेत्र (९.८६%), बाजरी (१६.९१%), कापुस (१०.०७%), डाळींब (५.९४%, मोसंबी (३.५४%), चिकू (२.०८%) यांची उत्पादकता आणि संकरीत गायींच्या संख्येत (३३.३३%) अशी वाढ झाली म्हणून अवर्षणप्रवण भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात शेततळ्यांची निर्मिती करण्याबद्दल प्रोत्साहीत करण्याची शिफारस केली आहे.

### बिजोत्पादन कार्यक्रम

#### अ) बियाणे उत्पादन क्विंटल (२०१३-१४)

| वर्ष | बियाणे प्रकार | तृणधान्य | कडधान्य | तेलबिया | तंतुमय पिके | चारापिका | हिरवळीचे पिके |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | मूलभूत | ५२८.६१ | ९४०.१० | २४२२.४४ | १.३५ | १२४.. | - |
| प्रक्रियापूर्व | पायाभूत | १४५१.९४ | ४९३.२१ | १७८४.७१ | - | ८६.०० | - |
| | प्रमाणित / सत्यप्रत | ३८०४.९२ | १८३६.९७ | ७८९.६९ | १९.६० | ८६.९५ | ११८.२० |
| | एकूण | ५७८५.४७ | ३२७०.२८ | ४९९६.८३ | २०.९५ | २९६.९५ | ११८.२० |

#### ब) कलमे रोपे व भाजीपाला बियाणे उत्पादन

| वर्ष | फळांची कलमे / रोपे (संख्या) | शोभेची रोपे (संख्या) | एकूण | भाजीपाला (क्विंटल) (प्रक्रियापूर्व) | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मूलभूत | सत्यप्रत | |
| २०१३-१४ | ११६८८६५ | ३२४४५ | १२०१३१० | ५.४४ | १२९.०५ | १३४.४९ |

#### क) जैविक खते, किडनाशके उत्पादन आढावा

| वर्ष | जैविक किडनाशके | | जैविक खते |
|---|---|---|---|
| | लिटर | क्विंटल | क्विंटल |
| २०१३-१४ | ३५० | १६५.५० | ३१६०.५० लिटर व ६०४.९७ क्विंटल |

## ४. विस्तार शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या कार्यक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्हयांचा समावेश होतो. यामध्ये अहमदनगर, पुणे, सोलापुर, सातारा, कोल्हापुर, सांगली, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार हे जिल्हे येतात. विद्यापीठाची कृषि शिक्षण,कृषि संशोधन आणि कृषि विस्तार शिक्षण ही प्रमुख तीन उद्दिष्ट्ये आहेत.

कृषि विद्यापीठामध्ये विकसीत झालेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत परिणामकारकरित्या पोहचविण्यासाठी विस्तार शिक्षण संचालनालयाची स्थापना १९८१ साली करण्यात आले. विद्यापीठात विकसीत झालेले कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराची जबाबदारी ही शासनाच्या कृषि खात्याकडे आहे. कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असुन त्याद्वारे विस्तार कार्यकर्ते, ग्रामविस्तारक, विषय विशेषज्ञ, विविध खात्यातील अधिकारी, शेतकरी आणि शेतकरी महिला यांना प्रशिक्षण दिले जाते. प्रसार माध्यमे, लिखित साहित्य, विविध संपर्कपद्धतीद्वारे प्रशिक्षित करुन त्यांना कृषि विषयक माहिती दिली जाते. सद्यस्थितीत विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे खालील उद्दिष्टे ठेवून कार्यक्रम राबविले जातात

- विविध कृषि हवामान परिस्थितीत शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी अल्प व दिर्घ मुदतीचे व्यवसायभिमुख प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे
- अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे आद्यरेखा प्रात्यक्षिकाद्वारे चाचणी करुन व्यापक क्षेत्रावर तंत्राचा प्रसार करणे.
- विविध विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना कृषि तंत्रज्ञानाबद्दल माहिती उपलब्ध करणे.
- सुधारीत तंत्रज्ञानाचा लाभ आणि त्यापासुन मिळणारे फायदे कृति/परिणाम प्रात्यक्षीकाद्वारे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष समजावून सांगणे
- स्थानिक पातळीवर प्रश्न, संशोधन शिफारशींच्या आधारे सोडविणे आणि संशोधन बळकटीकरण करण्यासाठी प्रत्याभरण करणे. या व्यतिरिक्त विस्तार संचालनालयामार्फत खालील उपक्रम राबविले जातात.
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे संयोजन व समन्वय साधणे.
- प्रसारण केंद्र, विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि तंत्रज्ञान माहितीकेंद्र आणि कृषि माहिती केंद्रे यामध्ये समन्वय साधने.
- प्रशिक्षंणाचे आयोजन करणे.
- शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने आयोजन करणे.
- महात्मा फुले कृषि विद्यापीठात विस्तार शिक्षणाचे कार्य

### १) कृषि विज्ञान केंद्र

कृषि विद्यापीठाचे चार कृषि विज्ञान केंद्रे आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत धुळे जिल्ह्यासाठी मे १९८३ मध्ये कृषि विज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली. यानंतर सन २०११-१२ ला कृषि विज्ञान केंद्रे मोहोळ (सोलापुर),बोरगाव (सातारा)आणि ममूराबाद फार्म (जळगाव) यांची स्थापना महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत करण्यात आली. या केंद्राची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१. शेतकरी, शेतकरी महिला, ग्रामीण तरुण आणि विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी त्यांच्या गरजेवर आधारीत कृषि क्षेत्रात व त्यांच्याशी संबंधीत उद्योगावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

२. जिल्ह्यामधील महत्वाच्या पिकांच्या उत्पादन तंत्रज्ञानावर आद्यरेखा प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर आयोजित करणे.

३. स्थानिक विशेष अडचणीवर आधारीत कृषि क्षेत्रातील चाचणी प्रयोग आयोजित करणे.

४. कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करणे.

५. इतर जिल्ह्यातील खाजगी कृषि विज्ञान केंद्रांना सुध्दा प्रशिक्षण, मार्गदर्शन व त्यांचा आढावा घेण्यात येतो.

### २) कृषि महाविद्यालय विस्तार गट

कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषि विस्तार विषयाचे प्रात्यक्षीकाद्वारे प्रशिक्षण देण्यासाठी कृषि महाविद्यालय पुणे,धुळे,कोल्हापूर यांना प्रत्येकी ६० ते १०० खेड्यांचा एक विस्तार गट जोडलेला आहे. या विस्तार गटाचा उपयोग विस्तार शिक्षणाची प्रयोगशाळा म्हणून करण्यात येते. विद्यापीठात विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत या विस्तार गटामार्फत पोहचविले जाते. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना क्लिष्ट वाटते का आणि त्याची उपयुक्तता याची पडताळणी या गटामार्फत केली जाते. या गटातील अधिकारी शेतकऱ्यांना वेळोवेळी भेट देतात व शेतीच्या विविध समस्यांवर मार्गदर्शन करतात. या गटात विस्तार कार्यक्रमाचे नियोजन व अमलबजावणी विस्तार प्रशिक्षण अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांचे समवेत कृषि सहाय्यकांच्या मदतीने करतात. विस्तार गटातील कार्यामुळे या शेतकऱ्यांच्या सामाजिक व अर्थिक परिस्थितीत काही बदल झाला आहे काय? याचाही अभ्यास केला जातो. विस्तार गटातील विविध कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अमलबजावनी महाविद्यालयाचे विस्तार शिक्षण विभागातर्फे केली जाते.

### ३) विभागीय विस्तार शिक्षण केंद्रे/जिल्हा विस्तार केंद्रे

अधुनिक तंत्रज्ञानाची चाचणी घेण्यासाठी व ती ताबडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी या विद्यापीठाचे कृषि महाविद्यालयामध्ये विभागीय विस्तार केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. या विद्यापीठामार्फत कृषि महाविद्यालय, पुणे,धुळे,कोल्हापूर आणि मध्यवर्ती परिसर राहुरी येथे हे केंद्र कार्यन्वीत आहेत. कृषि विद्या, उद्यान विद्या, पशुविज्ञान व पीक संरक्षण या चार विषयांचे विशेषज्ञ या विस्तार केंद्रामध्ये असतात. या केंद्राचा प्रमुख विस्तार कृषि विद्या वेत्ता असून ते संचालक विस्तार शिक्षण यांच्या तांत्रीक नियंत्रणाखाली काम करत असतात. या व्यतिरिक्त विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक करण्यासाठी या विद्यापीठाने जळगाव,पाडेगांव(सातारा), सोलापूर, डिग्रज (सांगली) आणि निफाड (नाशिक) येथे चार जिल्हा विस्तार केंद्रे स्थापन केलेली आहेत.

या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे

१. सद्यस्थितीला अस्तित्वात असलेल्या कृषि कर्मचाऱ्यांची ज्ञान पातळी उंचविण्यासाठी अल्पमुदतीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

२. शेतकऱ्यांचे शेती विषयक प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजीत करणे.

३. संशोधन निष्कर्शाच्या प्रत्याभरणाकरीता शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये सुसंवाद घडुन आणने.

४. शेतकऱ्यांचे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी तालुकानिहाय मासिक सभा अयोजित करणे.

५. कृषि संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

अधुनिक कृषि तंत्रज्ञान त्यांच्या कार्यक्षेत्रात पोहचविण्याचे काम त्या विभागातील संबधित विस्तार केंद्रांचे आणि जिल्हा विस्तार केंद्रांचे कर्मचारी करतात यामध्ये मासिक जिल्हा चर्चासत्र , पंधरवाडा प्रशिक्षण, शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे आणि तांत्रिक मार्गदर्शन यांचा समावेश असतो.

या विभागीय विस्तार व जिल्हा विस्तार केंद्रांचे काम परिणामकारक होण्यासाठी आणि विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठाने या प्रत्येक केंद्रास एक वाहन (फिरते चिकित्सालय) दिले आहे. या फिरत्या चिकित्सालयामध्ये माती आणि पाणी पृथ:करण, रोगांचे निदान किडी आणि रोग या विषयावर शेतकऱ्यांना त्याच ठिकाणी माहिती देण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहे. या फिरत्या चिकित्सालयाचा कार्यक्रम भेट देण्याच्या आगोदर शेतकऱ्यांना प्रसार माध्यमाद्वारे कळविला जातो. आणि त्यानुसार शेतकऱ्यांचे प्रश्न त्याच ठिकाणी सोडविले जातात.

### ४) प्रसारण केंद्र

कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे वित्तीय पुरवठ्याने १९८२ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रसारण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. तथापी कृषि अनुसंधान परिषदेचा वित्तीय पुरवठा बंद झाल्यानंतर विद्यापीठाने स्वखर्चाने हे केंद्र चालविली आहे. तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, प्रसार माध्यमांचा परिणामकारक वापर करण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. हे केंद्रे विविध लिखित साहित्ये उदा. घडिपत्रिका, बुलेटींन, कृषिदर्शनी, कृषिवार्ता, श्रीसुगी हे शेतकऱ्यांसाठी आणि विस्तार कार्यकर्त्यांसाठी तयार करुन विक्री करीत असतात. विद्यापीठातील कृषि विषयक कार्यक्रम व घटना यांना विद्यापीठाच्या वार्तापत्रात सातत्याने प्रसिद्धी दिली जाते. शेतीविषयक माहिती संकलन करुन ती दुरदर्शन तसेच आकाशवाणीच्या विविध केंद्रावर, नभोवाणी आणि शेतीशाळा या कार्यक्रमातुन प्रसारीत केली जाते.

### ५) कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, राहुरी

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र हे कृषि विद्यापीठातील संशोधनाबद्दल एकाच ठिकाणी माहिती मिळण्याचे एकमेव ठिकाण आहे. हे केंद्र ऑगस्ट २००१ मध्ये सुरु झालेले आहे. संशोधन संस्था व शेतकरी यांच्यामधील दरी कमी करुन कृषि सेवा सल्ला देणे हा या केंद्राचा प्रमुख उद्देश आहे.

१. कृषि माहिती व तंत्रज्ञान मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना सबळ करणे.

२. संशोधन विभाग/गट आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्यांमध्ये सशक्त समन्वय तयार करणे.

३. शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आणि त्यांच्या कृषि विषयक समस्या सोडविण्यासाठी योग्य मार्गदर्शन/मदत करणे.

४. प्रत्याभरण यंत्रणा/सक्षक्तिकरण करण्यास चालना देणे.

५. पीक आणि पशुविकास आणि उत्पानातील दरी भरुन काढणे.

६. विक्री व सेवा यांच्या साह्याने आर्थीक फायदा मिळवीणे.

७. शेतकरी मेळावे,शिवार फेरी आणि कृषि प्रदर्शनाद्वारे शेतकऱ्यांपर्यत कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे नियंत्रण व्यवस्थापक करतात. कृषि विज्ञान, पीक संरक्षण, पशुविज्ञान, उद्यानविद्या व मृदशास्त्र या पाच विषयांचे विशेषज्ञ त्यांना मदत करतात. जनसंपर्क अधिकारी शेतकऱ्यांशी हितगुज साधण्याचे कामी त्यांना सहाय्य करतात.

दूरभाष्य सेवा, किसान कॉल सेंटर (१८००-१८०-१५५१) वेबसाईड हे नवीन उपक्रम केंद्रामार्फत राबविले जातात.

### ६) शास्त्रज्ञ, प्राध्यापक यांचा विस्तार कार्यक्रमात सहभाग

विद्यापीठातील शास्त्रज्ञ व प्राध्यापक वेळोवेळी स्वतः अथवा गटाने निरनिराळया विषयांवर विस्तार कार्यक्रमात सहभागी होतात. शेती प्रात्यक्षिके,शेतकऱ्यांच्या शेतावरील भेटी, प्रायोगिक शेती प्रयोगास भेटी,गटचर्चा, शेतकरी मेळावे,कृषि प्रदर्शने , शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे,शेतीविषयक मासिकातून लेख, वर्तमानपत्रातून लेख,रेडियो व दूरदर्शन या कार्यक्रमातून शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती दिली जाते.

### ७) विभागीय संशोधन आणि विस्तार सल्लागार समिती

या समिती मध्ये महत्वाचे संशोधन निष्कर्ष व आधुनिक तत्रंज्ञानाबद्द्ल शिफारशी शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी चर्चा केली जाते. ही समिती शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व प्रत्याभरणानुसार संशोधन आराखडा तयार करत असते.

### ८) इतर खात्याशी समन्वय

कृषि विस्तार विद्यावेत्ता यांनी आयोजित केलेल्या जिल्हा मासिक चर्चासत्र आणि प्रक्षेत्र यात विद्यापीठ शास्त्रज्ञांचा सहभाग असतो. राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प आणि कृषि संशोधन केंद्रामधील शास्त्रज्ञांचा सदरच्या मासिक जिल्हा चर्चासत्रात,जिल्हा चर्चासत्रात,संयुक्त प्रक्षेत्र भेटीत आणि चाचणी प्रयोगात प्रामुख्याने सहभाग असतो. मासिक जिल्हा चर्चासत्रात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,कृषि खात्यातील अधिकारी वनविभागाचे अधिकारी,मत्स्यपालन विभागाचे अधिकारी,पाटबंधारे विभागातील अधिकारी उपस्थित असतात. या चर्चासत्रामध्ये शेतकऱ्यांसाठी निविष्ठा, रोपे पुरवठा, पहाणी आणि तपासणी इ.विषयांवर उहापोह केला जातो.

## विस्तार शिक्षण कार्यक्रम

### कृषि विद्यापीठात विस्ताराचे बौध्दिक मंथन चर्चासत्र संपन्न

कृषि विद्यापीठात विस्तार शिक्षण संचालनालय व विभागीय प्रकल्प संचालनालय, विभाग-५, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विस्तारातील संशोधनाची सुधारणा व दिशा यावर एक दिवसीय बौध्दिक मंथन चर्चासत्र दिनांक २६ एप्रिल २०१३ रोजी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. याप्रसंगी व्यासपीठावर धारवाड कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू व कार्यकारी परिषद सदस्य डॉ. एस.ए. पाटील, विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे, भारतीय कृषि अनुसंधान संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जे.पी.एस. दबास, कृषि विस्तार विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. यावेळी माजी कुलगुरू धारवड व कार्यकारी परिषद सदस्य डॉ. एस.ए.पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. याप्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दबास यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. हे बौध्दिक मंथन चर्चासत्र भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या मार्गदर्शनाखाली देशभरात एकाच वेळेस २३ ठिकाणी झाले असून महाराष्ट्रात कोकणासाठी मुंबई तर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा विभागासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे झाले. चर्चासत्रासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि सर्व कृषि विज्ञान केंद्रांचे कृषि विस्ताराचे शास्त्रज्ञ मोठया संख्येने उपस्थित होते. विविध तज्ञांचे यावेळी मार्गदर्शन लाभले.

### खरीप विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक संपन्न

कृषि विद्यापीठाच्या खरीप विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी येथे दिनांक १८ जुलै,२०१३ रोजी संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. यावेळी व्यासपीठावर व्यासपीठावर श्री. विजयरावजी कोलते,मा.उपाध्यक्ष कृषि परिषद पुणे,श्री. उमाकांत दांगट, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी विद्यापीठाने यंदाच्या खरीप हंगामासाठी केलेल्या शिफारशींची माहिती दिली. या बैठकीला कोल्हापूर, सांगली, पुणे विभागातून कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### रब्बी व उन्हाळी विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक संपन्न

कृषि विद्यापीठाच्या रब्बी व उन्हाळी विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक विभागीय संशोधन केंद्र, सोलापुर येथे दिनांक १६ नोव्हेंबर,२०१३ संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, कृषि सहसंचालक श्री. कैलास मोटे, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. पाल, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जनार्दन कदम, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी विद्यापीठाने यंदाच्या रब्बी, उन्हाळी हंगामासाठी केलेल्या शिफारशींची माहिती दिली. कृषि सहसंचालक श्री. कैलास मोटे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. या बैठकीला कोल्हापूर, सांगली, पुणे विभागातून कृषि अधिकारी, शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न

कृषि विद्यापीठ आणि विभागीय प्रकल्प संचालनालय, विभाग-५, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १६ कृषि विज्ञान केंद्राची दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक २०-२१ मार्च,२०१४ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, हैद्राबाद येथील विभागीय प्रकल्प संचालनालयाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र रेडड्डी, सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता (अभियांत्रिकी महाविद्यालय) डॉ. प्रकाश तुरबतमठ, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते के.व्ही.के.साठी विद्यापीठाने दहा वर्षात विकसीत केलेल्या तंत्रज्ञान सुचीचे विमोचन केले.

या कार्यशाळेला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकूण १६ कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विषय विशेषज्ञ, फार्म मॅनेजर, कार्यक्रम सहाय्यक (संगणक) असे एकूण १७० हून अधिक शास्त्रज्ञ, कर्मचारी उपस्थित होते. या दोन दिवसीय कार्यशाळेत के.व्ही.के.चा मागील वर्षाचा आराखडा व पुढील वर्षाचे नियोजन निर्धारित करण्यात आले.

१३ वी विस्तार शिक्षण परिषदेची बैठक संपन्न

कृषि विद्यापीठाची १३ वी विस्तार शिक्षण परिषदेची बैठक दिनांक २ फेब्रुवारी,२०१४ रोजी संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षीय स्थान डॉ. भिमराव उल्मेक यांनी भूषविले. या प्रसंगी संचालक संशोधन, डॉ. राजेंद्र पाटील, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रकाश तुरबतमठ, परिषदेचे सदस्य, कृषिभुषन, श्री. विश्वासराव पाटील, प्रगतशील शेतकरी श्री. पांडुरंग पाटील, श्री. उदय नान्नजकर, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख, डॉ. सुभाषचंद्र शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी कृषिभूषण डॉ. विश्वासराव पाटील, अहमदनगर येथील नाबार्डचे उपजिल्हाव्यवस्थापक श्री. राकेश पनघट, प्रगतशील शेतकरी श्री. उदय नान्नजकर, श्री. पांडुरंग पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. पंडित खर्डे यांनी विस्तार शिक्षण संचालनालयाचा अहवाल सादर केला. विस्तार गट, कृषि महाविद्यालय, पुणे चा

अहवाल डॉ. एस. व्ही. शिर्के यांनी, कृषि महाविद्यालय, धुळे चा डॉ. मिलींद आहिरे यांनी तर कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचा श्री. एम.एन. ताले यांनी सादर केला. या बैठकीस सर्व विभाग प्रमुख, विभागीय सहयोगी संशोधन संचालक, विभागीय विस्तार केंद्रांचे व्यवस्थापक, जिल्हा विस्तार केंद्रांचे अधिकारी, कृषि विज्ञान केंद्रांचे अधिकारी, प्रगतशील शेतकरी, शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### मागोवा-२०१३ संपन्न

कृषि विद्यापीठाचा मागोवा-२०१३ आणि छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन दिनांक १८ फेब्रुवारी,२०१४ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर आकाशवाणी केंद्राचे उपसंचालक श्री. राजेश बेलदार होते. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक,संचालक संशोधक डॉ. राजेंद्र पाटील,नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता, उपस्थित होते.

यावेळी विद्यापीठामधील दहा जिल्हयातील शिक्षण, संशोधन,विस्तार कार्यासंदर्भातील प्रदर्शनाचे प्रमुख पाहुण्याचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्याचे स्वागत, परिचय, प्रास्तावीक, विस्तार आणि शिक्षण संचालनालयाचा गत वर्षाचा आढावा संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक यांनी सादर केला. संचालक संशोधक डॉ. राजेंद्र पाटील, यांनी संशोधनाचा,विद्यापीठ अभियंता श्री मिलींद ढोके यांनी बांधकाम विभागाचा, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी प्रशासन विभागाचा आणि नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले यांनी वित्त विभागाचा गतवर्षाचा आढावा सादर केला. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन 'कृषिदर्शनी २०१४' व विविध कृषि विषयक पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी शिक्षण, संशोधन आणि विस्तारासंदर्भात भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला प्रमुख पाहुणे श्री. राजेश बेलदार, कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे आणि सर्व मान्यवरांनी भेट दिली.

या कार्यक्रमास विद्यापीठाच्या दहा जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण, संशोधन, विस्तार क्षेत्रातील काम करणारे सर्वशास्त्रज्ञ, विद्यार्थी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### कृषि साहित्य संमेलन संपन्न

कृषि विद्यापीठातील विस्तार शिक्षण संचालनालयाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या कृषि तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत कृषि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एकदिवसीय कृषि साहित्य संमेलनाचे आयोजन दिनांक २० फेब्रुवारी,२०१४ रोजी करण्यात आले होते. या संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून कवी श्री. प्रकाश होळकर होते. या संमेलनाचे अध्यक्ष स्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर नाशिक येथील अखिल भारतीय कृषि साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. अरूण आंधळे पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. श्री. शरद पाटील उपस्थित होते. यावेळी महात्मा फुलेंच्या पुतळयापासून ते डॉ. नानासाहेब पवार सभागृहापर्यंत विद्यार्थ्यांनी भव्य कृषिदिंडी काढली. या कृषि साहित्य संमेलनात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चाळीस महाविद्यालयातील सत्तर विद्यार्थ्यांनी शेतीवर आधारीत कविता, पोवाडे, गीते, भारूड, पटकथा इ. सादर केल्या.

### कृषि अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठात राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत खोडवा ऊस व्यवस्थापन या विषयावर कृषि अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे यांच्या हस्ते झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कृषि विभागातील ५० अधिकारी उपस्थित होते.

### शेतकरी-शास्त्रज्ञ मंच सदस्यांची कृषि विद्यापीठास भेट

कृषि संशोधन केंद्र, निफाडच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या शेतकरी-शास्त्रज्ञ मंच सदस्यांपैकी वऱ्हेदारणा व लालपाडी येथील एकूण २१ सदस्यांसाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान पार पडलेल्या या अभ्यासदौऱ्यात सदस्यांनी राजगुरूनगर येथील कांदा व लसूण संशोधन केंद्र, पाडेगांव, ता. सातारा येथील मध्यवर्ती उस संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील उस व गुळ संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठातील पाणी व्यवस्थापन प्रकल्प, पीक पध्दती प्रकल्प, चारापिके संशोधन प्रकल्प, गो सुधार प्रकल्प, शेळी-मेंढी प्रकल्प, रोपवाटीका इ. ठिकाणी भेटी देवून त्याठिकाणी सुरु असलेल्या संशोधन कार्याची माहिती जाणून घेतली.

### शेतकरी मेळावा संपन्न

कृषि विद्यापीठ आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद पुरस्कृत पाणी व्यवस्थापन योजनेव्दारे आदिवासी शेतकरी विकास आणि सबलीकरण योजनेंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना संगमनेरी बोकड वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक, विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी भुषविले. प्रमुख उपस्थितीत संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, नियंत्रक डॉ. पोपटराव कर्डिले, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. मधुकर धोंडे, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे उपस्थित होते. या कार्यक्रमात संगमनेर तालुक्यातील बाबलेवाडी गावातील ग्रामस्थ व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

### माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठातील कृषि रसायन शास्त्र विभाग व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'माती व पाणी परिक्षण आणि खतांचा वापर' या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे प्रमख पाहुणे कृषि आयुक्तालय पुणेचे कृषि संचालक श्री. संजय देशमुख मार्गदर्शन करतांना म्हणाले, माती व पाणी परिक्षण करूण त्यानुसार खतांचा वापर हे आधुनिक शेतीची गरज आहे. यावेळी माती व पाणी परिक्षण पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.या प्रसंगी संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील आणि अधिष्ठाता कृषि डॉ. भीमराव उल्मेक यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गात ५० हून अधिक अधिकारी उपस्थित होते.

### होप प्रकल्पाची चौथी वार्षिक आढावा बैठक संपन्न

पुणे येथे यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीमध्ये होप प्रकल्पाची चौथी वार्षिक आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. याप्रसंगी आफ्रिका येथील होप प्रकल्पाचे व्यवस्थापक डॉ. जॉर्ज ओकवॉच, कोरडवाहू तृणधान्य प्रकल्पाची संचालिका डॉ. स्टेफिनिया ग्रॅन्डो, कृषि महाविद्यालय पुणे चे सहयोगी अधिष्ठाताा डॉ. अजित चंदेले व्यासपीठावर उपस्थित होते.

या बैठकीमध्ये इक्रिसॅट येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. बेलम रेड्डी, डॉ. अशोक कुमार, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, डॉ. एस.टी. बोरीकर, डॉ. शिवाजी मेहत्रे, व विद्यापीठातील शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### जनजागृती कार्यक्रम संपन्न

कृषि विद्यापीठातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा - २००१ दोन दिवसीय जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा प्राधीकरणाचे अध्यक्ष डॉ. आर.आर. हंचीनाल व कुलसचिव डॉ. रविप्रकाश होते. यावेळी व्यासपीठावर सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारुड, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. मधुकर धोंडे , डॉ. विजय शेलार उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठाने विकसित केलेले वाणांचे पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.या कार्यक्रमास ठाणे, यवतमाळ, अमरावती, सांगली, पुणे, सोलापूर, विदर्भ व अहमदनगर जिल्हयातील शंभरहून अधिक शेतक-यांनी हजेरी लावली. यावेळी शेतक-यांनी विकसित केलेले किंवा संवर्धीत केलेले जुणे देशी पीक वाणांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये २६० विविध पिकांचे वाण ठेवण्यात आले होते. याप्रदर्शनास स्थानिक लोकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, शेतकरी, विद्यार्थी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### बिजोत्पादन प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठ, आणि विस्तार संचालनालय, कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेअंतर्गत बियाणे उत्पादनातील नवीन तंत्रज्ञान व गुणवत्ता नियंत्रण या विषयावर कृषि अधिकाऱ्यांसाठी आठ दिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी व्यासपीठावर सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) डॉ. दादाभाऊ यादव, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारुड, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे, विस्तार शिक्षण प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, बियाणे अधिकारी डॉ. मधुकरराव धोंडे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. राजेंद्र पाटील म्हणाले, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने जमीनीच्या प्रकारानुसार वाण विकसित केलेले आहे. कृषि विद्यापीठांनी विकसित केलेले वाणाची लागवड केली तर नक्कीच राज्याच्या उत्पादकतेत वाढ होईल.

याप्रशिक्षण वर्गास महाराष्ट्रातून एकुण २० कृषि विभागाचे कृषि अधिकारी, जिल्हा परिषदेतील कृषि व विस्तार अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. एस.के. रणशिंग यांनी तर आभार प्रा. धनंजय गावडे यांनी मानले.

### ग्रामबिजोत्पादन प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठातील बियाणे विभागाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एक दिवसीय बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता(निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. मधुकर धोंडे उपस्थित होते.यावेळी अधिष्ठाता(कृषि), डॉ. भिमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता(निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. मधुकर धोंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी पंचसुत्री, हरभरा पिकाचे बिजोत्पादन, बीज प्रमाणीकरण कार्यपध्दती, रब्बी मका लागवड तंत्रज्ञान, गहु बिजोत्पादन तंत्रज्ञान, कांदा बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाला नगर जिल्ह्यातील १०० हुन अधिक शेतकरी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना कुलगुरुंच्या हस्ते कृषि दर्शनीचे वाटप करण्यात आले.

### शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

कृषि विज्ञान केंद्र धुळे व राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर लि. यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रमोद रसाळ यांच्या हस्ते झाले.

या वेळी तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. मिलिंद आहिरे कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, यांनी विद्यापीठाची प्रकाशने, डॉ. प्रितम शिंदे यांनी ग्रामबिजोत्पादन, डॉ. प्रविण राठोड यांनी सुक्ष्म अन्नद्रव्यांचे पिक उत्पादनात महत्व व डॉ. पंकज पाटील यांनी कपाशीवरील जैविक किड व रोग नियंत्रण आणि कु. अमृता राऊत यांनी फळे व भाजीपाला प्रक्रिया या विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचा लाभ धुळे जिल्ह्यातील ३३ गावांमधील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतला.

### राज्यस्तरीय परिसंवाद संपन्न

कृषि विद्यापीठातील मृदशास्त्र व कृषि रसायनविभागांतर्गत भारतीय मृदविज्ञान समितीद्वारे ‘अन्नशाश्वतीसाठी जमिनीचे आरोग्य या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते‘. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय मृदविज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. के. रतन उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन

परिषदेचे सहसंचालक (मृद) डॉ. एस. के. चौधरी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक मृदशास्त्र व कृषि रसायन विभाग प्रमुख डॉ. ए. एल. फरांदे उपस्थित होते.

### प्रशिक्षण वर्ग

कृषि विद्यापीठातील विस्तार शिक्षण विभाग व विस्तार शिक्षण संस्था, आनंद (गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील शास्त्रज्ञांसाठी 'सहभागातून प्रशिक्षणाचे व्यवस्थापन' या विषयावर ३ दिवसांची कार्यशाळा फेब्रुवारी,२०१४ मध्ये आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विविध विभागातील ५० शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व विभागीय प्रकल्प संचालनालय,हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४-२६ फेब्रुवारी,२०१४ रोजी सुक्ष्म सिंचनाद्वारे सुधारीत शेती या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातील विविध कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी या प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतला.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व मॅनेज,हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५-२६ मार्च,२०१४ रोजी शेतकरी उत्पादक संस्था या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण वर्गात एकूण ६४ शेतक-यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यापीठातील संचालक विस्तार शिक्षण डॉ. बी. आर. उल्मेक व इतर शास्त्रज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### खरीप हंगाम पुर्व बैठक आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत दहा जिल्हयामध्ये कृषि विभागाच्या समन्वयाने एप्रिल ते जुन २०१३ रोजी खरीप हंगाम पूर्व तयारी या विषयांवर विविध ठिकाणी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठक आयोजना मध्ये विभागीय व जिल्हा विस्तार केंद्र,कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत विविध शास्त्रज्ञांनी सहभाग घेउन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### मासिक जिल्हा चर्चासत्र आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत दहा जिल्हयामध्ये कृषि विभागाच्या समन्वयाने मासिक जिल्हा चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी विभागीय व जिल्हा विस्तार केंद्र,कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत विविध शास्त्रज्ञांनी सहभाग घेउन उपस्थित अधिकरी व कर्मचा-यांना मार्गदर्शन केले.

### निदानात्मक चमू भेटींचे आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत दहा जिल्हयामध्ये गरजेनुरूप निदानात्मक चमु भेटींचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी विभागीय व जिल्हा विस्तार केंद्र,कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत विविध शास्त्रज्ञांनी सहभाग घेउन उपस्थित अधिकरी व कर्मचा-यांना मार्गदर्शन केले.

## विस्तार शिक्षण उपक्रम

| अ.क्र. | | तपशिल | कार्यक्रम | एकुण लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | | **प्रशिक्षण कार्यक्रम** | | |
| | अ) | शेतकरी,शेतकरी महिला व युवकांसाठी प्रशिक्षण | १५३ | ७०१२ |
| | ब) | कृषि व विकास खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण | १५ | १०५४ |
| | क) | शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये चर्चासत्र-प्रशिक्षण वर्ग | २१ | १४७४ |
| २. | | **चर्चासत्र/परिसंवाद** | | |
| | अ) | मासिक जिल्हा चर्चासत्र | ५८ | १३६६ |
| | ब) | संयुक्त संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक | ०२ | २७५ |
| | क) | विद्यापीठ शास्त्रज्ञांचा परिसंवाद/चर्चासत्रात सहभाग | २१ | १३१२ |
| ३. | | **प्रात्यक्षिके/चाचणी प्रयोग** | | |
| | अ) | कृषि प्रात्यक्षिके | ३७० | ४५४७ |
| | ब) | परीणाम प्रात्यक्षिके | ४०३ | ४०३ |
| | क) | आद्यरेखीय प्रात्यक्षिके | १४७१ | १४७१ |
| ४. | | **इतर विस्तार शिक्षण कार्यक्रम** | | |
| | १. | सभा/ गटचर्चा | २६७ | ३१९० |
| | २. | प्रक्षेत्र भेटी/शिवार फेरी | ३७४ | ३७४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. | शेतीदिन | १४ | |
| | ४. | प्रक्षेत्र व गृह भेटी | ५६८ | ५६८ |
| | ५. | शेतकरी मेळावे | ९६ | -- |
| | ६. | कृषि प्रदर्शने | ३९ | -- |
| | ७. | निदान चमुच्या भेटी व रोग आणि किड पहाणी पथक | १६७ | -- |
| | ८. | विद्यापीठ शास्त्रज्ञांचे कृषि खाते व इतर सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या विस्तार कार्यक्रमात व्याख्याने | ३५४ | -- |
| | ९. | शेतकऱ्यांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे | २७६१ | -- |
| | १०. | विद्यापीठ शास्त्रज्ञांचे विविध विस्तार कार्यक्रमात उपस्थिती व सहभाग | ३५४ | -- |
| | ११. | विद्यापीठ शास्त्रज्ञांचे खरीप/रब्बी चाचणी प्रात्यक्षिके यांना भेटी | ३७५ | -- |
| | १२. | शेतकरी - शास्त्रज्ञ मंच | ५२ | ६३० |
| ५. | | **प्रसिध्दी व प्रकाशने** | | |
| | अ) | **प्रसिध्दी** | | |
| | | १. बातम्या : दैनिक वर्तमानपत्रे/रेडिओ/दूरदर्शन | १४४६ | -- |
| | | २. वर्तमानपत्रात/मासिकात प्रसिध्द झालेले लेख | ४१५ | -- |
| | | ३. आकाशवाणी कार्यक्रम | ११७ | -- |
| | | ४. दूरदर्शन कार्यक्रम | ५५ | -- |
| | | ५. टि.व्ही.च्या इतर वाहिन्यांवर प्रसारीत झालेले कृषिविषयक कार्यक्रम | ४५ | -- |
| | ब) | **प्रकाशने विक्री** | | |
| | | १. कृषी दर्शनी २०१२ | १८००० | १८००० |
| | | २. श्रीसुगी (खरीप, रब्बी, उन्हाळी) | ९९७० | ९९७० |
| | | ३. इतर प्रकाशने | १५७ | -- |
| | | ४. घडी पत्रिका | १०००० | -- |
| | क) | **विद्यापीठ व इतर ठिकाणी झालेल्या भेटी** | **मफुकृवि,राहुरी** | **इतर केंद्रे** |
| | | १. शेतकरी | १६५७४ | ११७७० |
| | | २. विद्यार्थी | ४३७२ | ३१७८ |
| | | ३. प्रशिक्षणार्थी | ५६० | ३७४ |
| | | ४. अधिकारी | २७६ | १९८ |
| | | ५. अति महत्वाच्या व्यक्तिंच्या भेटी | ३६ | २४ |
| ६. | | **फिरते पीक चिकित्सालय कार्यक्रम** | | |
| | १. | शेतकऱ्यांचे सोडविलेले प्रश्न | २७८४ | २७८४ |
| | २. | पाणी परिक्षण | ५६४ | ५६४ |
| | ३. | माती परिक्षण | ११६४ | ११६४ |
| | ४. | किड नमुने तपासणी | ४७६ | ४७६ |
| | ५. | रोग नमुने तपासणी | ५७५ | ५७५ |
| ७. | | **दुरभाष्य/दूरध्वनीव्दारे दिलेली उत्तरे** | १५२७६ | १५२७६ |

## ५. प्रमख घडामोडी

### राष्ट्रिय परिषद संपन्न




कृषि विद्यापीठांचे कुलगुरू आणि भारतीय कृषि संशोधन संस्थेचे संचालक आणि प्रगतशील शेतकरी यांच्या परिषदेचे उद्‌घाटन बारामती येथे महामहीम राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांचे हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शन करताना महामहीम राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी म्हणाले सध्या कृषि क्षेत्रात मजुरांची टंचाई भासत आहे. त्यामुळे शेतीमध्ये यांत्रिकीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर चांगल्या प्रतीचे बियाणे आणि खते यांचाही वापर वाढण्यासाठी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी प्रयत्न करायला हवा.

अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण होते. यावेळी केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार, उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार, केंद्रीय कृषि राज्यमंत्री डॉ. चरणदास महंत, राज्याचे कृषिमंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सौ.सुप्रिया सुळे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, अन्न सुरक्षा हे आपल्या देशापुढील आव्हान आहे. देशातील शेतकरी आपल्या कष्टातून मोठया प्रमाणावर अन्नधान्यांचे उत्पादन करीत आहे. त्यामुळे हे आव्हान आपण सहजपणे पेलू शकू. पण शेतीचे होणारे तुकडे आणि हवामानात होणारे बदल यामुळे शेतीच्या उत्पादनावर होणारा दुष्परिणाम चिंताजनक आहे. केंद्रीय कृषिमंत्री श्री. शरद पवार म्हणाले, गेल्या दहा वर्षात अन्नधान्यांच्या उत्पादनात दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. दूध, मांस, अंडी आणि फळे यांच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. उत्पादनाच्या विक्रमी वाढ होण्याचे सर्व श्रेय शेतकऱ्यांना आहे. या प्रसंगी सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, संचालक, शास्त्रज्ञ मोठया संख्येने उपस्थित होते.

### २९ वा पदवीप्रदान समारंभ उत्साहात संपन्न

कृषि विद्यापीठाचा २९ वा पदवीप्रदान समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे कृषि व पणन मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील




होते. प्रमुख पाहुणे म्हणून गुजरात येथील केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती व माजी केंद्रीय मंत्री डॉ. योगिंदर अलघ होते. यावेळी व्यासपीठावर बिहारचे राज्यपाल महामहिम पद्मश्री डॉ. डी.वाय पाटील, माजी केंद्रीय मंत्री पद्मभूषण श्री. बाळासाहेब विखे पाटील, कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. भीमराव उल्मेक, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे उपस्थित होते.

आपल्या दीक्षांत भाषणात डॉ. योगिंदर अलघ म्हणाले, येणाऱ्या काळात देशाच्या अन्नधान्याची गरज विशेषतः कडधान्याची गरज लक्षात घेता तंत्रज्ञान निर्मिती व प्रसारासाठी शासकीय-खाजगी भागीदारीचे मॉडेल आवश्यक आहे. ते म्हणाले की सन २०१४ पर्यंत आपली कडधान्याची गरज ही सुमारे २५ दशलक्ष टन इतकी अपेक्षित आहे. म्हणजेच आपल्याला कडधान्य उत्पादनात दोन पटीने वाढ करणे गरजेचे आहे. कृषि विद्यापीठांचे योगदान यासाठी महत्वपूर्ण राहिल. शेतकऱ्यांना त्याच्या उत्पादीत मालासाठी योग्य दर देणे तितकेच महत्वाचे आहे. त्यासाठी किमान आधारभूत मूल्य देणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाची निर्मिती व त्याचा प्रसार साध्य करण्यासाठी शासकीय - खाजगी संस्थाची भागिदारी महत्वाची आहे.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी विद्यापीठाचा कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचा अहवाल सादर केला. राज्याचे कृषि व पणन मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ३१ विद्यार्थ्यांना पी एच डी, २६१ विद्यार्थ्यांना पदवी असे एकूण १८५४ विद्यार्थ्यांनी पदव्या प्रदान करण्यात आल्या. ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे शुभहस्ते बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली पुणे कृषि महाविद्यालयाची कु. रजनी बागल, बी.एस्स.सी(उद्यान विद्या) पदवीत प्रथम आलेली पुणे उद्यानविद्या महाविद्यालयाची कु. गितांजली, बी.टेक (कृषि अभियांत्रिकी ) प्रथम आलेली डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रीकी महाविद्यालयाची कु. प्रिती लुटे व इतर यशस्वी विद्यार्थ्यांना पदके प्रदान करण्यात आली.

पदवीप्रदान समारंभ प्रसंगी बिहारचे राज्यपाल महामहिम पदमश्री डॉ. डी.वाय. पाटील आणि माजी केंद्रीय मंत्री पदमभूषण श्री. बाळासाहेब

विखे पाटील यांना कृषि, सहकार आणि शैक्षणिक योगदानाबदल डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्या देऊन सन्मानित करण्यात आले.

समारंभाला सौ. सिंधूताई विखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे,विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य ॲड. तानाजीराव धसाळ, ॲड. सुभाष पाटील, पंचायत समिती सभापती श्री. शिवाजीराव गाडे, डॉ. बुधाजीराव मुळिक, कृषि आयुक्त उमाकांत दांगट, आ. श्री. भाऊसाहेब कांबळे, माजी आमदार चंद्रशेखर कदम प्रवरा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेंद्र विखे, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरु डॉ. किसनराव लवांडे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे कुलगुरु डॉ. रविप्रकाश दाणी, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, विद्या परिषदेचे व विस्तार शिक्षण परिषदेचे सदस्य, मान्यवर, अधिकारी, विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्रगतीशील शेतकरी, विद्यार्थी व विद्यार्थींनी मोठया संख्येने उपस्थित होते.

### कराड येथील कृषि महाविद्यालयाचे उद्घाटन संपन्न



कराड येथील मुंढे विजयनगर येथे कृषि महाविद्यालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृषि व पणन मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भूषविले.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अर्थव्यवस्थेचा विकास झाला पाहिजे. शेतकऱ्यांचा विकास झाला तरच राज्याचा विकास होईल, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ज्या जिल्हयांमध्ये शासकीय कृषि महाविद्यालये नाहीत अशा जिल्हयांमध्ये पुढील वर्षापासून पाच महाविद्यालयांची निर्मिती करण्यात येणार आहे. कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी प्रास्ताविक आणि स्वागत केले.

याप्रसंगी महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात, वन मंत्री डॉ. पतंगराव कदम, कृषि व पणन मंत्री श्री.सतेज पाटील, आमदार श्री.बाळासाहेब पाटील, आमदार श्री.जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्ष सौ.अरूणादेवी पिसाळ, आयुक्त श्री.प्रभाकर देशमुख, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक श्री.तुकाराम चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ. रामास्वामी एन., मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अभिजीत बांगर, पोलिस अधिक्षक के. एम. एम. प्रसन्ना, श्री.आनंदराव पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात कृषि व पणन मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, की राज्याचा कृषि विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या १२१ खासगी कृषि महाविद्यालये राज्यात आहेत. नवीन पिढीने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी आणि शास्त्रोक्त शेती करावी, यासाठी अभ्यासक्रमात योग्य ते बदल करण्यात येणार आहेत याप्रसंगी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास संचालक, शास्त्रज्ञ, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### विविध विकास कामांचे उद्घाटन संपन्न



कृषि विद्यापीठात विविध विकास कामांचे उद्घाटन ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यकारी परिषद सदस्य ॲड. श्री. तानाजी धसाळ, अधिष्ठाता डॉ.भिमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, जिल्हा परिषद सदस्य ॲड. श्री. सुभाष पाटील, पंचायत समिती सभापती श्री. शिवाजीराव गाडे, पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे संचालक, शिक्षण प्रा. उत्तम कदम, तहसिलदार श्री. दादाभाऊ गिते, कृषिभुषण श्री. सुरसिंग पवार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. ए. माने, श्री. शांताराम आहेर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, राज्याचे ८२% क्षेत्र कोरडवाहू असुन, प्रत्येक जिल्हयात विविध हवामान विभाग येतात. या हवामानानुसार प्रत्येक जिल्ह्यांची कृषि विषयक वेगवेगळया मागण्या असतात. या शेतकऱ्यांच्या मागण्या व प्रत्येक जिल्हयांच्या विविध हवामानानुसार राज्याचे कृषि धोरण बनणार आहे. पुढील तीन वर्षात राज्यात एकुण १६ कृषि महाविद्यालय सुरु करणार असल्याचे कृषिमंत्री म्हणाले. या देशात कृषि मालाचे काढणीपासून ते विक्रीपर्यंत मोठया प्रमाणावर नुकसान होते. यासाठी काढणी पश्चात तंत्रज्ञान, कृषि माल प्रक्रिया, शित कक्षाची साखळी यावर शासन भर देत आहे. यावेळी कृषि मंत्र्यांच्या हस्ते ९० लाखाचा जलतरण तलाव, ७५

लाखाचे परिक्षा कक्ष, ५० लाखाचे कृषि औजारे चाचणी प्रशिक्षण केंद्र, ६७.९४ लाखाचे वनस्पती जैवविविधता संवर्धन केंद्र आणि ८७ लाखाचे मुलींचे वस्तीगृहाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी कृषि मंत्र्यांनी रमजान ईदच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. क्रांती दिनाच्या निमित्ताने शहिद जवानांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, यावर्षी विद्यापीठाने विविध कंपन्यांबरोबर १२ सामजंस्य करार केले असून दुष्काळाच्या काळात कृषि विद्यार्थ्यांमार्फत १ लाख १५ हजार शेतकऱ्यांपर्यंत कृषि आपत्ती व्यवस्थापन तंत्रज्ञान पोहचविले आहे. विद्यापीठाच्या ७ संशोधन केंद्रांना उत्कृष्ट केंद्रे म्हणून पुरस्कार मिळाले असून यावर्षी याविद्यापीठाने सर्वात जास्त कृषि तंत्रज्ञान शिफारशी, वाण व औजारे प्रसारित केले आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक यांनी तर आभार कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी मानले. या कार्यक्रमास सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता (अ.शिं.कृ.अ. महाविद्यालय) डॉ. प्रकाश तुरभतमठ, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद डोके, नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, कमर्चारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## जनुकीय परिवर्तित पिकांवर बैठक संपन्न



जनुकीय परिवर्तित पिकांचे प्रात्यक्षिकास नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरिता शासनास सल्ला देण्यासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीची पाचवी बैठक कृषि विद्यापीठातील राज्यस्तरीय जैवतंत्रज्ञान केंद्र येथे पार पडली. या समितीच्या अध्यक्षस्थानी नामवंत शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, पदसिध्द प्राध्यापक, अनुउर्जा विभाग, भाभा अनुसंशोधन केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई हे असून कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. किसनराव लवांडे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. रविप्रकाश दाणी, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. संजीव जैस्वाल आणि संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील व डी. पी वास्कर या समितीचे सदस्य आहे. आयुक्त (कृषि), श्री. उमाकांत दांगट हे सदस्य, सचिव आहे. या बैठकीस सर्व उपस्थित होते.

याप्रसंगी जनुकीय परिवर्तित पिकांच्या राज्यात क्षेत्रीय चाचण्या घेण्याकरिता मार्गदर्शक तत्वांचा विस्तृत ऊहापोह करण्यात आला. या बैठकीत श्री. सुनिल वानखेडे, कुलसचिव,मफुकृवि, राहुरी तसेच श्री. जयंत देशमुख, संचालक कृषि आयुक्तालय, पुणे व डॉ. दिलीप झेंडे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी हे उपस्थित होते. कृषि विद्यापीठाच्या राज्यस्तरीय जैव तंत्रज्ञान केंद्राचे प्राध्यापक डॉ. अशोक जाधव व डॉ. दिलीप झेंडे यांनी नियंत्रणाची कार्यान्वय पध्दतीने सादरीकरण केले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी




कृषि विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन ॲड. संघराज रूपवते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी भुषविले. यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. संघराज रुपवते म्हणाले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वदुर शिक्षण, आर्थिक समता, स्त्री समता यांचे प्रणेते होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुण्याची ओळख व प्रास्ताविक सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर सहयोगी अधिष्ठाता (प म) डॉ. सुरेश बोरकर, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, उद्यान विद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, कृषि विस्तार विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, सौ. रूपवते, विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. शरद पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमास प्राध्यापक, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## कृषि विद्यापीठाचा सुदान विद्यापीठाशी सामंजस्य करार

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि अल झाइम अल अझारी विद्यापीठ, खारतोम, उत्तर सुदान यांच्यात कृषि शिक्षण, संशोधन व विस्तारासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य



करारावर कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे व सुदान कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मोहम्मद सैइद अलाखलिफा यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक यांनी विद्यापीठाचा शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याचे सादरीकरण केले. याप्रसंगी सुदान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. ताजेल्दिन अली अब्दल रहेमा, प्रकल्प समन्वयक, डॉ. अश्रर्फ इझिल्दिन अब्दला मोहम्मद, विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर, कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अजित चंदेले, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी कृषि विस्ताराचे कार्य जाणून घेण्यासाठी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, जैवतंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी जैवतंत्रज्ञान विभाग, फळ प्रक्रिया केंद्र व इतर केंद्रांना भेटदिल्या व तंत्रज्ञान जाणून घेतले.

### राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री. जे. पी. डांगे यांची विद्यापीठास भेट



कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली कृषि विद्यापीठात वित्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री. जे. पी. डांगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मार्गदर्शन करतांना श्री. जे.पी. डांगे म्हणाले, राज्यातील कृषि विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे दहा जिल्हयाचे सर्वात मोठे कार्यक्षेत्र आहे. जेवढे मोठे कार्यक्षेत्र तेवढेच मोठे विद्यापीठाचे कार्य आहे.

या प्रंसगी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी कृषि शिक्षण, संशोधन व विस्ताराचा आढावा सादर केला. या बैठकीत विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कुलसचिव श्री. भानुदास पालवे, नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठता (निकृशि) डॉ. अजित देशपांडे, विभाग प्रमुख डॉ.दादाभाऊ यादव, उपकुलसचिव श्री. प्रशांत नागे उपस्थित होते. या बैठकीचे सुत्रसंचालन श्री. भानुदास पालवे यांनी तर आभार डॉ. हरी मोरे यांनी मानले.

### राज्याचा ५३ वा वर्धापन दिन साजरा



कृषि विद्यापीठात राज्याचा ५३ वा वर्धापन दिन व जागतिक कामगार दिन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहन करुन साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरुनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांस संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, विविध विभागाचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार

देशात प्रथमच आंतरराष्ट्रीय पशुसंवर्धन अभ्यासक्रम सुरू होत असून त्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि व्हॅन हॉल लॅरेस्टीना युनिव्हर्सिटी, नेदरलँड यांच्यात आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार करण्यात आला. बी.एस्सी (पशुसंवर्धन) आंतरराष्ट्रय पदवी (२+२) अभ्यासक्रम सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सुरू होणार आहे. देशात प्रथमच महाराष्ट्र राज्यात हा अभ्यासक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत कृषि महाविद्यालय, बारामती येथे सुरू होणार आहे. या पदवी अभ्यासक्रमात प्रथम व व्दितीय वर्षामध्ये विद्यार्थी बारामती येथे अभ्यासक्रम पूर्ण करतील व तृतीय व चतुर्थ वर्षात व्हॅन हॉल लॅरेस्टीन युनिव्हर्सिटी, नेदरलँड येथे अभ्यासक्रम पूर्ण करतील. या शैक्षणिक पध्दतीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येत असून कौशल्यावर आधारित शिक्षणाला प्राधान्य देण्यात येणार आहे. राज्याच्या शिक्षण क्षेत्रासाठी एक अभिमानाची गोष्ट असून पशुसंवर्धनामध्ये शिक्षण, संशोधन आणि विस्तारात नवे पर्व सुरू होणार आहे.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रख्यात लेखक कवी प्रा. फ. मु. शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. श्री.फ.मु.शिंदे म्हणाले, भाषा ही प्रेमाची, ज्ञानाची व विस्ताराची प्रतिक आहे. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, फक्त ॲग्रिकल्चरच सर्वांना वाचवू शकते. म्हणून ॲग्रिकल्चरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा अभिमान वाटला पाहिजे. सर्व पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर यांनी केले. व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. सुरेश बोरकर, अभियांत्रिकी कॉलेजचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबटमठ, उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद डॉ. राजीव नाईक, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी, श्री. शरद पाटील, विद्यार्थी परिषद सभापती कु. प्रिया चौधरी, कु. भावना देशमुख उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वरा या विद्यार्थ्यांचा कविता संग्रहाचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी म्हणून श्री. श्रीराम रायते (पीएच.डी.) व श्री. राहुल गाढे यांना तर सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना देण्यात आला. वार्षिक अहवाल वाचन कु. प्रिया चौधरी, सभापती, विद्यार्थी परिषद यांनी केला. या कार्यक्रमास सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. अजितकुमार देशपांडे, वनस्पतीशस्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारूड, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक फरांदे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुरेश थोरात, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### विविध विकास कामांचे उद्‌घाटन



कृषि विद्यापीठातील डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अवजारे गृह, संगणक कक्ष, दृकश्राव्य कक्ष, कॅड कॅम प्रयोगशाळा, सेमिनार हॉल, जी.आय.एस. रिमोट सेन्सींग प्रयोगशाळेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ.हरी मोरे, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, नियोजन अधिकारी डॉ. शरद माटे, नियंत्रक श्री. पोपट कर्डिले, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे, डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रा. भिमाजी गावडे, प्रा.तुळशीदास बास्टेवाड, प्रा. सचिन नलावडे, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.मुकुंद गुंड यांनी केले. आभार विद्यापीठ अभियंता श्री.मिलींद ढोके यांनी मानले.

### वार्षिक बक्षिस वितरण समारंभ संपन्न




कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वार्षिक बक्षिस वितरण समारंभ माजी खा. यशवंतराव गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत व संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश तुरबतमठ, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. शरद पाटील उपस्थित होते

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. यशवंतराव गडाख म्हणाले, विद्यार्थ्यांनी कितीही प्रगती केली तरी संस्कृती विसरू नये. आपली संस्कृती आपल्यावर चांगले संस्कार करते. डॉ. हरी मोरे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून श्री. प्रसाद झावरे तर उत्कृष्ट खेळाडू म्हणून कु. श्रुती नळकांडे यांना पारितोषिक देण्यात आले. याप्रसंगी २०१२-१३ वर्षभरातील घडामोडीचा अहवाल श्री. प्रसाद झावरे यांनी सादर केला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद प्रा. भिमाजी गावडे, डॉ. शरद गडाख, प्रा. विरेंद्र बाराई, डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. अतुल अत्रे, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

### कृषि महाविद्यालय, कोल्हापुरचे विविध विकास कामांचे उद्घाटन

कृषि महाविद्यालय, कोल्हापुर येथील विविध विकास कामांचे उद्घाटन कुलगुरु डॉ.तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता(कृषि) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता डॉ. एन. वाय. पाटील उपस्थित होते. यावेळी कुलगुरुंच्या हस्ते कृषि महाविद्यालयच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या स्वागत कमानीच्या तटरक्षक भिंतीचे, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागामधील आधुनिक गोठयांचे कृषिविद्या प्रक्षेत्रावरील कृषि औजारे निवाऱ्यांचे व विस्तार शिक्षण विभागामधील व्हिडीओ कॉन्फरसिंग तंत्रज्ञान प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी  सहयोगी संशोधन संचालक, शेंडा पार्क, डॉ.एस.एम. मोरे, डॉ. आर. आर. सुर्यवंशी, प्रा. बी.टी. कोलगणे, प्रा. डी. के. कांबळे, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अजय देशपांडे यांनी केले तर आभार डॉ. पांडूरंग मोहिते यांनी मानले.



### यांत्रिकीकरण दिन साजरा

कृषि विद्यापीठ आणि मे. न्यु. हॉलंड फियाट इंडिया प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात कृषि यांत्रिकीकरण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. अ.शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. अजित देशपांडे, न्यु. हॉलंड कंपनीचे झोनल मॅनेजर श्री. अंकुश पाटील, श्री. संजय विज उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, शेतीमधील भौगोलिक, सामाजिक, नैसर्गिक स्थितीचा विचार करता आधुनिक शेतीला यांत्रिकीकरणाची जोड दिल्याशिवाय पर्याय नाही. याप्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केले. याप्रसंगी शेतकऱ्यांसाठी ऊस हार्वेस्टर, प्लान्टर, मल्चर, बेलर, रेक, पॉवर हॅरो, फवारणी यंत्र इ. आधुनिक यंत्र व औजारांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.  यावेळी ऊस हार्वेस्टरचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविण्यात आले. या कार्यक्रमास शेतकरी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.  या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. टी. बी.बास्टेवाड व प्रा. सचिन नलावडे यांनी केले तर आभार श्री. संजय विज यांनी मानले.

### सूत्रकृमीवरील राष्ट्रीय वार्षिक आढावा बैठक संपन्न

अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेंतर्गत कृषि विद्यापीठात दिनांक ८-९ मार्च, २०१३ रोजी राष्ट्रीय पातळीवरील सूत्रकृमीचे वार्षिक संशोधन आढावा बैठक उद्घाटन समारंभ संपन्न झाला. याप्रंसगी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे अध्यक्षस्थानी होते. तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक (पीक संरक्षण) डॉ.टी. पी. राजेंद्रन, डॉ.आर.के. जैन, प्रकल्प समन्वयक, नवी दिल्ली उपस्थित होते.  याप्रसंगी विविध कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, विद्यापीठातील विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती. देशांतर्गत सुत्रकृमी संशोधन प्रकल्पाचे ३४ सुत्रकृमीशास्त्रज्ञ सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी सुत्रकृमीचे एकात्मीक व्यवस्थापनावरील संशोधनात, जैवीक पध्दतीच्या संशोधनवर भर देण्याचे सुतोवाच केले. तसेच महाराष्ट्रासाठी सुत्रकृमीदर्शक नकाशाचे पुस्तक प्रकाशित करण्याचे सुचविले.  डॉ.टी. पी. राजेंद्रन, डॉ. जैन यांनी मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमासाठीचे नियोजन व स्वागत सुत्रकृमी प्रकल्प डॉ.एन.एल.म्हसे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सी.एस. पाटील यांनी केले व आभार किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एस.जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास सहयोगी संचालक संशोधन, सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारीवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.




### कृषि विद्यापीठात विस्ताराचे बौध्दिक मंथन चर्चासत्र संपन्न

कृषि विद्यापीठात विस्तार शिक्षण संचालनालय व विभागीय प्रकल्प संचालनालय, विभाग-५, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विस्तारातील संशोधनाची सुधारणा व दिशा यावर एक दिवसीय बौध्दिक मंथन चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. याप्रसंगी व्यासपीठावर धारवाड कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू व कार्यकारी




परिषद सदस्य डॉ. एस.ए. पाटील, विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे, भारतीय कृषि अनुसंधान संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ, जे.पी.एस. दबास, कृषि विस्तार विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी केले. यावेळी माजी कुलगुरू धारवड व कार्यकारी परिषद सदस्य डॉ. एस.ए.पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. याप्रसंगी संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दबास यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. हे बौध्दिक मंथन चर्चासत्र भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या मार्गदर्शनाखाली देशभरात एकाच वेळेस २३ ठिकाणी झाले असून महाराष्ट्रात कोकणासाठी मुंबई तर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा विभागासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे झाले.

### कृषि अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठात राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत खोडवा ऊस व्यवस्थापन या विषयावर कृषि अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. हरी मोरे म्हणाले, सध्या शेती क्षेत्रातील मजुरांची टंचाई लक्षात घेता ऊस शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे आहे. तसेच त्यांनी ऊस पिकाच्या लागवडीपासून ते तोडणीपर्यंतच्या औजारांची माहिती दिली. यावेळी तालुका कृषि अधिकारी श्री. नामदेव रोकडे, राष्ट्रीय कृषि विकास योजनेचे प्रमुख समन्वयक डॉ. आनंद सोळंके, सहसमन्वयक डॉ. पंडित खर्डे, तज्ञ डॉ. अनिल दुरगुडे, प्रा. धर्मेंद्रकुमार फाळके, प्रा.मंजाबापू गावडे, उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कृषि विभागातील ५० अधिकारी उपस्थित होते.

### कार्यशाळेचे उद्घाटन संप

कृषि विद्यापीठ आणि विभागीय प्रकल्प संचालनालय, विभाग-५, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १६ कृषि विज्ञान केंद्राची दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे




यांच्या हस्ते झाले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरु म्हणाले, विद्यापीठाचे विकसीत तंत्रज्ञान आपल्या जिल्हयातील/तालुक्यातील वातावरणात पडताळून पाहणे व त्याचे प्रत्याभरण देणे हे प्रत्येक के.व्ही.के.चे कार्य आहे. त्यासाठी प्रत्येक के.व्ही.के च्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व त्यांची क्षमता वाढविणे गरजेचे आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, हैद्राबाद येथील विभागीय प्रकल्प संचालनालयाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र रेडड्डी, सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता (अभियांत्रिकी महाविद्यालय) डॉ. प्रकाश तुरबतमठ, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते के.व्ही.के. साठी विद्यापीठाने दहा वर्षात विकसीत केलेल्या तंत्रज्ञान सुचीचे विमोचन केले. या कार्यशाळेला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकूण १६ कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विषय विशेषज्ञ, फार्म मॅनेजर, कार्यक्रम सहाय्यक (संगणक) असे एकूण १७० हून अधिक शास्त्रज्ञ, कर्मचारी उपस्थित होते.

### कृषि हवामान विभागनिहाय अभ्यास गटची बैठक संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि हवामान विभागनिहाय अभ्यास गट क्र.२ ची प्राथमिक बैठक कृषि विद्यापीठात संपन्न झाली. या बैठकीचे

अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. याप्रसंगी व्यासपीठावर पुणे महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य डॉ. बुधाजीराव मुळीक, राज्याचे निविष्ठा व गुण नियंत्रण संचालक डॉ.एस.एस. अडसुळ, संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, पुणे चे विभागीय कृषि सहसंचालक, डॉ.एस.एल. जाधव, कोल्हापूरचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. एन.टी.शिसोदे, नाशिकचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. डी. जी. काळाने, औरंगाबादचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. शु. रा. सरदार, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ.सुरेश बोरकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरु म्हणाले, कृषि मंत्र्यांच्या संकल्पनेतून या कृषि हवामान विभागाच्या जिल्हानिहाय संशोधन, विस्तार, कृषि प्रक्रिया, जलसंधारण व विस्ताराचे कार्य होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या गरजेनुसार संशोधन होणार असून परिस्थितीनुरूप विस्तार कार्यास गती मिळणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक शास्त्रज्ञांने व कृषिच्या कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. याप्रसंगी निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक डॉ. एस.एस. आडसूळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यापीठाचे चारही विभागाचे विभागीय सहयोगी संशोधन संचालक, तसेच विभागीय कृषि सहसंचालक, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद यांचे सादरीकरण झाले. यावेळी प्रगतशील शेतकरी श्री. सुभाष आरव्हे, दिलीप माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शेतकऱ्यांच्या नेमक्या अडचणी अधिकारी व शास्त्रज्ञांसमोर मांडल्या. या कार्यक्रमाचे आभार संचालक विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. पंडित खर्डे यांनी केले. याप्रसंगी सर्व विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, आत्माचे संचालक, कृषि विभागाचे कर्मचारी व प्रगतशील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

### शेतकरी मेळावा संपन्न



कृषि विद्यापीठ आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद पुरस्कृत पाणी व्यवस्थापन योजनेव्दारे आदिवासी शेतकरी विकास आणि सबलीकरण योजनेंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना संगमनेरी बोकड वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक, विस्तार शिक्षण डॉ. हरी मोरे यांनी भुषविले. प्रमुख उपस्थितीत संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, नियंत्रक डॉ. पोपटराव कर्डिले, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. मधुकर धोंडे, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे उपस्थित होते. यावेळी डॉ. हरि मोरे म्हणाले, आदिवासी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी व उत्पन्न वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठ आदिवासी शेतकऱ्यांच्या दारी आले आहे तरी शेतकऱ्यांनी कृषि विद्यापीठाच्या तंत्रज्ञानांचा अवलंब करुन उत्पन्न वाढवावे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांना बोकड वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. मधुकर धोंडे यांनी केले. या कार्यक्रमात संगमनेर तालुक्यातील बाबलेवाडी गावातील ग्रामस्थ व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

### देशाचा ६७ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



कृषि विद्यापीठात देशाचा ६७ वा स्वातंत्र्य दिन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहन करून उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहन वेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, कृषि विद्यापीठाने शिक्षण, संशोधन व विस्तारात दैदिप्यमान यश प्राप्त केलेले आहे. शेती आणि शेतकरी समृध्द बनविण्यास विद्यापीठाचे भरीव योगदान आहे. हे सर्व श्रेय विद्यापीठातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, अधिकारी, विद्यार्थी व कर्मचारी यांना जाते. याप्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, नियंत्रक, श्री. पोपटराव कर्डिले, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी अधिष्ठाता(प.म.) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.)डॉ. दादाभाऊ यादव, सहयोगी अधिष्ठाता, डॉ.आ.शि.कृ.अ.महाविद्यालय डॉ. प्रकाश तुरबतमठ, विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या सात नवीन वाण, तीन कृषि यंत्रे आणि ६८ कृषि तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे ४१ वी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीची तीन दिवसीय बैठक संपन्न झाली. या बैठकीचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्याचे कृषि व पणनमंत्री ना. श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी भुषविले.  याप्रसंगी कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष ॲड. श्री. विजयराव कोलते, मुख्य सचिव श्री. जयंतकुमार बांठिया, प्रधान कृषि सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू, डॉ. किशनराव गोरे,  डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ.किसनराव लवांडे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे कुलगुरू डॉ. रविप्रकाश दाणी, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. एम.एच. सावंत उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकराम मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतपिके वाण प्रसारण व शेतपिके वाण संरक्षण आणि शेतकरी अधिकारी कायदयांतर्गत या कृषि विद्यापीठाच्या नवीन वाण आणि तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या व त्यास समितीने मान्यता दिली. या वर्षी नवीन चार शेतपिके, दोन चारापिके, एक फळपिक, तीन कृषि यंत्रे तसेच ६८ कृषि तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता समितीने दिली.

## विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोपवाटीकेस चार तारांकित नामांकन

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेली बियाणे विभागाची मध्यवर्ती रोपवाटीकेला राष्ट्रीय बागवानी बोर्ड कृषि मंत्रालय, भारत सरकारचे चार स्टार मानांकन मिळाले आहे. भारत सरकारची गुडगाव येथील राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या समितीने नुकतीच कृषि विद्यापीठातील बियाणे विभागाच्या मध्यवर्ती रोपवाटीकेस भेट दिली होती. बियाणे विभागाचे नर्सरीचे प्रभारी अधिकारी श्री. बाळासाहेब पंडूरे यांनी या समितीसमोर नर्सरीचे होणारे दर्जेदार व निरोगी रोप निर्मिती, नर्सरी व्यवस्थापनाची माहिती दिली. या प्रसंगी प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. मधुकर धोंडे उपस्थित होते. या मध्यवर्ती रोप वाटीकेने सन २०१२-१३ मध्ये एकुण २,७३,८९७ दर्जेदार रोपांची विक्री करून त्यापासून एकूण रू. ७२,३९,४८३ इतके महसुली उत्पन्न मिळविले आहे. या नर्सरीत आंबा, चिकू, पेरू, डाळिंब आणि सीताफळ या फळझाडांच्या दर्जेदार रोपांची निर्मिती केली जाते. या रोपवाटीकेतील दर्जेदार रोपांची निर्मिती व व्यवस्थापन बघुन पुढील दोन वर्षासाठी चार तारांकित मानांकन देण्यात आले आहे.

## कृषि विद्यापीठात मेगा बुल स्टेशन




केंद्रीय कृषि मंत्री ना. शरदचंद्रजी पवार, व कृषि व पणन मंत्री महाराष्ट्र राज्य, ना. राधाकृष्ण विखे पाटील, यांचे प्रयत्नातून महाराष्ट्रात गायी व म्हशीचे दुग्धोत्पादन वाढण्यासाठी उच्च वंशावळीच्या वळूचे गोठीत विर्य पुरविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड यांचे कृषि विद्यापीठात मेगा बुल-स्टेशन स्थापन करण्याचे निश्चित झाले आहे. त्यासाठी कृषि विद्यापीठात कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांचे अध्यक्षतेखाली जागा निश्चितीसंबंधी प्रारंभिक चर्चा करण्याकरीता बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी कुलगुरू म्हणाले मेगा बुल स्टेशनचे कार्य महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या समन्वयाने घडावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर बैठकीस पी. ई. एस.चे प्रमुख डॉ. सी. पी. देवानंद,  डॉ. ए. रॉय बरमन व डॉ. अनिल हातेकर, तसेच संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) डॉ. दादाभाऊ यादव,  कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विभाग प्रमुख, कृषि विद्या डॉ.मधुकर धोंडे आदी उपस्थित होते.  डॉ. यशवंत फुलपगारे विभाग प्रमुख, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र व शास्त्रज्ञ यांनी चर्चेत सहभाग घेतला.

## आर.के.व्ही.वाय. अंतर्गत केलेल्या विविध बांधकामांचे उद्घाटन



राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठास महाराष्ट्र शासनाने सन २०११-१२ व २०१२-१३

वर्षाकरीता रूपये ३.१५ कोटी अनुदान उपलब्ध करून दिले. सदरहु अनुदानातुन विद्यापीठ प्रक्षेत्रावर जलसिंचन सुविधा अंतर्गत पाइप लाईन, शेततळी, व तीन विहीरींचे बांधकाम आणि दोन बियाणे साठवण गृह, तीन मळणी खळे, व  अर्ध गोलाकार पाटचाऱ्या इत्यादी कामांचे उद्‌घाटन  कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, यांचे हस्ते पार पडले. या प्रसंगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक, कुलसचिव श्री सुनिल वानखेडे, नियंत्रक श्री पोपटराव कर्डीले, विद्यापीठ अभियंता प्रा. मिलिंद डोखे, अधिष्ठाता (नि.कृ.शि.) डॉ. दादाभाऊ यादव, अधिष्ठाता (कृषि अभियांत्रीकी महाविद्यालय), डॉ. प्रकाश तुरबतमठ, विभाग प्रमुख (कृषि विद्या) तथा  प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. मधुकरराव धोंडे, विभाग प्रमुख वनस्पती शास्त्र, डॉ. रावसाहेब भारूड,नियोजन अधिकारी डॉ. शरद माटे,  ग्रंथपाल श्री. प्रकाश शिंदे, विविध विषयतज्ञ, प्रक्षेत्रावरील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

खरीप हंगामात विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर सोयाबिन, तुर, बाजरी, मुग, उडीद आणि मका इत्यादी पिकांच्या घेतलेल्या बिजोत्पादन प्रक्षेत्रांची मा. कुलगुरू महोदय यांनी उपस्थित मान्यवरांच्या समवेत पाहणी केली. डॉ. मधुकर धोंडे, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) यांनी प्रक्षेत्रावर राबविण्यात आलेल्या  एकुण ३०२ हेक्टरवरील बिजोत्पादन कार्यक्रमाची व भविष्यात निर्माण करावयाचा सुविधांची माहीती कुलगुरूंना दिली.

### माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण वर्ग संपन्न



कृषि विद्यापीठातील कृषि रसायन शास्त्र विभाग व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'माती व पाणी परिक्षण आणि खतांचा वापर' या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, रासायनिक खतांच्या बेसुमार वापरामुळे व पिकांना प्रमाणापेक्षा जास्त पाणी दिल्याने २०३० पर्यंत १०% जमीनी क्षारयुक्त होण्याची शक्यता आहे. माती व पाणी परिक्षण करून खते व पाण्याचा योग्य वापर केला तर हे नुकसान टळू शकते.

या कार्यक्रमाचे प्रमख पाहुणे कृषि आयुक्तालय पुणेचे कृषि संचालक श्री. संजय देशमुख मार्गदर्शन करतांना म्हणाले, माती व पाणी परिक्षण करून त्यानुसार खतांचा वापर हे आधुनिक शेतीची गरज आहे. यावेळी माती व पाणी परिक्षण पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.या प्रसंगी संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील आणि अधिष्ठाता कृषि डॉ. भीमराव उल्मेक यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मृदविज्ञान व कृषि रसायन शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक फरांदे यांनी केले. या प्रशिक्षण वर्गास उपसंचालक श्री चंद्रकांत गोरड, सहयोगी अधिष्ठाता(प.म.) डॉ.रावसाहेब भारूड, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, विभाग प्रमुख उद्यानविद्या विभाग डॉ. श्रीमंत रणपिसे, विभाग प्रमुख वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र डॉ. गजानन खोत उपस्थित होते. हा पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम शासकीय व अशासकीय माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळेच्या अधिकाऱ्यांसाठी आयोजित केला होतो. या प्रशिक्षण वर्गात ५० हून अधिक अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अशोक कडलक यांनी केले तर आभार डॉ. अमृतसागर यांनी मानले.

### होप प्रकल्पाची चौथी वार्षिक आढावा बैठक संपन्न



पुणे येथे यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीमध्ये होप प्रकल्पाची चौथी वार्षिक आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे होते. याप्रसंगी आफ्रिका येथील होप प्रकल्पाचे व्यवस्थापक डॉ. जॉर्ज ओकवॉच, कोरडवाहू तृणधान्य प्रकल्पाच्या संचालिका डॉ. स्टेफिनिया ग्रॅन्डो, कृषि महाविद्यालय पुणे चे सहयोगी अधिष्ठाताा डॉ. अजित चंदेले व्यासपीठावर उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले,  विद्यापीठाने विकसीत केलेले पंचसूत्री तंत्रज्ञान होप प्रकल्पामुळे राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचले आहे. या पंचसूत्री तंत्रज्ञानामुळे कोरडवाहू रब्बी ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे.  डॉ. जॉर्ज ओकवॉच यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीमध्ये इक्रिसॅट येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. बेलम रेड्डी, डॉ. अशोक कुमार, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख

डॉ. रावसाहेब भारूड, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, डॉ. एस.टी. बोरीकर, डॉ. शिवाजी मेहत्रे, व विद्यापीठातील शास्त्रज्ञ उपस्थित होते. या बैठकीचे प्रास्ताविक वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. शरद गडाख यांनी तर सुत्रसंचालन डॉ. यु. डी. चव्हाण यांनी केले.

## वार्षिक आढावा बैठक संपन्न




कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय अखिल भारतीय समन्वित शेळी सुधार प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावरची १३ वी वार्षिक आढावा बैठकीचे उद्‌घाटन कृषि विद्यापीठात संपन्न झाले. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. या बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. के. एम. एल. पाठक होते. यावेळी व्यासपीठावर संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक, मथुरा येथील केंद्रीय बकरी अनुसंधान संस्थानचे संचालक डॉ. एस.के. अग्रवाल, सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. सुरेश बोरकर, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विनित भासिन, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, नारी संस्था, फलटणचे संचालिका डॉ. चंदा निमकर, शेळी सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षिय मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, प्रतिकुल परिस्थितीत जगण्याची व उत्पादन देण्याची क्षमता शेळीत आहे. नगर, नाशिक, पुणे जिल्ह्यातील वातावरणात चांगले उत्पादन देणारी संगमनेरी शेळी नामशेष होण्याच्या मार्गावर असताना कृषि विद्यापीठाच्या प्रयत्नांने तिची संख्या आता दोन हजारावरुन अकरा हजारांवर गेली आहे.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. के.एम.एल. पाठक म्हणाले, या कृषि विद्यापीठाने नामशेष होत असलेल्या संगमनेरी शेळीचे संवर्धनाचे काम कौतुकास्पद आहे. या विद्यापीठाने शेळी पालनासंदर्भात शेतकऱ्यांमध्ये क्षमता वाढविण्याच्या प्रशिक्षणावर जास्त भर देणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. भिमराव उल्मेक यांनी केले व प्रमुख मार्गदर्शन संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते किफायतशीर शेळी पालन या घडिपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. या दोन दिवसीय बैठकीमध्ये देशातील विविध राज्यातून शेळीवर संशोधन करणारे ५० हून अधिक शास्त्रज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. राहुल देसले यांनी तर आभार डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मानले.

## मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पतीवर जिल्तरीय परिसंवाद




कृषि विद्यापीठातील औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प आणि सुपारी आणि मसाला विकास निर्देशालय, कालिकत (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पतीवर एक दिवसीय परिसंवादचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे होते. या परिसंवादास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. होमी चेरियन, संचालक, सुपारी आणि मसाला विकास निर्देशालय, कालिकत (केरळ) उपस्थित होते. यावेळी अध्यक्षिय मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले निसर्गात आढळणाऱ्या प्रत्येक वनस्पतींमध्ये औषधी गुणधर्म आढळतात. या वनस्पतीमधील औषधी गुणधर्म शोधुन काढणे आवश्यक आहे. सध्या बऱ्याच दुर्मिळ वनस्पती नामशेष झाल्या आहेत. वनस्पतींचा नाश हा राष्ट्रीय संपत्तीचा नाश आहे. मसाले पीके, औषधी व सुंगधी वनस्पतींचे गुणधर्म वाढविणारे संशोधन व्हावे.

या प्रसंगी प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी मंडळ, पुणेचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. मेघना केळकर, संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, अधिष्ठाता डॉ. भिमराम उल्मेक, अ.शि. कृ.अ.महाविद्यालयाचे सह. अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, सह. अधिष्ठाता (नि.कृ.शि.) डॉ. दादाभाऊ यादव, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. रावसाहेब भारुड व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. होमी चेरियन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील आणि डॉ. मेघना केळकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या एक दिवसीय परिसंवादामध्ये मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पतीची लागवड, संवर्धन, प्रक्रिया, विपणन व सरकारी योजना या विषयावर विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिसंवादास विविध

जिल्ह्यातून दोनशेहून अधिक शेतकरी, वैद्य, उद्योजक, शास्त्रज्ञ उपस्थित होते. या परिसंवादाचे प्रास्ताविक डॉ. रावसाहेब भारुड यांनी तर आभार डॉ. मधुकर बेडिस यांनी मानले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश देशमुख यांनी केले.

### ग्रंथालय सेवा व सुविधा बळकटीकरण कार्यशाळा संपन्न

कृषि विद्यापीठात ग्रंथालय सेवा व सुविधाचे बळकटीकरण या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन अधिष्ठाता (कृषि) डॉ. भिमराव उल्मेक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाच्या उपग्रंथपाल डॉ. अपर्णा राजेंद्र उपस्थित होत्या. यावेळी व्यासपिठावर सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. सुरेश बोरकर, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यापीठ ग्रंथपाल प्रा. प्रकाश शिंदे उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना अधिष्ठाता(कृषि)डॉ. भिमराव उल्मेक म्हणाले, तरूण हे देशाचे बलस्थान असून या बलस्थानाला दिशा देण्याचे काम ग्रंथालय करते. ग्रंथालयाचे तंत्रज्ञान प्रचंड बदलत आहे. प्रगतीचे पावले ओळखून डिजीटल ग्रंथालय होणे गरजेचे आहे.

प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. अपर्णा राजेंद्र म्हणाल्या बदल हे जीवनाचे सत्य आहे. हे परिवर्तन पुस्तकांमध्ये सुध्दा दिसतात. या माहिती तंत्रज्ञान युगात ई-ग्रंथ व ई-पुस्तक संकल्पना आली आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रंथालय सुसज्य करण्याचे असे प्रशिक्षण ग्रंथपालांसाठी सदैव मार्गदर्शक राहतील. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठ ग्रंथपाल प्रा. प्रकाश शिंदे यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यापीठ ग्रंथालयात सुरू असलेले ई-ग्रंथ प्रकल्पाची माहिती दिली. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालयांचे पन्नासहून अधिक ग्रंथपाल, उपग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.

### पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा जनजागृती कार्यक्रम संपन्न




कृषि विद्यापीठातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा - २००१ दोन दिवसीय जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा प्राधीकरणाचे अध्यक्ष डॉ. आर.आर. हंचीनाल व कुलसचिव डॉ. रविप्रकाश होते. यावेळी व्यासपीठावर सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब भारुड, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. मधुकर धोंडे , डॉ. विजय शेलार उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या साडेतीन पटीने तर अन्नधान्याचे उत्पादन पाच पटीने वाढले आहे. याचे मोठे श्रेय शास्त्रज्ञांव्यतिरिक्त शेतकरी व त्यांनी संवर्धित केलेल्या वाणांना जाते. शेतकऱ्यांमुळे जुन्या वाणांचे संवर्धन झाले आहे. भारत सरकारने पिकवाण संरक्षण व शेतकरी हक्क कायद्यांतर्गत शेतक ऱ्यांनी स्वतः विकसित केलेले बियाणे किंवा संवर्धित केलेले देशी बियाण्याचे बिजोत्पादन घेणे व विक्री करण्याचा शेतकऱ्यांना कायदेशीर अधिकार दिलेला आहे.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. आर. आर. हंचीनाल म्हणाले शेतकरी हा शेतीचा शास्त्रज्ञ असून त्याच्या प्रयत्नांमुळेच देशी वाण संवर्धीत झाले आहेत. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठाने विकसित केलेले वाणांचे पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.या कार्यक्रमास ठाणे, यवतमाळ, अमरावती, सांगली, पुणे, सोलापूर, विदर्भ व अहमदनगर जिल्हयातील शंभरहून अधिक शेतक-यांनी हजेरी लावली. यावेळी शेतकऱ्यांनी विकसित केलेले किंवा संवर्धीत केलेले जुणे देशी पीक वाणांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये २६० विविध पिकांचे वाण ठेवण्यात आले होते. याप्रदर्शनास स्थानिक लोकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, शेतकरी, विद्यार्थी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय शेलार यांनी तर आभार डॉ. मधुकर धोंडे यांनी मानले.

### ग्रामबिजोत्पादन प्रशिक्षण वर्ग संपन्न




कृषि विद्यापीठातील बियाणे विभागाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एक दिवसीय बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि)

डॉ. भिमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता(निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. मधुकर धोंडे उपस्थित होते.

अध्यक्षिय मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, सर्व शेतकऱ्यांना चांगल्या गुणवत्तेचे बियाणे मिळावे, म्हणून शासनाने ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम सुरु केला आहे. ग्राम बिजोत्पादन घेण्याआधी शेतकऱ्यांना बिजोत्पादन तंत्रज्ञान अवगत होणे आवश्यक आहे. यावेळी अधिष्ठाता(कृषि), डॉ. भिमराव उल्मेक, सहयोगी अधिष्ठाता(निकृशि) डॉ. दादाभाऊ यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. मधुकर धोंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी पंचसुत्री, हरभरा पिकाचे बिजोत्पादन, बीज प्रमाणीकरण कार्यपध्दती, रब्बी मका लागवड तंत्रज्ञान, गहु बिजोत्पादन तंत्रज्ञान, कांदा बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाला नगर जिल्ह्यातील १०० हुन अधिक शेतकरी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना कुलगुरुंच्या हस्ते कृषि दर्शनीचे वाटप करण्यात आले.

### शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

कृषि विज्ञान केंद्र धुळे व राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर लि. यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रमोद रसाळ यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक श्री. विजय बावीस्कर, जिल्हा प्रभारी अधिकारी आर. सी. एफ यांनी केले तर श्री. तुषार भारूड यांनी कार्यक्रमाचा उद्देश विषद केला. यावेळी अध्यक्षिय मार्गदर्शनामध्ये डॉ. रसाळ म्हणाले, माती परिक्षण व वाण बदल केल्यावर पीक उत्पादनात वाढ होते. शेतकऱ्यांनी कृषि महाविद्यालयातील शास्त्रज्ञ व कृषि विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ यांच्याशी संपर्क ठेवण्याची गरज असल्याचे म्हणाले.

यांनी शेतकऱ्यांनी माती परिक्षण करून जमिनीची आरोग्य पत्रिका तयार करणे गरजेचे असल्याचे सांगितले व विद्यापीठाने प्रकाशित केल्या जाणाऱ्या विविध कृषि प्रकाशनाची माहिती दिली. या वेळी तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. मिलिंद आहिरे कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, यांनी विद्यापीठाची प्रकाशने, डॉ. प्रितम शिंदे यांनी ग्रामबिजोत्पादन, डॉ. प्रविण राठोड यांनी सुक्ष्म अन्नद्रव्यांचे पिक उत्पादनात महत्व व डॉ. पंकज पाटील यांनी कपाशीवरील जैविक किड व रोग नियंत्रण आणि कु. अमृता राऊत यांनी फळे व भाजीपाला प्रक्रिया या विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी तर आभार श्री. रोहित कडू यांनी केले. या प्रशिक्षणाचा लाभ धुळे जिल्ह्यातील ३३ गावांमधील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतला.

### अविष्कार २०१३ चे आयोजन




कृषि विद्यापीठातील डॉ. अणासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयांतर्गत आंतर महाविद्यालयीन अविष्कार २०१३ रिसर्च फेस्टीवल चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश तुरबतमठ, उपाध्यक्ष विद्यार्थी परिषद डॉ. प्रकाश उंडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. शरद पाटील उपस्थित होते. या स्पर्धेत ३० कृषि महाविद्यालयांनी सहभाग घेतला व ४५ संशोधनात्मक प्रोजेक्ट सादर करण्यात आले.

अविष्कार स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ प्राचार्य डॉ. प्रकाश तुरबतमठ व विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. शरद पाटील, प्रा. अतुल अत्रे, प्रा. सुनिल गोरंटीवार यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी प्रा. अभिजित नलावडे, प्रा. दिलीप गायकवाड, यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयीन स्पर्धेत डॉ. अ. शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी विजेतेपद संपादन केले.

### सामंजस्य करार



कृषि विद्यापीठ आणि राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था, बारामती यांच्यात वनस्पतींच्या अजैविक ताण व्यवस्थापनाचा शिक्षण आणि संशोधनासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, राष्ट्रीय अजैविक ताण

व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. पी. एस. मिनहास, विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक, व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. राजेंद्र पाटील आणि डॉ. पी. एस. मिनहास यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, सतत बदलत्या हवामानामुळे अजैविक ताणांना सामोरे जावे लागते. अजैविक ताणांना प्रतिकारकक्षम वाण विकसीत करणे व ताण व्यवस्थापन तंत्रज्ञान यावर एकत्रीत संशोधन करणे गरजेचे आहे.

या प्रसंगी राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. पी. एस. मिनहास यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील प्रास्ताविक केले. या प्रसंगी राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे डॉ. जगदीश रहाणे, डॉ. के. के. कृष्णण, डॉ. अण्णासाहेब शिंदे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी तर आभार डॉ. विठ्ठलराव शेंडे यांनी मानले.

## राष्ट्रीय चारा तंत्रज्ञान प्रात्याक्षिक चर्चासत्र संपन्न




भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, भारतीय कुरण व चारा अनुसंधान संस्था, झाशी व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे संयुक्त विद्यामाने विद्यापीठात राष्ट्रीय चारा तंत्रज्ञान प्रात्याक्षिके चर्चासत्राचे उद्‌घाटन कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे, यांचे हस्ते झाले. सदर चर्चासत्रात देशातील विविध कृषि विज्ञान केंद्रातील चोवीस विषय विषेशज्ञांनी भाग घेतला. या प्रसंगी कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे यांनी देशापुढील दुधजन्य पदार्थांची वाढती गरज भागविण्याच्या दृष्टिने चारा पिके उत्पादन तंत्रज्ञान, चाऱ्याचा प्रभावी वापर व दीर्घकाळासाठी साठवणुक यांचे महत्व विषद केले. दुष्काळी परिस्थिती मध्ये पशुधनाचे संगोपनासाठी चाऱ्यावरील प्रक्रिया व साठवणुकीच्या तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याची गरज विषद केली. यावेळी संशोधन संचालक, डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण, डॉ. भीमराव उल्मेक, व प्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग,डॉ. एस. एन. माटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजित सोनोने यांनी व आभार डॉ. अण्णासाहेब तांबे यांनी मानले.

## कोरडवाहू फळ पिकांची वार्षिक संशोधन आढावा बैठक संपन्न




महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, केंद्रीय कोरडवाहू फळे संशोधन संस्था, बिकानेर व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने कोरडवाहू फळे संशोधन विषयी शास्त्रज्ञांची राष्ट्रीय पातळीवरील १८ वी वार्षिक संशोधन आढावा बैठकीचे उद्‌घाटन संपन्न झाले. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे उद्यानविद्या विभागाचे उपसंचालक डॉ. एन.के. कृष्णकुमार होते. यावेळी व्यासपीठावर संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक, विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक, बिकानेर येथील केंद्रीय कोरडवाहू उद्यानविद्या संस्थेचे प्रकल्प प्रमुख डॉ. एस. के. शर्मा, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे, उद्यानविद्यावेत्ता डॉ. एस. पी. सुपे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, कृषि विकासाचा वृध्दीदर ४% पर्यंत नेण्यासाठी उद्यानविद्या आणि दुध विकासाचा वृध्दीदर ६% पर्यंत वाढविणे गरजेचे आहे. उद्यानविद्याचा वृध्दीदर वाढविण्याची क्षमता कोरडवाहू फळ पिकांमध्ये आहे.

प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. कृष्ण कुमार म्हणाले, स्वातत्र्यपुर्वी व स्वात्र्यानंतर महाराष्ट्र राज्याचे सर्व क्षेत्रात मोठे योगदान राहिले आहे. कृषि, सहकार, व्यापार, औद्योगिकरणामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. त्याचबरोबर कोरडवाहू फळप्रक्रियावर अधिक संशोधन व विस्तार होणे गरजचे आहे. या प्रसंगी डॉ. एस. के. शर्मा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान पुस्तिकेचे, कोरडवाहू फळ विभागामध्ये तीन दशके या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक, संशोधन डॉ. राजेंद्र पाटीलयांनी केले. या बैठकीला बारामती येथील अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. पी. एस. मिनहास,डॉ. पाल, डॉ. एम. एन. रॉय, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, विविध राज्यातुन आलेले ७० शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. श्रीकांत कुलकर्णी तर आभार डॉ. श्रीमंत रणपिसे यांनी मानले.

### विविध विकास कामांचे उद्घाटन

कृषि संशोधन केंद्र, जेऊर, ता. करमाळा, जिल्हा सोलापूर येथे नवीन कार्यालय, प्रक्षेत्राला चेनलिंक कंपाऊंड, रस्ता खडीकरण, ट्रॅक्टरशेड इ. विकास कामांचे बांधकाम व प्रयोगशाळा इमारतीचे नुतनीकरण करण्यात आले. या बांधकामांचे उद्घाटन कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, संशोधन केंद्रे हे विद्यापीठाचा आरसा असून तेथील बळकटीकरण करण्याचे काम विद्यापीठाने हाती घेतलेले आहे. या प्रसंगी संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. अशोक फरांदे, कृषिविद्या विभाग प्रमुख, डॉ. दशरथ ठवाळ, प्रमुख शास्त्रज्ञ(बियाणे) डॉ. मधुकर धोंडे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. जनार्दन कदम, डॉ. गुरव, प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र डॉ. गोरक्ष ससाणे, प्रभारी अधिकारी प्रा. विजय ठोंबरे उपस्थित होते.

### विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक संपन्न



कृषि विद्यापीठाच्या विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक विभागीय संशोधन केंद्र, सोलापुर येथे संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे यांनी भुषविले. यावेळी कुलगुरू, डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, ज्वारी, गहू आणि हरबऱ्याच्या बीजोत्पादनासाठी कृषि विद्यापीठाने पुढाकार घेतला असून, त्यासाठी तीनही हंगामांतील बीजोत्पादनाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात या पिकांच्या वाणांची कमतरता भासणार नाही. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, कृषि सहसंचालक श्री. कैलास मोते, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. पाल, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जनार्दन कदम, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील यांनी विद्यापीठाने यंदाच्या रब्बी, उन्हाळी हंगामासाठी केलेल्या शिफारशींची माहिती दिली. कृषि सहसंचालक श्री. कैलास मोते यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रास्ताविकात डॉ. विठ्ठल शेंडे यांनी सल्लागार समितीच्या बैठकीच्या आयोजनामागचा उद्देश सांगितला. प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जनार्दन कदम यांनी आभार मानले. या बैठकीला कोल्हापूर, सांगली, पुणे विभागातून कृषि अधिकारी, शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुध्दिबळ स्पर्धा संपन्न




कृषि विद्यापीठात येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार व विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे होते. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. राजेंद्र पाटील, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. शरद पाटील, प्रमुख उपस्थितीत बुद्धिबळ ज्युनिअर ग्रँडमास्टर श्री. शार्दुल गागरे उपस्थित होते. अध्यक्षिय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, बुद्धिबळामुळे बुध्दीला चालना मिळून संयमाचे गुण वृद्धिगंत होतात. खेळामध्ये हार-जीत महत्त्वाची नसून प्रत्येक विद्यार्थ्यांने स्पर्धेमध्ये भाग घेणे महत्त्वाचे आहे. क्रीडा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडतो.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना डॉ. सुधीर तांबे म्हणाले, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारी नोकरीमध्ये ५% जागा राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंसाठी राखीव ठेवलेल्या आहेत. मोठया प्रमाणात खेळाडू तयार होण्यासाठी राज्य शासन क्रीडा विद्यापीठ स्थापन करणार आहे. यावेळी कु. शार्दुल गागरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा आणि कर्नाटक या राज्यातील ३५ कृषि व अकृषि विद्यापीठातील १८९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेचा समारोप संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी नवी दिल्ली येथील भारतीय विद्यापीठ संघटनेचे श्री. प्रवीण ठाकरे, श्री. अमरीश जोशी, श्री. प्रेम पंडीत उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री. शरद पाटील यांनी केले. या आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम पारितोषिक चारूसट विद्यापीठाचा श्री. गांधी अनुज, द्वितीय पारितोषिक गोवा विद्यापीठाचा श्री. कैसारी उमंग, तृतीय पारितोषिक मुंबई विद्यापीठाचा श्री. कुलकर्णी राकेश, चतुर्थ पारितोषिक मुंबई विद्यापीठाचा श्री. शेट्टी प्रणव, पाचवे पारितोषिक उदयपुर विद्यापीठाचा श्री.अजमेर तुषार, सहावे पारितोषिक सुरत विद्यापीठाचा श्री. देसाई हिनील यांना देण्यात आले. टीम चॅम्पियनशीपचे प्रथम पारितोषिक मुंबई विद्यापीठास, द्वितीय पारितोषिक पुणे विद्यापीठास, तृतीय पारितोषिक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि चौथे पारितोषिक एस.आर.टी.एम.यु. नांदेड विद्यापीठास देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. शरद पाटील यांनी तर सूत्रसंचालन श्री. व्हिवेन थॉमस यांनी केले आणि आभार श्री. प्रविण ठाकरे यांनी मानले.

### महिला दिन साजरा



महात्मा फुले कृषि विद्यापीठ येथे पदव्युत्तर कृषि महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय आणि निर्मिती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या महिला दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निर्मिती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. रेखाताई मोरे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती रेणूताई गावसकर होत्या. यावेळी व्यासपीठावर सौ. विनया माटे, सौ. सुनिता थोरात, विद्यार्थी परिषदेच्या कु. मुक्ता टेकाळे आणि कु. अनिता सराळ उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, नियोजन अधिकारी डॉ. शरद माटे होते.

मार्गदर्शन करताना श्रीमती रेणूताई गावसकर म्हणाल्या स्त्रीच्या आयुष्यात मुले व पती असो वा नसो यांवर तिचे महत्त्व ठरत नाही, तर तिच्या कामावर व कर्तुत्वावर तिचे महत्त्व ठरते. स्त्रियांनी स्वतः ला अबला न समजता प्रत्येक समस्यांना धीटपणे सामोरे जावे. प्रत्येक समस्यांवर मार्ग आहे. फक्त बघण्याचा दृष्टिकोन बदला. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना सौ. रेखाताई मोरे यांनी निर्मिती महिला मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

या प्रसंगी सामाजिक उत्तरदायित्व म्हणून विद्यार्थी व निर्मिती महिला मंडळाच्या वर्गणीतून रूपये दहा हजार रक्कम एकलव्य बाल शिक्षण व आरोग्य न्यास साठी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे आणि सौ. रेखाताई मोरे यांच्या हस्ते देण्यात आले. या प्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालयाची कु. कुंज चंद्रा आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाची कु. निशा जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी महिलांसाठी लकी ड्रॉ काढण्यात आला. यामध्ये प्रथम विजेत्या सौ. अनारसे, व्दितीय विजेत्या सौ. सुनिता महाजन आणि तृतीय विजेत्या सौ. शेंडगे ठरल्या. त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. अंजली देशपांडे, सूत्रसंचालन सौ. विनया माटे तर आभार सौ. सुनिता थोरात यांनी मानले. या कार्यक्रमास विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

### सामंजस्य करार संपन्न



महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि नवी दिल्ली येथील राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांच्या बरोबर अद्यावत गोठीत रेत मात्रा उत्पादन प्रयोगशाळेची स्थापनेचा सामंजस्य करार संपन्न झाला.

या सामंजस्य कराराच्या कार्यक्रमास व्यासपीठावर कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे, मुंबई येथील राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचे व्यवस्थापक डॉ. एम. एच. बुच, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळातील दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. पी. देवानंद, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक, वरिष्ठ व्यवस्थापक डॉ. हाटेकर, महाराष्ट्र राज्य कृषि, दुग्धमत्स्य विभागाचे उपसचिव डॉ. व्ही. एन. वंजारे आणि पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे उपस्थित होते. या प्रसंगी सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे आणि राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळातील दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. पी. देवानंद यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव

उल्मेक यांनी केले. या कार्यक्रमास नियंत्रक डॉ. पोपटराव कर्डिले, नियोजन अधिकारी डॉ. शरद माटे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल देसले आणि आभार प्रदर्शन डॉ. उद्धव भोईटे यांनी केले.

### राज्यस्तरीय परिसंवाद संपन्न




कृषि विद्यापीठातील मृदशास्त्र व कृषि रसायनविभागांतर्गत भारतीय मृदविज्ञान समितीद्वारे 'अन्नशाश्वतीसाठी जमिनीचे आरोग्य या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते'. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय मृदविज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. के. रतन उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन परिषदेचे सहसंचालक (मृद) डॉ. एस. के. चौधरी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक मृदशास्त्र व कृषि रसायन विभाग प्रमुख डॉ. ए. एल. फरांदे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, पाण्याच्या अतिवापरामुळे जमिनी क्षारपड होऊन नापीक होत आहेत. अशीच परिस्थिती राहिली तर २०३० पर्यंत देशातील उत्पादित जमिनीपैकी १० टक्के जमीन क्षारपड होऊन नापीक होणार आहे. जमिनीच्या आरोग्यावर अन्नसुरक्षा अवलंबून आहे. अन्नसुरक्षेसाठी जमीन आरोग्य सुरक्षा महत्त्वाची आहे.

डॉ. आर. के. रतन, डॉ. एस. के. चौधरी, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मृदशास्त्र व कृषि रसायन विभागाचे विभागप्रमुख डॉ. अशोक फरांदे यांनी केले. या प्रसंगी मृदशास्त्र कृषि रसायन विषयावर विविध पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते डॉ. एस. बी. वराडे यांना जीवनगौरव पुरस्कार आणि डॉ. व्ही. डी. पाटील यांना मृदगंध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मृदशास्त्र व कृषि रसायन विभागाचे माजी विभाग प्रमुखांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पोपट कडू आणि आभार डॉ. अमृतसागर यांनी मानले.

### १३ वी विस्तार शिक्षण परिषदेची बैठक संपन्न



कृषि विद्यापीठाची १३ वी विस्तार शिक्षण परिषदेची बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षीय स्थान डॉ. भिमराव उल्मेक यांनी भूषविले. या प्रसंगी संचालक संशोधन, डॉ. राजेंद्र पाटील, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. प्रकाश तुरबतमठ, परिषदेचे सदस्य, कृषिभुषण श्री. विश्वासराव पाटील, प्रगतशील शेतकरी श्री. पांडुरंग पाटील, श्री. उदय नान्नजकर, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख, डॉ. सुभाषचंद्र शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते. संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले, विस्तार कार्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी. विस्तार कार्य शेतकरीभिमुख असावे. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार विस्तार कार्य करावे.

यावेळी मार्गदर्शन करताना संचालक संशोधन म्हणाले, दुष्काळातही विद्यापीठाचे तंत्रज्ञान सरस ठरले आहे. त्यामुळे विस्तार कार्यकर्त्यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त प्रसार करावा यावेळी कृषिभूषण श्री. विश्वासराव पाटील, अहमदनगर येथील नाबार्डचे उपजिल्हाव्यवस्थापक श्री. राकेश पनघट, प्रगतशील शेतकरी श्री. उदय नान्नजकर, श्री. पांडुरंग पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. पंडित खर्डे यांनी विस्तार शिक्षण संचालनालयाचा अहवाल सादर केला. विस्तार गट, कृषि महाविद्यालय, पुणे चा अहवाल डॉ. एस. व्ही. शिर्के यांनी, कृषि महाविद्यालय, धुळे चा डॉ. मिलींद आहिरे यांनी तर कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचा श्री. एम.एन. ताले यांनी सादर केला. या बैठकीस सर्व विभाग प्रमुख, विभागीय सहयोगी संशोधन संचालक, विभागीय विस्तार केंद्रांचे व्यवस्थापक, जिल्हा विस्तार केंद्रांचे अधिकारी, कृषि विज्ञान केंद्रांचे अधिकारी, प्रगतशील शेतकरी, शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### कृषि साहित्य संमेलन संपन्न

कृषि विद्यापीठातील विस्तार शिक्षण संचालनालयाच्या राष्ट्रीय





कृषि विकास योजनेच्या कृषि तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पांतर्गत कृषि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे एकदिवसीय कृषि साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून कवी श्री. प्रकाश होळकर होते. या संमेलनाचे अध्यक्ष स्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर नाशिक येथील अखिल भारतीय कृषि साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. अरूण आंधळे पाटील, संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक, संचालक संशोधन डॉ. राजेंद्र पाटील, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. श्री. शरद पाटील उपस्थित होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना कवी प्रकाश होळकर म्हणाले, शब्दात मोठी ताकद असते. या शब्दांना योग्य आकार दिला तर कविता, भारूड, लावणी, गोष्टी, लेख, कादंबरी तयार होते.शब्द हेच प्रभावी माध्यम असल्याने त्यातून कृषि तंत्रज्ञान प्रसार तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत होऊ शकतो.

अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, कृषि तंत्रज्ञान प्रसारासाठी आणि नवीन कृषि साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी कृषि साहित्य संमेलनाचे व्यासपीठ योग्य आहे.

या प्रसंगी नाशिक येथील अखिल भारतीय कृषि साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. अरूण आंधळे पा. यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक विस्तार शिक्षण डॉ. भिमराव उल्मेक यांनी केले. यावेळी महात्मा फुलेंच्या पुतळयापासून ते डॉ. नानासाहेब पवार सभागृहापर्यंत विद्यार्थ्यांनी भव्य कृषिदिंडी काढली. या कृषि साहित्य संमेलनात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चाळीस महाविद्यालयातील सत्तर विद्यार्थ्यांनी शेतीवर आधारीत कविता, पोवाडे, गीते, भारूड, पटकथा इ. सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कैलास कांबळे यांनी तर आभार प्रा. शरद पाटील यांनी मानले.

### काटेकोर फुलशेती तंत्रज्ञानावर राज्यस्तरीय कार्यशाळा

कृषि विद्यापीठात दोन दिवसीय राज्यस्तरीय 'स्वंरक्षित वातावरणातील फु ल पिकांसाठी काटेकोर शेती तंत्रज्ञान' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून एन.सी.पी.ऐ. एच.चे सहसचिव मा. श्री. क्रिश अय्यंगार होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे होते. या प्रसंगी व्यासपीठावर नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन संस्थेचे डॉ. टी. जानकीराम, डॉ. अ. शिं. कृ. अभि. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, नियोजन अधिकारी डॉ. एस.एन. माटे, विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख प्रा. नरेंद्र फिरके उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. क्रिश अय्यंगार म्हणाले, सध्याच्या बदलत्या हवामानाच्या परिस्थितीमध्ये कमी क्षेत्र, कमी पाण्यात व कमी खर्चामध्ये शेती करण्यासाठी आधुनिक काटेकोर फुलशेतीच्या पध्दतीचा शेतकऱ्यांनी अवलंब करावा. आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे म्हणाले की, फुलशेती किफायतशीर होण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना विविध तांत्रिक विषयावर सखोल मार्गदर्शन मिळण्यासाठी राष्ट्रीय फुलशेती संचालनालय विद्यापीठाच्या प्रयत्नांनी पुणे येथे सुरु करण्यात येत आहे. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते फुलशेतीवरील स्मरणिका व फुलशेती विषयावरील विविध प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले तसेच विद्यापीठात उभारण्यात आलेले काटेकोर शेती विज्ञान केंद्राचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फुलशेती विषयक विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनिल कदम यांनी केले तर आभार प्रा. नरेंद्र फिरके यांनी मानले. सदर कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील २५० शेतकरी व कृषि विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

### प्रशिक्षण वर्ग संपन्न

कृषि विद्यापीठातील विस्तार शिक्षण विभाग व विस्तार शिक्षण संस्था, आनंद (गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील शास्त्रज्ञांसाठी 'सहभागातून प्रशिक्षणाचे व्यवस्थापन' या विषयावर ३ दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले प्रत्येक




शास्त्रज्ञाला प्रशिक्षणाची आवश्यकता असते. प्रशिक्षणामुळे ज्ञानात भर पडत असते.

विस्तार प्रशिक्षण संस्था, आनंद येथील डॉ. सी. पी. देसाई म्हणाले, की परिणामकारक तंत्रज्ञान प्रसारासाठी मनुष्यबळ विकास गरजेचा असून त्यामुळे तंत्रज्ञानाचा प्रसार गावपातळीवर होण्यास मदत होते. अशा प्रशिक्षणाच्या माध्यमातून लाभार्थींच्या महत्त्वाच्या गरजा जाणून त्याप्रमाणे विस्तार कार्यक्रमाची आखणी करता येते.

### मागोवा-२०१३ संपन्न



कृषि विद्यापीठाचा मागोवा-२०१३ आणि छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर आकाशवाणी केंद्राचे उपसंचालक श्री. राजेश बेलदार होते. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक,संचालक संशोधक डॉ. राजेंद्र पाटील,नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता, उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे म्हणाले, कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्हयातील संशोधन केंद्रे, कृषि महाविद्यालये, कृषि तंत्र विद्यालये हे सर्व शेतकऱ्यांचे मार्गदर्शक केंद्र आहेत. हे सर्व संशोधन केंद्रे एक प्रकारे विस्तार यंत्रणा असून त्यांचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे.

प्रमुख पाहुणे श्री. राजेश बेलदार मार्गदर्शन करताना म्हणाले, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधन,विस्तार आणि शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. प्रसारण यंत्रणा आणि कृषि विद्यापीठाने एकत्र काम केले तर, शेतीचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.

यावेळी विद्यापीठामधील दहा जिल्हयातील शिक्षण, संशोधन,विस्तार कार्यासंदर्भातील प्रदर्शनाचे प्रमुख पाहुण्याचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्याचे स्वागत, परिचय, प्रास्तावीक, विस्तार आणि शिक्षण संचालनालयाचा गत वर्षाचा आढावा संचालक विस्तार शिक्षण डॉ. भीमराव उल्मेक यांनी सादर केला. संचालक संशोधक डॉ. राजेंद्र पाटील, यांनी संशोधनाचा,विद्यापीठ अभियंता श्री मिलींद ढोके यांनी बांधकाम विभागाचा, कुलसचिव श्री. सुनिल वानखेडे यांनी प्रशासन विभागाचा आणि नियंत्रक श्री. पोपटराव कर्डिले यांनी वित्त विभागाचा गतवर्षाचा आढावा सादर केला. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन 'कृषिदर्शनी २०१४' व विविध कृषि विषयक पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी शिक्षण, संशोधन आणि विस्तारासंदर्भात भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला प्रमुख पाहुणे श्री. राजेश बेलदार, कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे आणि सर्व मान्यवरांनी भेट दिली.

### मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती राज्यस्तरीय परिसंवाद




विद्यापीठातील औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प आणि सुपारी व मसाला पिके विकास निर्देशालय कालिकत (केरळ) यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती राज्यस्तरीय परिसंवाद संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुणे येथील औषधी वनस्पती सल्लागार औषधी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बेलोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वनस्पतीशास्त्र.विभाग प्रमुख, डॉ. रावसाहेब भारूड, यांनी भूषविले. या प्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी श्री. दिलीप देवरे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे,ज्वारी पैदासकार डॉ. शरद गडाख, डॉ. दत्तात्रय कुसळकर, डॉ. मधुकर बेडीस उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉ. बेलोरे यांनी केंद्र पुरस्कृत औषधी व सुगंधी वनस्पती योजनेतून नर्सरीसाठी उपलब्ध अनुदान तसेच शासनमान्य १३ वनस्पतीबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. रावसाहेब भारूड म्हणाले साखर उद्योगाप्रमाणे स्वतंत्र औषधी व सुगंधी वनस्पती पणन मंडळ स्थापन केल्यास शाश्वत आर्थिक फायदा शेतकरी बंधूंना मिळण्यास मदत होईल. डॉ. मधुकर बेडीस यांनी प्रास्तावीक आणि आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. आर.एस. वाघ यांनी केले.

## ६. पारितोषिके / पुरस्कार / नियुक्ती

### कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना 'कृषिरत्न' पुरस्कार



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा २०१४ चा कृषि क्षेत्रातील राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पाचवे राज्यस्तरीय अधिवेशन कल्याण जवळील टिटवाळा (गोवेली) येथे संपन्न झाले. या अधिवेशनात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कृषि क्षेत्रातील यंदाचा कृषिरत्न पुरस्कार कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना राज्य अध्यक्ष श्री.गोविंद घोळवे, राज्यसरचिटणीस श्री.विश्वासराव आरोटे, ज्येष्ठ पत्रकार श्री.हेमंत देसाई, श्री.सचिन दादा क्षिरसागर, आ.श्री.किसनराव कथोरे या मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. विद्यापीठाला गतिमान व पारदर्शक नाविन्यपूर्ण उपक्रमातून उच्च गुणवत्तेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ते सातत्याने प्रभावीपणे कार्य करीत असतात. कृषि क्षेत्रात त्यांनी केलेल्या भरीव कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे.

### कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना दैनिक लोकमत समूहाचा नॅशनल एज्युकेशन पुरस्कार

लोकमत समूहाचा २०१४ चा शिक्षण क्षेत्रातील नॅशनल एज्युकेशन अवार्डशीप पुरस्कार कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना नुकताच सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

दैनिक लोकमत आणि स्टार्स ऑफ द इंडस्ट्री समुहातर्फे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार वितरण सोहळा मुंबईतील ताज हॉटेलमध्ये संपन्न झाला. मुंबईतील दैनिक लोकमतचे संपादक श्री. दिनकर रायकर यांच्या हस्ते हा पुरस्कार कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांना देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. कृषि क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

### डॉ. भाऊसाहेब पागिरे यांना पारितोषिक प्रदान

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे दि. १ व २ फेब्रुवारी, २०१४ रोजी महाराष्ट्र कृषि अर्थशास्त्र परिषदेची रौप्य महोत्सवी परिषद पार पडली. या परिषदेमध्ये १५० कृषि अर्थ शास्त्रज्ञांनी सहभाग घेऊन त्यामध्ये ५८ कृषि अर्थशास्त्रज्ञांनी त्यांचे संशोधनपर लेखांचे सादरीकरण केले.

सदर परिषदेमध्ये कृषि विद्यापीठाच्या कृषि अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. भाऊसाहेब पागिरे यांना सर्वोत्कृष्ट लेखाचे व सादरीकरणाचे प्रथम पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. पागिरे यांनी, ''जिल्हा मध्यवर्ती बँकांची कर्ज वितरणातील असमानता व कर्ज वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा विभागीय अभ्यास'', या विषयावर सखोल विवेचन करणारा संशोधन लेख लिहून त्याचे सादरीकरण केले होते.

### डॉ. सुरेश पवार व डॉ. बडगुजर यांच्या शोधनिबंधास आंतरराष्ट्रीय ऊस पीक परिषदेत पारितोषिक

लखनऊ येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय साखर पिके परिसंवादात मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथील किटकशास्त्रज्ञ डॉ. मंगेश बडगुजर व ऊस विशेषज्ञ डॉ. सुरेश पवार यांना शोध निबंध सादरीकरणाबद्दलचे तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यांनी 'ऊसावरील खोड किडीच्या नियंत्रणाकरिता क्लोरॅननिलीप्रोल चा वापर', याविषयी शोध निबंध सादर केला.

### डॉ.जे.व्ही.पाटील व डॉ. यु.डी. चव्हाण यांना राज्य शासनाचा मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा २०१२ चा पुरस्कार प्रदान



मुंबई येथील रविंद्र नाटय मंदिरात राज्य शासनाचा उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती २०१२ पुरस्कार सोहळा राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मिती २०१२ चा प्रौढ शेती व शेती पुरक व्यवसाय लेखन या वाङ्मय प्रकारातील वसंतराव नाईक पुरस्कार (विभागून) कृषि विद्यापीठातील ज्वारी सुधार प्रकल्पाचे डॉ. यु.डी. चव्हाण व हैद्राबाद येथील ज्वारी संचालनालयाचे संचालक, डॉ. जे.व्ही. पाटील यांच्या कडधान्य लागवड ते प्रक्रिया उद्योग या पुस्तकाला मिळाला आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम रू. १,००,०००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

### विद्यापीठ शास्त्रज्ञांची युरोप दौऱ्यासाठी निवड





कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके, प्राध्यापक, कृषि विद्या आणि डॉ. पंडित खर्डे, सहयोगी प्राध्यापक, कृषि विस्तार यांची युरोप शेती अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली. डॉ. सोळंके आणि डॉ. खर्डे यांनी वेगवेगळ्या आयोजीत दोन दौऱ्यात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. महाराष्ट्र शासनाच्या 'शेतकऱ्यांचा परदेश अभ्यास दौरा' या उपक्रमात त्यांनी जर्मनी, नेदरलँड, फ्रान्स आणि

स्पेन या देशांना भेटी दिल्या. त्यांच्या समवेत प्रत्येकी ४३ शेतकऱ्यांचा गट होता. या अभ्यास दौऱ्यात जर्मनीतील फळे-भाजीपाला पॅकिंग संस्था, नेदरलँड मधील जागतिक फुल लिलाव केंद्र, बटाटा शेती, फ्रान्समधील द्राक्ष वायनरी आणि स्पेनमधील आधुनिक डेअरी फार्मला त्यांनी भेटी दिल्या.

### डॉ. जयवंत जाधव यांना पुरस्कार प्रदान

